अहवाल क्रमांक : १५३

# पंचायती राज समिती

## (२०१७-२०१८)

## (तेरावी महाराष्ट्र विधानसभा)

**अमरावती जिल्हा परिषदेच्या सन २०१२-१३ च्या वार्षिक प्रशासन अहवालाच्या संदर्भात**

# नववा अहवाल

सत्यमेव जयते

**(सदर अहवाल दिनांक डिसेंबर, २०१७ रोजी विधानसभेस/विधानपरिषदेस सादर करण्यात आला.)**

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय
विधान भवन, नागपूर
२०१७

# पंचायती राज समिती

(२०१७-२०१८)

(तेरावी महाराष्ट्र विधानसभा)

अमरावती जिल्हा परिषदेच्या सन २०१२-१३ च्या वार्षिक प्रशासन अहवालाच्या संदर्भात

# नववा अहवाल

## पंचायती राज समिती
(सन २०१७-२०१८)

**समिती प्रमुख**

(१) श्री.सुधीर पारवे, वि.स.स.

**सदस्य**

(२) श्री.बाबुराव पाचर्णे, वि.स.स.
(३) श्री.चरण वाघमारे, वि.स.स.
(४) श्री.रणधीर सावरकर, वि.स.स.
(५) ॲड. राहुल कुल, वि.स.स.
(६) श्री.आर.टी.देशमुख, वि.स.स.
(७) डॉ.देवराव होळी, वि.स.स.
(८) डॉ.सुरेश खाडे, वि.स.स.
(९) डॉ.सुधाकर भालेराव, वि.स.स.
(१०) श्री.सुधाकर कोहळे, वि.स.स.
(११) श्री.भरतशेठ गोगावले, वि.स.स.
(१२) श्री.किशोर पाटील, वि.स.स.
(१३) श्री.राजेश क्षीरसागर, वि.स.स.
(१४) श्री.तुकाराम काते, वि.स.स.
(१५) श्री.राहुल बोंद्रे, वि.स.स.
(१६) श्री.भारत भालके , वि.स.स.
(१७) प्रा.विरेंद्र जगताप, वि.स.स.
(१८) श्री.दिलीप सोपल, वि.स.स.
(१९) श्री.राहुल मोटे, वि.स.स.
(२०) श्री.दीपक चव्हाण, वि.स.स.
(२१) श्री.प्रविण दरेकर, वि.प.स.
(२२) श्री.तानाजी सावंत, वि.प.स.
(२३) श्री.विक्रम काळे, वि.प.स.
(२४) श्री.सतीश चव्हाण, वि.प.स.
(२५) श्री.अमरनाथ राजूरकर, वि.प.स.

**विशेष निमंत्रित :**

(२६) श्री.बाळाराम पाटील, वि.प.स.
(२७) श्री.श्रीकांत देशपांडे, वि.प.स.
(२८) श्री.दत्तात्रय सावंत, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

(१) डॉ.अनंत कळसे, प्रधान सचिव
(२) श्री.विलास आठवले, उप सचिव
(३) श्री.प्रकाशचंद्र खोंदले, अवर सचिव
(४) श्री.सचिन बाभळगांवकर, कक्ष अधिकारी
(५) श्री.ह.वि.तामोरे, कक्ष अधिकारी

## पंचायती राज समिती

(सन २०१५-२०१६)

**कार्यकारी समिती प्रमुख**

(१) *श्री.प्रकाश भारसाकळे, वि.स.स.

**सदस्य**

(२) श्री.अनिल गोटे, वि.स.स.
(३) श्री.विकास कुंभारे, वि.स.स.
(४) श्री.भिमराव तापकीर, वि.स.स.
(५) श्री.आर.टी.देशमुख, वि.स.स.
(६) श्री.उन्मेश पाटील, वि.स.स.
(७) श्री.समीर कुणावार, वि.स.स.
(८) श्री.राजेंद्र नजरधने, वि.स.स.
(९) श्री.कृष्णा गजबे, वि.स.स.
(१०) श्री.अनिल बाबर, वि.स.स.
(११) श्री.भरतशेठ गोगावले, वि.स.स.
(१२) श्री.हेमंत पाटील, वि.स.स.
(१३) श्री.राजाभाऊ वाजे वि.स.स.
(१४) ॲड.के.सी.पाडवी, वि.स.स.
(१५) श्री.बसवराज पाटील, वि.स.स.
(१६) श्री.अमित झनक, वि.स.स.
(१७) श्री.राहुल मोटे, वि.स.स.
(१८) श्री.सुरेशभाऊ लाड, वि.स.स.
(१९) श्री.दीपक चव्हाण, वि.स.स.
(२०) श्री.अनिल तटकरे, वि.प.स.
(२१) श्री.संदीप बाजोरिया, वि.प.स.
(२२) श्री.रामहरी रुपनवर, वि.प.स.
(२३) श्री.चंद्रकांत रघुवंशी, वि.प.स.
(२४) **रिक्त
(२५) **रिक्त

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

(१) डॉ.अनंत कळसे, प्रधान सचिव
(२) श्री.विलास आठवले, उप सचिव
(३) श्री.सचिन बाभळगांवकर, कक्ष अधिकारी

* सन २०१५-२०१६ या वर्षासाठी गठीत करण्यात आलेल्या महाराष्ट्र विधानमंडळाच्या पंचायती राज समितीवर मा.अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांनी दिनांक १५ ऑक्टोबर, २०१६ रोजीपासून श्री.प्रकाश भारसाकळे, वि.स.स. यांची “कार्यकारी समिती प्रमुख “ म्हणून नामनियुक्ती केली.

** सन्माननीय समिती प्रमुख श्री.संभाजी निलंगेकर-पाटील, वि.स.स. व श्री.पांडुरंग फुंडकर, वि.प.स. यांचा दिनांक ८ जुलै, २०१६ रोजी मंत्री परिषदेत समावेश झाल्यामुळे रिक्त

## पंचायती राज समिती

(सन २०१५-२०१६)

**समिती प्रमुख**

(१) श्री.संभाजी निलंगेकर-पाटील, वि.स.स.

**सदस्य**

(२) श्री.प्रकाश भारसाकळे, वि.स.स.
(३) श्री.अनिल गोटे, वि.स.स.
(४) श्री.विकास कुंभारे, वि.स.स.
(५) श्री.भिमराव तापकीर, वि.स.स.
(६) श्री.आर.टी.देशमुख, वि.स.स.
(७) श्री.उन्मेश पाटील, वि.स.स.
(८) श्री.समीर कुणावार, वि.स.स.
(९) श्री.राजेंद्र नजरधने, वि.स.स.
(१०) श्री.कृष्णा गजबे, वि.स.स.
(११) श्री.अनिल बाबर, वि.स.स.
(१२) श्री.भरतशेठ गोगावले, वि.स.स.
(१३) श्री.हेमंत पाटील, वि.स.स.
(१४) श्री.राजाभाऊ वाजे वि.स.स.
(१५) ॲड.के.सी.पाडवी, वि.स.स.
(१६) श्री.बसवराज पाटील, वि.स.स.
(१७) श्री.अमित झनक, वि.स.स.
(१८) श्री.राहुल मोटे, वि.स.स.
(१९) श्री.सुरेशभाऊ लाड, वि.स.स.
(२०) श्री.दीपक चव्हाण, वि.स.स.
(२१) श्री.पांडुरंग फुंडकर; वि.प.स.
(२२) श्री.अनिल तटकरे, वि.प.स.
(२३) श्री.संदीप बाजोरिया, वि.प.स.
(२४) श्री.रामहरी रुपनवर, वि.प.स.
(२५) श्री.चंद्रकांत रघुवंशी, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

(१) डॉ.अनंत कळसे, प्रधान सचिव
(२) श्री.विलास आठवले, उप सचिव
(३) श्री.प्रदीप मयेकर, अवर सचिव (समिती)
(४) श्री.सचिन बाभळगांवकर, कक्ष अधिकारी

# प्रस्तावना

मी, पंचायती राज समितीचा 'समिती प्रमुख' या नात्याने समितीने अधिकार दिल्यावरुन पंचायती राज समितीचा नववा अहवाल सादर करीत आहे.

सन २०१७-२०१८ करिता दिनांक ८ सप्टेंबर, २०१७ रोजी समिती गठीत झाली. महाराष्ट्र विधानसभा नियमावलीतील नियम २४० अन्वये विधानमंडळाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या जिल्हा परिषदांच्या वार्षिक प्रशासन अहवालाची तसेच महाराष्ट्रातील पंचायती राज संस्थांच्या लेख्यांवरील लेखापरीक्षा पुनर्विलोकन अहवाल व एकत्रित वित्तीय महसुली लेखे यांच्या परीक्षणाची कामे प्रामुख्याने या समितीकडे सोपविण्यात आलेली आहेत.

शासनाच्या विविध कामकाजाचा वाढलेला व्याप (Enormous range and complexity) लक्षात घेता विधानमंडळाला उपलब्ध वेळेत आपली कर्तव्ये पुरेशा क्षमतेने बजावता येणे अशक्य झाले आहे. शासन यंत्रणेकडे उक्त किचकट प्रशासकीय कामासाठी सक्षम व तज्ञ प्रशासक यंत्रणा उपलब्ध असते. संसदीय लोकशाहीच्या संवर्धनासाठी व यशस्वीतेसाठी शासनाच्या संपूर्ण प्रशासन व्यवस्थेवर सखोल, संपूर्ण, प्रभावी व अर्थपूर्ण असे (effective meaningful) नियंत्रण व देखरेख ठेवण्याची आत्यंतिक गरज आहे आणि म्हणूनच कार्यकारी प्रशासन (Executive) राबवित असलेल्या विविध योजनांचा अभ्यास करण्यासाठी, त्यातील त्रुटी शोधून काढून योजना अंमलबजावणीला व पर्यायाने प्रशासनाला गती देण्यासाठी (Tone of administration) मा.सभापती, विधानपरिषद व मा.अध्यक्ष, विधानसभा यांनी दोन्ही सभागृहाच्या निवडक सदस्यांचा समावेश असलेल्या पंचायती राज समितीचे गठन दिनांक ८ सप्टेंबर, २०१७ रोजी केले. समिती पध्दतीचे वैशिष्ट असे की, सभागृहात पक्षीय ध्येयधोरणांचा सदस्यांवर प्रभाव पडतो. त्या उलट संसदीय लोकशाही पद्धतीमध्ये विधानमंडळाची ही समिती फार मोठ्या मोलाचे कार्य पार पाडीत आहे. ही समिती विधानमंडळाची निर्मिती असून ती सहाजिकच विधानमंडळास दुय्यम आहे. या समितीला सर्व अधिकार विधानमंडळापासूनच प्राप्त झालेले आहेत. (They derive authority from the Legislature) या समितीला "Mini Legislature" सभागृहाची छोटी प्रतिकृती संबोधली जाते. शासनाने राबविलेल्या योजनांच्या अंमलबजावणीला पर्यायाने प्रशासनाला गती देण्यासाठी व प्रशासनावर सातत्याने नियंत्रण व प्रभावीपणे पहारा ठेवण्याचे महत्वाचे काम विधानमंडळाच्या या समितीद्वारे केले जाते. समितीचे कामकाज पक्षविरहित तत्त्वावर (irrespective of party affiliation) चालत असल्यामुळे समिती समोरील बाबी पक्षीय अभिनिवेशरहीत पद्धतीने (Non-Party Basis) विचारात घेण्यात येतात त्यामुळे एखाद्या विषयाचा अभ्यास अत्यंत निःपक्षपातीपणे व तपशिलात जाऊन केला जातो परिणामी त्यास पूर्ण न्याय मिळतो.

शासनाचे एखादे धोरण वा योजना याची आखणी कशी करावी याबाबत समिती सल्ला देऊ शकणार नाही, तथापि शासनाने अंमलात आणलेल्या धोरणांची वा योजनेची फलश्रुती अपेक्षेप्रमाणे होत नसेल वा होणार नसेल तर ही बाब संबंधित समिती सभागृहाच्या नजरेस आणून त्या धोरणात वा योजनेत बदल करण्यासंबंधी शासनास सुचविण्याचे काम करते. समिती पध्दतीचा हा एक विशेष फायदा आहे.

विधिमंडळाप्रती शासनाची जबाबदारी ही मर्यादित स्वरूपाची आहे. संसदीय लोकशाहीमध्ये शासन हे प्रत्येक बाबतीत विधानमंडळाला सर्वतोपरी जबाबदार असते आणि शासनाच्या संपूर्ण प्रशासनावर विधीमंडळाचे नियंत्रण हा संसदीय लोकशाहीचा आत्मा आहे.

समितीचे अधिकार, कार्यकक्षा, प्रशासनावर ठेवावयाचे नियंत्रण, शासनाचे समितीप्रती व विधानमंडळाप्रती असलेले उत्तरदायित्व या सर्वांचा साकल्याने विचार केल्यास समितीचे अधिकार निश्चित व निर्विवादपणे सर्वश्रेष्ठ आहेत. परंतु, योजना राबविण्यापूर्वी वा एखादे धोरण आखण्यापूर्वी प्रशासन यंत्रणेने मंत्रिमंडळाला दिलेल्या सल्ल्याची तपासणी करणे निश्चितच समितीच्या कार्यकक्षेबाहेरील होईल. मात्र योजना अस्तित्वात आल्यानंतर व त्यावर आर्थिक तरतूद करण्यात आल्यानंतर समिती या प्रकरणी संपूर्णपणे व तपशीलवार छाननी करण्यास समर्थ ठरेल. ही योजना अगदी अनावश्यक आहे काय, त्यावर अपेक्षेपेक्षा जास्त खर्च करण्यात आला आहे काय ? योजनेची उद्दीष्टे साध्य झाली आहेत काय? योजना आर्थिकदृष्ट्या सक्षम आहे किंवा कसे, इतकेच काय एखादी योजना आर्थिकदृष्ट्या सक्षम नसल्यास ती बंद करण्यात यावी

व त्याऐवजी दुसरी एखादी योजना आखण्यात यावी या मर्यादेपर्यंत सुध्दा समिती शिफारस करू शकते व त्या अनुषंगाने आवश्यक ती सर्व माहिती समितीला मागविण्याचा अधिकार आहे.

समित्यांचे कामकाज अधिक परिणामकारक करण्यासाठी मा.सदस्यांनी समितीच्या कामात जास्तीत जास्त सहभाग घेणे जरुरीचे आहे. या अहवालात नमूद बाबीसंदर्भात समितीने एक एक प्रश्न हाती घेऊन त्या प्रत्येक प्रश्नावर समाधानकारकरितीने साक्षीपुरावा गोळा केला, तसेच मा. समिती सदस्यांनी आळीपाळीने प्रश्न विचारुन संबंधित अधिकाऱ्यांकडून माहिती मिळविण्याच्या विनिर्दिष्ट पद्धतीचे पालन सुध्दा भेटीच्या वेळी केलेले आहे. एका सदस्यांनी त्यांचा मुद्दा पूर्ण केल्यानंतरच दुसऱ्या सदस्यांनी माहिती विचारण्याची पध्दत जोपासली आहे. या पध्दतीने समितीचे कामकाज सुव्यवस्थित पद्धतीने चालविण्याचा या समितीने प्रयत्न केलेला आहे.

समितीला तिच्याकडे सोपविण्यात आलेल्या विषयावरील मुद्दे तयार करुन आणि त्यांच्या विनिर्दिष्ट क्रमाने त्यांचे परिक्षण करुन विषयाशी संबंधित नियम किंवा कार्यपद्धतीमधील त्रुटी आणि उणिवा शोधून काढतेवेळी समितीचा दृष्टीकोन वस्तुनिष्ठ व विधायक होता. केलेल्या चुका सुधारण्यासाठी किंवा प्रशासकीय पद्धतीत सुधारणा घडविण्याच्यादृष्टीने समितीने अनेक बाबतीत सुधारणात्मक उपाय सुचविलेले आहेत, चुकांची पुनरावृत्ती होऊ नये यासाठी देखील समितीने उपाययोजना सुचविलेल्या आहेत. शासनाच्या प्रतिनिधीप्रती सदस्यांचे वर्तन संयमी आणि सौजन्यशील ठेऊन कोणताही साक्षीदार काही वस्तुस्थिती लपवित असल्याबद्दल दोषी असल्याचे किंवा असहकार दर्शवित असल्याचे आढळून आल्यानंतर समितीने संबंधितांविरुद्ध कारवाईदेखील सुचविली आहे. समितीची बैठक बोलविणे आणि साक्षीदारांना साक्षीसाठी बोलविणे यासंबंधीच्या इतर किरकोळ मुद्यांच्या बाबतीत साक्षीदारांना पुरेसा वेळ देऊन व नोटीस देऊन बोलविण्यात आलेले आहे. थोडक्यात, समिती पध्दती ही अत्यंत उपयुक्त व परिणामकारक असून संसदीय कामकाज प्रणालीमध्ये या पध्दतीचे स्थान व महत्व अनन्य साधारण असेच आहे. संसदीय शासन प्रणाली अधिकाधिक वृध्दिंगत करण्याच्या दृष्टीने या महत्त्वपूर्ण अशा संसदीय समितीच्या कामकाजाचा स्तर उत्तरोत्तर उंचावत नेणे ही आपणा सर्वांची जबाबदारी आहे.

राज्यात समिती जिल्हा परिषदांना भेटी देत असताना समितीला अनेक चांगल्या संकल्पना व राबविलेल्या योजना आढळून आल्या आहेत. त्याचप्रमाणे काही बाबतीत प्रचंड अनियमितता व गैरव्यवहाराची प्रकरणेदेखील आढळून आली आहेत. समितीने चांगल्या बाबींना समर्थन देऊन संबंधितांना प्रोत्साहन दिले. तद्वतच काही अनियमितता किंवा गैरव्यवहाराच्या प्रकरणात समितीने कठोरपणे निर्णयदेखील घेतले आहेत. असे करीत असताना दोषारोपित व्यक्तीवर कारवाई करताना नैसर्गिक न्यायाची पायमल्ली होऊ नये अशा प्रकारच्या सूचनादेखील प्रशासनास केल्या आहेत. लेखा परिक्षणास कागदपत्रे उपलब्ध करुन न देणे अशी असंख्य प्रकरणे समितीला आढळून आली. अशा प्रकरणी समितीने कोणताही मुलाहिजा न ठेवता संबंधितांवर मुंबई स्थानिक निधी लेखा परीक्षा अधिनियमातील तरतुदीनुसार दंडात्मक कारवाईदेखील प्रस्तावित केली आहे. या माध्यमातून शासनखाती दंडाची रक्कम जमा होत असताना संबंधित कर्मचाऱ्यांना जरबदेखील बसविण्याचे काम समितीने केले आहे.

या समितीने ज्या ज्या जिल्ह्यांना भेटी दिल्या आहेत त्या त्या जिल्ह्यातील सर्व पंचायत समित्यांना भेटी देऊन उक्त पंचायत समित्यांच्या प्रशासनिक अहवालावर सखोल चर्चा करुन ज्या बाबतीत दोष आहेत त्या सुधारुन घेण्याबाबत त्यांना उपयुक्त सूचना केल्या आहेत. तसेच पंचायत समित्यांच्या क्षेत्रातील विविध कामांना भेटी देऊन त्याची पाहणी करणे, शालेय पोषण आहार, पुरक पोषण आहार, सार्वजनिक आरोग्य केंद्रे/उपकेंद्रे, पशु वैद्यकीय दवाखाने, रस्ते, जलसिंचनाची कामे, पाणी पुरवठ्याची कामे इत्यादींना भेटी देऊन त्याबाबतही चुकांचे निरसन करुन काही चांगल्या बाबींचे समर्थन करुन संबंधितांना प्रोत्साहितदेखील केले आहे. या अहवालात अशा अनेक बाबींचा उहापोह केला आहे.

सन २०१२-२०१३ च्या वार्षिक प्रशासन अहवालाच्या संदर्भात सन २०१५-२०१६ साठी गठीत झालेल्या समितीने अमरावती जिल्हा परिषदेची सखोल तपासणी केली.

समितीने अमरावती जिल्हा परिषदेस दिनांक ०५, ०६ व ०७ नोव्हेंबर, २०१५ रोजी भेट देऊन श्री. सुनिल पाटील, मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष घेतली.

सन २०१७-२०१८ करिता गठीत झालेल्या समितीने अमरावती जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या तसेच साक्षीच्या वेळी संबंधित अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीच्या आधारे उपस्थित झालेल्या मुद्यांबाबत अधिक माहिती जाणून घेण्याच्या दृष्टीने दिनांक ३ व ४ ऑक्टोबर, २०१७ रोजी जिल्हा परिषद, अमरावती संदर्भात मंत्रालयीन विभागीय सचिवांच्या/ प्रतिनिधींच्या साक्षी घेतल्या.

मंत्रालयीन विभागीय सचिवांचे साक्षीच्या वेळी श्री.श्यामलाल गोयल, अपर मुख्य सचिव, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग, डॉ.प्रदीप व्यास, प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, श्री.असिमकुमार गुप्ता, सचिव, ग्रामविकास विभाग, श्रीमती विनिता वेद सिंगल, सचिव, महिला व बालविकास विभाग, श्री. चंद्रशेखर जोशी, सचिव (रस्ते), सार्वजनिक बांधकाम विभाग, डॉ.सुवर्णा खरात, सह सचिव, शालेय शिक्षण विभाग, श्री.र.प्र.आटे, सह सचिव, शालेय शिक्षण विभाग, श्री.र.अ.नागरगोजे, उप सचिव, ग्रामविकास विभाग, श्री.ना.भा.रिंगणे, उप सचिव, ग्रामविकास विभाग, श्री.संजय बनकर, उप सचिव, ग्रामविकास विभाग, श्री.प्रकाश वळवी, उप सचिव, ग्रामविकास विभाग, श्री.गिरीश भालेराव, उप सचिव, ग्रामविकास विभाग, श्री. संतोष कुमार, सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण तसेच श्री.प्रताप मोहिते, संचालक, स्थानिक लेखा निधी संचालनालय, नवी मुंबई यांनी समितीच्या बैठकींना उपस्थित राहून समितीच्या कामकाजात केलेल्या सहकार्याबद्दल समिती त्यांची आभारी आहे. तसेच जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी व इतर संबंधित अधिकारी यांनी साक्षीच्या वेळी समितीला माहिती पुरवून केलेल्या सहकार्याबद्दल समिती त्यांचीही आभारी आहे.

समितीने कामकाजाचे संक्षिप्त कार्यवृत्त परिशिष्टामध्ये दिले आहे.

वार्षिक प्रशासन अहवालाच्या संदर्भात समितीने भेटी दिलेल्या अमरावती जिल्हा परिषदेच्या कामकाजाची तपासणी करीत असताना समितीला आढळून आलेल्या काही मुद्यांबाबत समितीचे अभिप्राय व शिफारशी अहवालात देण्यात आल्या आहेत.

सन २०१७-२०१८ साठी नव्याने गठीत झालेल्या समितीने दिनांक १९ डिसेंबर, २०१७ रोजीच्या बैठकीत प्रारुप अहवाल विचारात घेऊन संमत केला.

**विधान भवन,**<br>नागपूर,<br>दिनांक : १९ डिसेंबर, २०१७.

**सुधीर पारवे**<br>समिती प्रमुख,<br>पंचायती राज समिती

## अनुक्रमणिका


| अ.क्र. (१) | प्रकरण क्रमांक (२) | विषय (३) | पृष्ठ क्रमांक (४) |
|---|---|---|---|
| (१) | एक | पंडित दिनदयाळ उपाध्याय योजनेच्या प्रभावी अंमलबजावणी बाबत | १ |
| (२) | दोन | शालेय पोषण आहार योजनेत निकृष्ट दर्जाची तुरडाळ आढळून आल्याबाबत (पंचायत समिती, धामणगाव रेल्वे) | ५ |
| (३) | तीन | अमरावती जिल्हा परिषदेतील विविध अधिकारी/कर्मचारी यांची रिक्त पदे भरण्याबाबत | १० |
| (४) | चार | ग्रामीण तिर्थक्षेत्र विकास योजना (पंचायत समिती, चांदूर रेल्वे) | २७ |
| (५) | पाच | जिल्हा परिषद अमरावती अंतर्गत गैरव्यवहार व अपहाराची प्रलंबित प्रकरणे | ३१ |
| (६) | सहा | जिल्हा परिषद शाळांमध्ये शिक्षक व विद्यार्थी यांच्या उपस्थिती संदर्भात बायोमॅट्रीक हजेरी प्रणाली राबविण्याबाबत | ३६ |
| (७) | सात | जिल्हा परिषदेच्या मुद्रणालयाची रक्कम स्वतःच्या नावावर ठेवल्याबाबत | ४२ |
| | | **परिशिष्ट** | |
| | | शासनाचे आदेश व परिपत्रके आणि समितीच्या बैठकीचे संक्षिप्त कार्यवृत्त | ५९ |

## प्रकरण एक

# जिल्हा परिषद, अमरावती (प्रशासन)

### पंडित दिनदयाळ उपाध्याय योजनेच्या प्रभावी अंमलबजावणी बाबत

पंचायती राज समितीने दिनांक ५ ते ७ नोव्हेंबर, २०१५ या कालावधीत अमरावती जिल्हा परिषदेस भेट दिली. भेटीच्या वेळी सन २०१२-१३ या वर्षाच्या वार्षिक प्रशासन अहवालावरील चर्चेदरम्यान अमरावती जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने अशी विचारणा केली की, राज्य सरकारने दिनदयाळ घरकुल योजना सुरु केली आहे. या योजनेतून लाभार्थ्याला जमीन घेण्यासाठी ५० हजार रुपयांपर्यंत मदत देण्यात येते. ज्या लाभार्थ्यांकडे जमीन नाही त्यांना या योजनेचा फायदा होणार आहे. घरकुलाची मागणी लोकप्रतिनिधीमार्फत करण्यात येते. त्यामुळे शासन निर्णयानुसार ज्या लाभार्थ्याकडे जमीन आहे त्यांना घरकुले दिले जाते. जे लाभार्थी पात्र आहेत त्यांचा विचार झाला पाहिजे, यावर मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अमरावती यांनी समितीस अशी माहिती दिली की, राज्य शासनाकडून पंडित दिनदयाल उपाध्याय योजनेमार्फत ५० हजार रूपये जमीन घेण्यासाठी दिले जात आहेत. त्यामुळे जमीनीचा प्रश्न सुटणार आहे.

**यासंदर्भात समितीने साक्षीच्या वेळी ग्रामविकास विभागाकडून खालील माहिती मागविली.**

समितीला अमरावती जिल्हा परिषदेअंतर्गत शासनाच्या विविध घरकुलांच्या योजनेत उद्दिष्ट पूर्ण झाले नसल्याचे निदर्शनास आले आहे. ज्या लाभार्थ्यांकडे जमीन नाही त्यास पंडित दिनदयाळ उपाध्याय योजनेअंतर्गत जागा खरेदीकरीता ५०,००० रुपयांचे अनुदान शासनाकडून दिले जाते. परंतू योजनेचा प्रसार आणि प्रचार झालाच नसल्यामुळे तसेच अधिका-यांना देखील योजना माहित नसल्यामुळे तिचा लाभ नागरिकांना होत नसल्याचे समितीच्या निदर्शनास आले आहे, सबब, या योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीकरीता व या योजनांचा लाभ गरजु व्यक्तीपर्यंत पोचण्याकरीता शासनाने कोणती उपाययोजना आखली आहे ?

**यासंदर्भात समितीस जिल्हा परिषदेकडून उपरोक्त मुदयांची खालील प्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

पंचायती राज समितीने अमरावती जिल्हा परिषदेला दिनांक ०५ ते ०७ नोव्हेंबर दरम्यान भेट दिली त्यावेळी पंडीत दिनदयाळ उपाध्याय योजनेबाबतचा कोणताही शासन निर्णय निर्गमित झालेला नव्हता. त्यामुळे सदर योजनेबाबत त्यावेळी कोणतीही कार्यवाही झालेली नव्हती.

पंडीत दिनदयाळ उपाध्याय घरकुल जागा खरेदी अर्थसहाय्य योजनेबाबत शासन निर्णय दिनांक ३० डिसेंबर, २०१५ ला निर्गमित झाला आहे. सदर शासन निर्णयानुसार प्रत्येक पंचायत समिती स्तरावर गट विकास अधिकारी यांचे अध्यक्षतेखाली समित्या स्थापन करण्यात आलेल्या आहेत. त्याचप्रमाणे आवश्यक ती प्रसिध्दी देण्यासंबंधाने दिनांक १५.०१.२०१६ रोजी सर्व संबंधितांना सुचित करण्यात आले आहे. प्रत्येक पंचायती समितीच्या कार्यालयाबाहेर या संबंधीची माहिती ६ फूट बाय ४ फुट च्या बॅनरव्दारे प्रसिध्द करण्यात आलेली आहे. ग्रामपंचायत स्तरावर दवंडी देवुन माहिती ग्रामस्थांना दिलेली आहे. त्याचप्रमाणे जिल्हा परिषद स्तरावरील सर्व लोकप्रतिनिधींना स्वतंत्र पत्राव्दारे सदरची माहिती देण्यात आलेली आहे.

सदर योजनेचा लाभ मिळण्याकरिता पंचायत समिती स्तरावर एकूण १०९४ अर्ज प्राप्त झाले असुन ज्या लाभार्थ्यांना प्रधानमंत्री आवास योजना, शबरी आवास योजना, रमाई आवास योजना या योजनांमध्ये पात्र असुन केवळ स्वतःचे नावे जागा नाही म्हणून घरकुलाचा लाभ मिळत नाही अशा लाभार्थ्यांना या योजनेमध्ये लाभ दयावयाचा आहे. यामध्ये रुपये ५०,०००/ प्रति लाभार्थी प्रमाणे १८० लाभार्थ्यांचे भौतिक उद्दिष्ट प्राप्त झाले आहे.

**यासंदर्भात ग्रामविकास विभागाकडून उपरोक्त मुद्यांची खालीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

पंडीत दीनदयाळ उपाध्याय योजना अंमलबजावणीसाठी राज्य स्तरावरुन घेण्यात येणाऱ्या प्रकल्प संचालक यांच्या आढावा बैठकीमध्ये वेळोवेळी मार्गदर्शन करण्यात येते. तसेच जिल्हा स्तरावरुन घेण्यात येणाऱ्या गटविकास अधिकारी यांच्या आढावा बैठकीमध्ये पंडीत दिनदयाळ उपाध्याय घरकुल जागा खरेदी अर्थसहाय्य योजनेबाबत मार्गदर्शन केले जाते.

सन २०१६-१७ मध्ये तालुका स्तरावर दर महिन्याच्या दुसऱ्या बुधवारी "आवास दिवस" चे आयोजन केले जाते. सदर दिवशी पंडित दिनदयाळ उपाध्याय घरकुल जागा खरेदी अर्थसहाय्य योजना ही गरजू व्यक्तींपर्यंत पोहचविणेचे नियोजन केलेले आहे. तसेच सदर योजनेची IEC हि राज्य स्तरावर गाव स्तरापर्यंत करणेची कार्यवाही सुरु आहे.

**चौकशी अहवाल**

सन २०१५-१६ अंतर्गत इंदिरा आवास योजनेचे ५१५६ उद्दिष्ट प्राप्त झालेले होते. सदर उद्दिष्ट १००% पुर्ण करण्यात आलेले आहे. तसेच रमाई आवास योजने अंतर्गत १३०५ उद्दिष्ट प्राप्त झाले असुन उद्दिष्टाएवढे पात्र लाभार्थी उपलब्ध असुन मंजुरीची कार्यवाही सुरु आहे. पंचायती राज समितीने अमरावती जिल्हा परिषदेला दिनांक ०५ ते ०७ नोव्हेंबर चे दरम्यान भेट दिली, त्यावेळी पंडीत दिनदयाळ उपाध्याय योजनेबाबतचा कोणताही शासन निर्णय निर्गमित झालेला नव्हता, त्यामुळे सदर योजने बाबत त्यावेळी कोणतीही कार्यवाही झालेली नव्हती.

पंडीत दिनदयाळ उपाध्याय घरकुल जागा खरेदी अर्थसहाय्य योजनेबाबतचा विस्तृत शासन निर्णय दिनांक ३० डिसेंबर, २०१५ **(परिशिष्ट १.१)** ला निर्गमित झाला. सदर निर्णयाच्या अनुषंगाने सर्व गटविकास अधिकारी, पंचायत समिती यांना दिनांक १५ जानेवारी, २०१६ ला विस्तृत सूचनेसह व शासन निर्णयाचे प्रतीसह कळविण्यात आले आहे तसेच सन्मा. मा.अध्यक्ष जि.प., मा.उपाध्यक्ष जिल्हा परिषद व सन्मा.सदस्य जि.प. यांना सदर शासन निर्णयाच्या प्रती देण्यात आल्या आहेत.

दिनांक ३० डिसेंबर, २०१५ चे शासन निर्णयानुसार प्रत्येक पंचायत समिती स्तरावर गटविकास अधिकारी यांचे अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्यात आली असुन सदर समितीमध्ये नायब तहसिलदार व उप अभियंता, सदस्य तसेच तालुका निरिक्षक-भुमी अभिलेख, उपनिबंधक, City Survey Officer व सहाय्यक प्रकल्प अधिकारी इ. निमंत्रक आहेत.

पंचायत समिती स्तरावर सदर समितीकडे मार्च, अखेर १०९४ प्रस्ताव प्राप्त झाले असून प्राप्त प्रस्तावाची शासन निर्णयानुसार कार्यवाही सुरु आहे.

**विभागीय सचिवांची साक्ष**

समितीने अमरावती जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्यावर अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने दिनांक ४ ऑक्टोबर, २०१७ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की, पंडित दीनदयाळ उपाध्याय योजनेंतर्गत जागा खरेदीकरिता ५० हजार रुपयांचे अनुदान शासनाकडून दिले जाते. परंतु या योजनेचा प्रसार आणि प्रचार झाला नसल्यामुळे तसेच अधिकाऱ्यांना देखील ही योजना माहित नसल्यामुळे या योजनेचा लाभ नागरिकांना होत नसल्याचे निदर्शनास आले. या योजनेचा लाभ गरजू व्यक्तिपर्यंत पोहचविण्याकरिता कोणती उपाययोजना आखली आहे, यावर मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अमरावती यांनी समितीस विदित केले की, पंडित दिनदयाळ उपाध्याय घरकुल जागा खरेदी अर्थसहाय्य योजनेबाबत शासन निर्णय दिनांक ३० डिसेंबर, २०१५ रोजी निर्गमित झाला. या शासन निर्णयाची सर्व पंचायत समिती स्तरावर प्रसिध्दी दिलेली आहे. शासनाने दिनांक १४ जुलै, २०१७ रोजी नवीन शासन निर्णय काढलेला आहे. यावर्षी अर्थ सहाय्य प्राप्त झालेले आहे. आता या योजनेची पंचायत स्तरावर प्रसिध्दी झालेली आहे.

समितीने पुढे अशी विचारणा केली की, या योजनेअंतर्गत आतापर्यंत किती लाभार्थ्यांना लाभ दिलेला आहे. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अमरावती यांनी समितीस विदित केले की, अमरावती जिल्हयात एकूण १४ पंचायत समित्या आहेत. त्यांच्याकडून प्रस्ताव आले होते. परंतु त्यामध्ये काही त्रुटी असल्यामुळे सुधारित नमुन्यामध्ये प्रस्ताव मागितलेले आहेत. यावर समितीने पुढे अशी विचारणा केली की, पंडित दीनदयाळ उपाध्याय योजनेंतर्गत एका लाभार्थ्यास ५० हजार रुपये देण्यात येतात. सद्य:स्थितीत अमरावती जिल्हयात किती लाभार्थ्यांना या योजनेचा लाभ दिलेला आहे. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अमरावती यांनी समितीस विदित केले की, दिनांक १४ जुलै, २०१७ **(परिशिष्ट १.२)** रोजीचा सुधारित शासन निर्णय आहे. या निर्णयानुसार सुधारित नमुन्यामध्ये अर्ज मागविलेले आहेत.

त्यानुसार भातुकली पंचायत समितीमधून १० लाभार्थ्यांचे प्रस्ताव आलेले आहेत तर नांदगाव-खांडेश्वर पंचायत समितीमधून १०२ प्रस्ताव प्राप्त आहेत. या महिन्यात प्राप्त झालेल्या अर्थ सहाय्याचे वाटप करणार आहोत. यावर समितीने पुढे अशी विचारणा केली की, सन २०१५ ते २०१७ या दोन वर्षात लाभार्थ्यांना पैसे दिले काय, यावर मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अमरावती यांनी समितीला विदित केले की, नाही. कारण निधी प्राप्त झाला नव्हता. आता २ कोटी ११ लाख रुपये प्राप्त झालेले आहेत. भातुकली आणि नांदगांव-खांडेश्वर या तालुक्यातील लाभार्थ्यांना लाभ देणार आहोत.

समितीने पुढे अशी विचारणा केली की, पंडित दिनदयाळ उपाध्याय घरकुल जागा खरेदी संदर्भातील शासन निर्णय ३० डिसेंबर, २०१५ रोजी काढण्यात आला. आपल्याकडे लाभार्थ्यांचे अर्ज केव्हा प्राप्त झाले याची पंचायत समितीनिहाय माहिती द्यावी. पंचायत समिती स्तरावर गट विकास अधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली समिती असते. त्या समितीकडे केव्हा अर्ज प्राप्त झाले, त्या अर्जास जिल्हा स्तरावर केव्हा मंजुरी मिळाली आणि शासनाकडे मागणी केव्हा केली, यावर मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अमरावती यांनी समितीस विदित केले की, जुन्या शासन निर्णयानुसार पात्र लाभार्थी मिळत होते. दिनांक १४ जुलै, २०१७ रोजीच्या नवीन शासन निर्णयानुसार नमुन्यात माहिती सादर करावयाची आहे. यावर समितीने पुढे अशी विचारणा केली की, जिल्हा स्तरावर लाभार्थ्यांची नावे मंजूर केल्यानंतर शासनाकडे निधीची मागणी केव्हा केली, अमरावती जिल्हयात एकूण १४ तालुके आहेत. त्यातील एक-दोन तालुके वगळता बाकीच्या तालुक्यांमधून काहीच मागणी दिसत नाही. याचा अर्थ मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी आपली जबाबदारी नीट पार पाडलेली नाही. या योजनेचा जिल्हयात प्रसार आणि प्रचार करावयास पाहिजे होता तो झालेला नाही असे सकृतदर्शनी दिसते. या योजनेचा लाभ घेण्यासाठी जिल्हा स्तरावर किती अर्ज आले याची आपणास माहिती नाही. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अमरावती यांनी समितीस विदित केले की, अन्य तालुक्यातून म्हणजे मोर्शी, वरुड, दर्यापूर या तालुक्यांतून देखील अर्ज आलेले आहेत. हे सर्व अर्ज त्या त्या तालुक्यांतील गट विकास अधिकारी यांचेकडे आले होते. परंतु त्या अर्जामध्ये त्रुटी असल्यामुळे ते अर्ज परत केलेले आहेत. भातुकली तालुक्यातुन १० लाभार्थ्यांचे आणि नांदगांव-खांडेश्वर या तालुक्यातुन १०२ लाभार्थ्यांचे अर्ज प्राप्त झालेले आहेत. या संदर्भात शासनाची समिती आहे. या योजनेचे पैसे जिल्हाधिकारी यांचेकडे वर्ग करणार आहोत. या संदर्भात गट विकास अधिकारी यांनी सूचना केलेल्या आहेत तसेच वारंवार आढावा देखील घेतलेला आहे. याबाबतचा निर्णय गट विकास अधिकारी यांच्या अध्यक्षतेखालील समितीने घ्यावयाचा आहे. लाभार्थ्यांनी नमुन्यामध्ये अर्ज करावयाचे आहेत. या महिन्यात ही कार्यवाही पूर्ण करण्यात येईल. यावर समितीने पुढे अशी विचारणा केली की, अनेक लाभार्थी घरकुल योजनेसाठी पात्र आहेत. परंतु त्यांच्याकडे स्वत:ची जागा नसल्यामुळे त्यांना घरकूल योजनेचा लाभ मिळत नाही. अशा लाभार्थ्यांना जागा खरेदी करण्यासाठी ५० हजार रुपये देण्याची योजना आणली. परंतु जागा मिळत नाही ही मुख्य अडचण आहे. कारण ५० हजार रुपयांमध्ये गावालगतची जागा मिळू शकत नाही. जर गावापासून लांब जागा घेतली तर तो मूलभूत सुविधांपासून वंचित राहतो. समितीची अशी सूचना आहे की, पंडित दीनदयाळ उपाध्याय योजनेची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यासाठी आणि लाभार्थ्यांना गावाजवळ जागा उपलब्ध करुन द्यायची असेल तर या विषयाच्या संदर्भात महसूल विभाग, सामाजिक न्याय विभाग, आदिवासी विकास विभाग, समाज कल्याण विभाग आणि ग्राम विकास विभाग या विभागांच्या सचिवांची एकत्रित साक्ष बोलवावी. समितीच्या मते हा विषय महत्वाचा आहे यामध्ये दुमत असण्याचे काही कारण नाही. समिती अमरावती जिल्हयातील लाभार्थ्यांची माहिती घेत आहे. अमरावती जिल्हयात जी परिस्थिती आहे तशीच परिस्थिती राज्यातील अन्य जिल्हयांत देखील असू शकते. तेव्हा राज्याचा विचार करुन मुख्य सचिव आणि संबंधित विभागांच्या सचिवांकडून माहिती घेऊन पंडित दिनदयाळ उपाध्याय योजनेची राज्य स्तरावरील माहिती समितीला देण्यात यावी असे निदेश समितीने दिले.

## अभिप्राय व शिफारशी

पंचायती राज समितीने दिनांक ५ ते ७ नोव्हेंबर, २०१५ या कालावधीत अमरावती जिल्हा परिषदेला भेट दिली. सन २०१२-१३ या वर्षाच्या वार्षिक प्रशासन अहवालावरील चर्चेदरम्यान इंदिरा आवास योजनेचे उद्दिष्ट पूर्ण करण्याकरीता बऱ्याच लाभार्थ्यांकडे जमीन नसल्यामुळे पूर्ण होत नसल्याचे समितीच्या निदर्शनास आले. शासनाने पंडीत दिनदयाळ उपाध्याय घरकुल जागा खरेदी अर्थसहाय्य योजना सुरु करण्याचा शासनाने निर्णय घेतलेला आहे. परंतू राज्यातील जनतेला

तसेच बऱ्याच अधिकाऱ्यांना देखील ही योजना माहिती नसल्यामुळे आणि तिचा प्रसार आणि प्रचार झाला नसल्यामुळे सदर योजनेचा लाभ गरजू व बेघरांना होत नव्हता. समितीने सदर योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी कोणत्या उपाययोजना आखल्या आहेत या संदर्भात विभागीय सचिवांची साक्ष घेतली.

सन २०१५ च्या अर्थसंकल्पिय अधिवेशनात राज्याच्या अर्थमंत्र्यांनी पंडीत दिनदयाळ उपाध्याय घरकुल जागा खरेदी अर्थसहाय्य योजना ही अत्यंत महत्वाकांक्षी योजना राज्यामध्ये अंमलात आणण्याची घोषणा केली. तद्नंतर दिनांक ३० डिसेंबर, २०१५ रोजी योजनेबाबतचा सविस्तर शासन निर्णय निर्गमित करण्यात आला. त्यामुळे समितीने ज्या कालावधीत जिल्हा परिषदेला भेट दिली त्या कालावधीत सदरहू योजना अंमलात आलेली नव्हती, परंतू तद्नंतरच्या काळात जिल्हा परिषदेने सदर योजनेला व्यापक स्वरूपात प्रसिध्दी दिलेली आहे.

सदर योजनेचा लाभ मिळण्यासाठी १०९४ अर्ज प्राप्त झाले. परंतू जिल्हा परिषदेला केवळ १८० लाभार्थ्यांचे भौतिक उद्दिष्ट प्राप्त झाले. याचा अर्थ ९०० हून अधिक लाभार्थी लाभापासून अजूनही वंचित आहेत. त्यामुळे प्राप्त झालेल्या अर्जाच्या अनुषंगाने लाभार्थ्यांचे ज्या अर्जदारांकडे स्वतःच्या घरासाठी जागा उपलब्ध नाही अशा सर्व अर्जदारांना पंडीत दिनदयाळ उपाध्याय योजनेअंतर्गत लाभ देणे आवश्यक आहे.

पंडीत दिनदयाळ उपाध्याय घरकुल जागा खरेदी अर्थसहाय्य योजनेच्या संदर्भात प्रथम दिनांक ३० डिसेंबर, २०१५ च्या शासन निर्णयानुसार जिल्हा परिषदेकडे १०९४ प्रस्ताव प्राप्त झाले. शासनाने नंतर दिनांक १४ जुलै, २०१७ रोजी नव्याने शासन निर्णय निर्गमित करुन लाभार्थ्यांकडून सुधारीत नमुन्यामध्ये प्रस्ताव मागविले आहेत. अमरावती जिल्ह्यात एकूण १४ पंचायत समित्या असून केवळ भातुकली व नांदगाव खांडेश्वर या दोन पंचायत समित्यांमधून अनुक्रमे १० व १०२ सुधारीत प्रस्ताव झाले आहेत. जिल्हा परिषदेकडे १८० लाभार्थ्यांचे भौतिक उद्दिष्ट असताना शासनाने सुधारीत नमुना दिल्यामुळे त्याद्वारे केवळ ११२ प्रस्ताव जिल्हा परिषदेकडे प्राप्त झाले आहेत. समितीच्या साक्षीपर्यंत जिल्हा परिषदेला प्राप्त झालेल्या २ कोटी ११ लाख रुपयांचा निधी सदर योजनेवर खर्च होऊ शकलेला नव्हता. याबाबत समिती तीव्र चिंता व्यक्त करते. **मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस आश्वासित केल्याप्रमाणे याच आर्थिक वर्षात सदर निधी खर्च करुन जिल्हा परिषदेला दिलेले योजनेचे भौतिक उद्दिष्ट पूर्ण करावे. तसेच उक्त योजने अंतर्गत ज्या लाभार्थ्यांकडे घरकुलासाठी स्वतःची जागा उपलब्ध नाही अशांना एक तर सरकारची जागा किंवा तेही नसल्यास पंडीत दिनदयाळ उपाध्याय योजने अंतर्गत प्रत्येकी रुपये ५०,०००/- (रुपये पन्नास हजार) निधी त्वरेने उपलब्ध करुन देऊन बेघरांना घरे देण्याच्या दृष्टीने तातडीने कारवाई करावी व केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस दोन महिन्यात पाठविण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

-------------------

## प्रकरण दोन

## जिल्हा परिषद, अमरावती

### शालेय पोषण आहार योजनेत निकृष्ट दर्जाची तुरडाळ आढळून आल्याबाबत

### (पंचायत समिती धामणगाव रेल्वे)

पंचायती राज समितीने दिनांक ५ ते ७ नोव्हेंबर, २०१५ या कालावधीत अमरावती जिल्हा परिषदेस भेट दिली. भेटीच्या वेळी सन २०१२-१३ या वर्षाच्या वार्षिक प्रशासन अहवालावरील चर्चेदरम्यान अमरावती जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने अशी विचारणा केली की, शालेय पोषण आहाराची तुरडाळ निकृष्ट दर्जाची असल्याचे समितीला आढळून आले. शालेय पोषण आहाराच्या धान्याचा पुरवठा कोणामार्फत केला जातो, यावर गट विकास अधिकारी यांनी समितीस विदित केले की, महाराष्ट्र स्टेट को.ऑप. मार्केटिंग फेडरेशन मार्फत धान्याचा पुरवठा केला जातो. यावर समितीने असे मत व्यक्त केले की, माल प्राप्त झाल्यानंतर संबंधितांनी माल निकृष्ट दर्जाचा असल्याचे पुरवठादाराच्या निदर्शनास आणून दिलेले नाही किंवा वरिष्ठ अधिकाऱ्यांना देखील कळविलेले नाही. याबाबत संबंधितांकडून खुलासा घ्यावा. शाळेतील तुरडाळीचा जुना स्टॉक खराब झालेला आहे. तो नष्ट करावयाचा आहे, असे सांगण्यात आलेले आहे. माल प्राप्त झाल्यानंतर संबंधितांनी तो तपासून घेतला पाहिजे आणि माल निकृष्ट दर्जाचा असेल तर वरिष्ठ अधिकाऱ्यांना तसे कळविले पाहिजे. यावर प्रभारी गट शिक्षणाधिकारी यांनी समितीस सांगितले की, शाळा व्यवस्थापन समितीला माल चांगला नसल्याचे आढळून आले तर त्या मालाचे नमुने तपासणीसाठी पाठविले जातात.

**यासंदर्भात समितीने साक्षीच्या वेळी ग्रामविकास विभागाकडून खालील माहिती मागविली.**

१. समितीने मौजे वडगांव (राजदी) ता. धामणगाव रेल्वे, जि.अमरावती येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेस भेट दिली असता शालेय पोषण आहार योजनेकरिता पुरवठा करण्यात आलेली तुरडाळ निकृष्ट दर्जाची असल्याचे समितीस आढळून आले. त्याबाबत सदरहू पोषण आहार योजनेत पुरवठा झालेला माल निकृष्ट दर्जाचा असल्याबाबत संबंधित अधिकाऱ्यांनी निदर्शनास आणुन देणे आवश्यक होते. त्यांचा खुलासा मागविण्यात यावा असे निदेश समितीने दिलेले आहेत. त्यानुसार खुलासा मागविण्यात आला आहे काय, दोषींवर कोणती कारवाई करण्यात आली आहे?

२. शालेय पोषण आहारातील वस्तुंचा (उदा.डाळ, तांदुळ, तेल इ.) पुरवठा पुरवठादाराकडुन करताना कोणती पध्दत अवलंबली जाते ? या पध्दतीत वस्तुंचा नियमानुसार पुरवठा होत नाही हे खरे आहे काय, असल्यास, या पध्दतीत सुधारणा करण्याचा शासनाचा मानस आहे काय याबाबत सविस्तर माहिती विशद करावी.

३. शालेय पोषण आहार योजनेत निकृष्ट दर्जाच्या मालाचा पुरवठा करण्यात आला असता त्यावर नियंत्रण ठेवणे इत्यादी करिता कोणती कार्यवाही करण्यात येते ?

४. सध्या अस्तिवात असलेली शालेय पोषण आहार योजनेतील मालाची गुणवत्ता चाचणी कशी केली जाते यामध्ये आणखी सुधारणा करण्याकरीता शासन कोणती उपाययोजना करीत आहे ?

**यासंदर्भात समितीस जिल्हा परिषदेकडून उपरोक्त मुद्दयांची खालील प्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

१) शालेय पोषण आहार योजनेअंतर्गत निकृष्ट दर्जाची तुरडाळ आढळून आल्याबाबत शिक्षणाधिकारी (प्राथ.) जिल्हा परिषद, अमरावती यांचे पत्र क्र. जिपअम/शिक्षण/शापोआ/ ४५९८/ २०१६ दिनांक ०५/०५/२०१६ अन्वये गटशिक्षणाधिकारी पंचायत समिती, धामणगांव रेल्वे यांचे पत्र यांचे पत्र २७७३ दिनांक १९/५/२०१६ अन्वये संबंधित मुख्याध्यापक यांच्या खुलाशासह अहवाल प्राप्त झाला. प्राप्त अहवालानुसार वेळोवेळी पुरवठा झालेली डाळ ही खिचडी शिजविण्यापुर्वी डोळ, खडे व कचरा काढुन स्वच्छ करण्यात येत होती. डाळ स्वच्छ करताना अशी वेगळी निघालेली निकृष्ट डाळ स्वच्छ डाळीपासून वेगळी ठेवण्यात येत होती. या डाळीचा खिचडी शिजविण्यासाठी वापर करण्यात येत नव्हता. तथापि नियमितपणे खाण्यास अयोग्य असलेली व अस्वच्छ तूरदाळ नष्ट न करणे, अयोग्य व स्वच्छता विषयक निर्देशांचे पालन न करुन कर्तव्यात कसुर केल्याने श्री. राजेंद्र ठाकरे, मुख्याध्यापक, जिल्हा परिषद शाळा, वडगाव राजदी ता.धामणगाव रेल्वे यांची आदेश क्रमांक ११२०१ दिनांक २०.१२.२०१६ अन्वये एक वेतनवाढ थोपविण्यात आली आहे.

२) योजनेच्या पात्र शाळांच्या मागणी नुसार पुरवठाधारक शालेय पोषण आहारातील वस्तुंचा (उदा. डाळ, तांदूळ, तेल इत्यादी) पुरवठा करतात. पुरवठा संबंधीच्या पावतीवर गटाचे व जिल्हयाचे नाव, पुरवठयाचा दिनांक, वाहन क्रमांक इत्यादी तपशील असतो. माल योग्य वजनाचा, दर्जाचा व सुस्थीतीत प्राप्त झाल्याची पोच मुख्याध्यापक पुरवठा धारकास देतो. परिपत्रक क्र.शापोआ/सुधायो/प्रशिस/३०३/२०११/१२/७१७७(अ)/ दिनांक १/११/२०११ व करारनामा दिनांक ११/०६/२०१४ नुसार वस्तुंचा नियमानुसार पुरवठा होत आहे.

३) शालेय पोषण आहार योजनेत निकृष्ट दर्जाच्या मालाचा पुरवठा करण्यात आला असता त्यावर नियंत्रण ठेवणे इत्यादीकरिता पात्र शाळांना संबधीत स्थानिक शाळेची शालेय पोषण आहार समिती, केंद्राचे केंद्रप्रमुख, विस्तार अधिकारी, अधिक्षक (शालेय पोषण आहार), गटशिक्षणाधिकारी यांचेमार्फत शाळांना भेटी देवून मुख्याध्यापकांना मार्गदर्शन करुन नियंत्रण ठेवले जाते. तसेच पुरवठा धारकाने शाळा स्तरावर पुरवठा केलेला माल निकृष्ट दर्जाचा असल्यास संबंधित शाळेच्या मुख्याध्यापकांनी पुरवठाधारकास व वरीष्ठ कार्यालयास ५ दिवसात लेखी कळविणे आवश्यक आहे. माल निकृष्ट दर्जाचा आढळल्यास त्यानंतर पुरवठादाराने पाच दिवसात पुरवठा करणे आवश्यक असते. पुरवठा न केल्यास मुख्याध्यापकाने खुल्या बाजारातून माल विकत घेवून तेवढया रक्कमेवर पुरवठादारास १० % दंड आकारण्यात येतो.

पुरवठा धारकाने शाळा स्तरावर धान्यादि माल पुरविल्यानंतर तालुका स्तरावरील गटशिक्षणाधिकारी/केंद्रप्रमुख/ अधिक्षक (शापोआ) हे ऐच्छीक पध्दतीने मालाचे नमुने घेवून सिलबंद करुन सदर नमुने शासकीय प्रयोगशाळेत मालाची तपासणी करण्यासाठी पाठविण्यात येतात. शासकीय प्रयोगशाळेचा सर्व तालुक्यांचा तपासणी अहवाल (सर्व तालुक्याचा) समाधानकारक असल्यानंतरच देयकाची रक्कम पूर्णतः अदा केली जाते.

४) सध्या अस्तित्वात असलेली शालेय पोषण आहार योजनेतील मालाची गुणवत्ता चाचणी पूरवठाधारकाने धान्यादी मालाचा पुरवठा केल्यानंतर रसायनतज्ञ, शासकिय प्रयोगशाळेत (District Health Lab) तपासणी केली जाते.

**यासंदर्भात शालेय शिक्षण विभागाकडून उपरोक्त मुद्दयाची खालील प्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

शालेय पोषण आहार योजनेंतर्गत पुराविण्यात येत असलेल्या धान्यादि मालाच्या दर्जाबाबत विचारविनिमय करण्यासाठी अपर मुख्य सचिव (वित्त विभाग) यांच्या अध्यक्षतेखाली विविध विभागाच्या सचिवांचा समावेश असणारी सचिव समिती गठित करण्यात आलेली होती. सदर समितीने घेतलेल्या निर्णयानुसार या योजनेंतर्गत चांगल्या दर्जाच्या मालाचा पुरवठा होण्यासाठी खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात येत आहेत.

१) शालेय पोषण आहाराच्या दर्जावर जास्तीत जास्त नियंत्रण ठेवण्याचा प्रयत्न करावा. यासाठी प्रत्येक शाळेत दररोज एक पालक मुलांसोबत शालेय पोषण आहार घेईल व सदर पालक मोबाईलवरुन एस.एम.एस.व्दारे संबंधित गटशिक्षणाधिकाऱ्याला आहाराचा दर्जा व आहारातील धान्यादि मालाचे प्रमाण इ.बाबत अहवाल सादर करील. संबंधित गटशिक्षणाधिकारी प्रत्येक आठवडयाचे अहवाल तपासून ज्या शाळेतील आहाराबाबत तक्रार असेल अशा शाळांचे अहवाल एकत्रित करुन दर आठवडयाचा अहवाल शिक्षणाधिकारी (प्राथ.) यांना सादर करेल. ज्या शाळांमध्ये आहाराबाबत तक्रार असेल अशा शाळेची धान्यादि मालाची देयके अदा करु नये, असे निर्देश देण्यात आले आहेत.

२) जास्तीत जास्त पुरवठेदारांना निविदेत भाग घेणे शक्य व्हावे व यामुळे पुरेशी स्पर्धा घेऊन विद्यार्थ्यांना चांगल्या दर्जाचा आहार मिळावा यासाठी जिल्हानिहाय निविदा प्रक्रिया राबविण्यात आली आहे.

## चौकशी अहवाल

१) गटशिक्षणाधिकारी, पंचायत समिती, धामणगांव रेल्वे यांचे पत्र क्र.पं.स.धा.रे./ शिक्षण/शापोआ/२७७३/२०१६,दिनांक १९.०५.२०१६ अन्वये मौजे-वडगांव (राजदी), ता. धामणगांव रेल्वे, जि.अमरावती या शाळेस शालेय पोषण आहार योजनेकरीता तुरडाळीचा पुरवठा पुरवठादारामार्फत करण्यात आल्यानंतर तुरडाळी मधील खाण्या अयोग्य असलेली म्हणजेच खडे, कचरा मिश्रीत अस्वच्छ गाळलेली तुरडाळ वेगळी काढून स्वच्छ केलेली तुरडाळीचा वापर आहाराकरिता करण्यात आला. वेगळी

काढून ठेवलेली अस्वच्छ तुरडाळ आहाराकरिता वापरण्यात येत नव्हती. तथापि मुख्याध्यापकांनी नियमितपणे खाण्यास अयोग्य असलेली व अस्वच्छ तुरडाळ नष्ट न करणे, आरोग्य व स्वच्छता विषयक निर्देशांचे पालन न करून कर्तव्यात कसूर केल्याने श्री.राजेंद्र ठाकरे, मुख्याध्यापक, जि.प.शाळा वडगांव (राजदी) यांची आदेश क्रं.११२०१ दि.२०.१२.२०१० अन्वये एक वेतनवाढ थोपविण्यात आली आहे.

२) शालेय पोषण आहार योजने अंतर्गत शाळा स्तरावर पटसंख्येनुसार आहाराकरिता आवश्यक तांदूळ व धान्यादी मालाची मागणी पंचायत समिती मार्फत पुरवठादारास व शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जि.प.अमरावती यांच्याकडे सादर करण्यात येते व परिपत्रक क्रं.शापोआ/ सुधायो/ प्रशिस/३०३/२०११/१२/७१७७(अ)/दिनांक ०१.११.२०११ व करारनामा दिनांक ११.०६.२०१४ नुसार वस्तुंचा नियमानुसार पुरवठा होत आहे.

३) परिपत्रक क्र. शापोआ/सुधायो/प्रशिस/३०३/२०११/१२/७१७७(अ)/ दिनांक ०१.११.२०११ व करारनामा दिनांक ११.०६.२०१४ मधील अट क्र.२८ नुसार पुरवठादाराने पुरवठा केलेला माल निकृष्ट दर्जाचा असल्यास पाच दिवसामध्ये तो बदलून देण्यात येतो. जर तो माल बदलून दिला नाही तर त्या मालाची देयके अदा करण्यात येत नाही. तसेच बदलून न दिलेल्या माला ऐवजी खुल्या बाजारातून मालाची खरेदी करण्यात येते. त्यासाठी येणारा अतिरिक्त खर्च पुरवठादाराच्या देयकातून/सुरक्षा अनामत रकमेतून वसूल करण्यात येतो. तसेच निकृष्ट मालाचा पुरवठा होवू नये याकरिता खालील प्रकारे नियंत्रण ठेवण्यात येते.

अ) शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जि.प.अमरावती कार्यालयाकडून पुरवठादारास FCI कडून प्राप्त तांदुळ आणि पुरवठादाराने पुरवठा करण्यासाठी खरेदी केलेल्या धान्यादी मालाची प्रतवारी तपासणीसाठी मालाचे नमुने जिल्हा प्रयोग शाळेत (District Public Health Laboratory, Amravati) पाठविण्यात येतात व त्यानंतर मालाचा पुरवठा शाळा स्तरावर करण्यासाठी सुरूवात होते.

ब) पुरवठादाराकडून शाळा स्तरावर माल पुरविण्यात आल्यानंतर तालुका स्तरावरील अधिकाऱ्यांकडून (गटशिक्षणाधिकारी/ अधिक्षक (शापोआ) शाळेतील तांदुळ व धान्यादी मालाचे नमुने घेवून खाण्यास योग्य असल्याबाबतचा जिल्हा प्रयोग शाळेचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर पुरवठादाराची देयके ही जिल्हा स्तरावर सादर करण्यात येतात.

क) शाळा स्तरावर शालेय पोषण आहार योजनेचे संनियंत्रणासाठी शाळा व्यवस्थापन समितीची स्थापना झाली असून या योजनेवर शाळा व्यवस्थापन समितीचे नियंत्रण राहते.

४) सद्या अस्तित्वात असलेली शालेय पोषण आहार योजनेतील मालाची गुणवत्ता चाचणी पुरवठाधारकाने धान्यादी मालाचा पुरवठा केल्यानंतर शासकीय प्रयोग शाळेमध्ये (District Public Health Laboratory, Amravati) केली जाते.

मौजे-वडगांव (राजदी), ता.धामणगांव रेल्वे, जि.अमरावती या शाळेमध्ये पोषण आहार योजनेची तुरडाळ प्राप्त झाल्यानंतर त्या मधील अस्वच्छ खडे व कचरा असलेली तुरडाळ नष्ट न करणे, आरोग्य व स्वच्छता विषयक निर्देशाचे पालन न करून कर्तव्यात कसूर केल्याने श्री.राजेंद्र ठाकरे, मुख्याध्यापक, जि.प.शाळा वडगांव (राजदी), ता.धामणगांव रेल्वे, जि. अमरावती यांची मा.शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जि.प.अमरावती यांचे आदेश क्र.जिपअ/शि/खाचौ/ ११२०७, दि.२०.१२.२०१६ अन्वये एक वेतनवाढ रोखण्यात आली आहे.

## विभागीय सचिवांची साक्ष

समितीने अमरावती जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्यावर अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने दिनांक ४ ऑक्टोबर, २०१७ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की, समितीने मौजे वडगांव (राजदी) ता. धामणगाव रेल्वे, जि.अमरावती येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेस भेट दिली असता शालेय पोषण आहार योजनेकरिता पुरवठा करण्यात आलेली तुरडाळ निकृष्ठ दर्जाची असल्याचे समितीस आढळून आले. त्याबाबत सदरहू पोषण आहार योजनेत पुरवठा झालेला माल निकृष्ठ दर्जाचा

असल्याबाबत संबंधित अधिकाऱ्यांनी निदर्शनास आणून देणे आवश्यक होते. त्यांचा खुलासा मागविण्यात यावा असे निदेश समितीने दिलेले आहेत. त्यानुसार खुलासा मागविण्यात आला आहे काय, दोषींवर कोणती कारवाई करण्यात आली आहे. शालेय पोषण आहारातील वस्तूंचा (उदा. डाळ, तांदुळ, तेल इ.) पुरवठा पुरवठादाराकडून करतांना कोणती पध्दत अवलंबली जाते, या पध्दतीत वस्तूंचा नियमानुसार पुरवठा होत नाही हे खरे आहे काय, असल्यास या पध्दतीत सुधारणा करण्याचा शासनाचा मानस आहे काय, शालेय पोषण आहार योजनेत निकृष्ट दर्जाच्या मालाचा पुरवठा करण्यात आला असता त्यावर नियंत्रण ठेवणे इत्यादी करिता कोणती कार्यवाही करण्यात येते. सध्या अस्तित्वात असलेली शालेय पोषण आहार योजनेतील मालाची गुणवत्ता चाचणी कशी केली जाते यामध्ये आणखी सुधारणा करण्याकरीता शासन कोणती उपाययोजना करीत आहे, यावर सह सचिव, शालेय शिक्षण विभाग यांनी समितीस विदित केले की, ग्राम विकास विभागाकडून याबाबत समितीस एक महिन्यात अहवाल सादर करण्यात येईल. यावर समितीने असे निदेश दिले की, दोन्ही विभागांनी संपूर्ण कार्यवाही करून एक महिन्याच्या आत समितीला अहवाल सादर करावा. यावर सचिव, ग्रामविकास विभाग यांनी समितीसमोर मागणी केली की, ३१ डिसेंबर पर्यंत अहवाल सादर करण्यास समितीला मुदत द्यावी. यावर सह सचिव, शालेय शिक्षण विभाग यांनी समितीसमोर मागणी केली की, शालेय शिक्षण विभागाला एक महिन्याचा कालावधी देण्यात यावा. यावर समितीने निदेश दिले की, १ डिसेंबर पर्यंत सर्व समावेशक अहवाल समितीला सादर करण्यात यावा. यावर सचिव, ग्रामविकास विभाग यांनी समितीस होकारार्थी आश्वासित केले.

**अभिप्राय व शिफारशी**

पंचायती राज समितीने दिनांक ५ ते ७ नोव्हेंबर, २०१५ या कालावधीत अमरावती जिल्हा परिषदेला भेट दिली. सन २०१२-१३ या वर्षाच्या वार्षिक प्रशासन अहवालावरील प्रश्नावली क्रमांक २ च्या संदर्भात जिल्ह्यातील शाळा, प्राथमिक आरोग्य केंद्रे, उपकेंद्रे, अंगणवाड्या, पशुवैद्यकीय दवाखाने इत्यादींना भेटी दिल्या त्यापैकी मौजे वडगांव (राजदी) ता. धामणगाव रेल्वे, जि.अमरावती येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेस भेट दिली असता शालेय पोषण आहार योजनेकरिता पुरवठा करण्यात आलेली तुरडाळ निकृष्ट दर्जाची असल्याचे समितीस आढळून आले. त्यासंदर्भात समितीने चौकशी करून अहवाल सादर करण्याचे निदेश दिले होते.

समितीच्या निदेशानुसार केलेल्या चौकशी अहवालामध्ये मौजे. वडगाव (राजदी) या शाळेस पोषण आहार योजनेकरीता तुरडाळीचा पुरवठा पुरवठादारामार्फत करण्यात आल्यानंतर तुरडाळीमध्ये दगड, मातीचे खडे, कचरा, अस्वच्छ गाळलेली तुरडाळ नष्ट केली नसल्याबद्दल शाळेचे मुख्याध्यापक श्री. राजेंद्र ठाकरे यांच्यावर प्रशासनाने त्यांची एक वेतनवाढ थोपविली आहे. वस्तुतः निकृष्ठ दर्जाची तुरडाळ पुरविणाऱ्या पुरवठादारावर कारवाई करण्याऐवजी पुरविण्यात आलेली निकृष्ट तुरडाळ निवडून, गाळून, स्वच्छ करून वापरणाऱ्या मुख्याध्यापकावर प्रशासनाने कारवाई केल्याप्रकरणी समिती तीव्र नापसंती व्यक्त करते.

शालेय पोषण आहाराकरीता पुरवठादार नेमणे, पुरवठादाराबरोबर करारनामा करणे आदी बाबी शासन स्तरावर करण्यात येतात. करार करतेवेळी ज्या दर्जाच्या धान्यादी मालाचा पुरवठा करावयाचा आहे त्याचे नमूने राज्यातील सर्व शाळांना पाठविणे बंधनकारक असताना त्याप्रमाणे कार्यवाही होताना दिसून येत नाही. मुख्याध्यापकांना पुरवठाधाराने पुरविलेला माल कोणत्याही वजनाचा कोणत्याही दर्जाचा असला तरी रोज शाळेमध्ये उतरवून घ्यावा लागतो. अन्यथा मुख्याध्यापकांवरील केंद्र प्रमुख, विस्तार अधिकारी (शिक्षण), गटशिक्षणाधिकारी, शिक्षणाधिकारी, गटविकास अधिकारी, अधीक्षक शालेय पोषण आहार इत्यादी वरिष्ठांचा त्रास सहन करावा लागतो. त्यामुळे मुख्याध्यापकाने स्वीकारलेल्या धान्यादी मालाची नोंद नोंदवहीमध्ये घेऊन त्यावर शालेय पोषण आहार समितीची दरमहा स्वाक्षरी घेणे आवश्यक असते व त्या दर तीन महिन्यांनी तपासणीकरीता सक्षम प्राधिकाऱ्यापुढे ठेवणे आवश्यक असते. परंतु एकाच वेळेला अनेक महिन्यांच्या स्वाक्षऱ्या

नोंदवहीवर घेतल्या जातात त्यामुळे सदरहू योजना योग्य रितीने राबविलेली नाही अशी समितीला शंका निर्माण झाली आहे. **अत: ग्रामविकास विभागाच्या सचिवांनी विदित केल्याप्रमाणे मुख्याध्यापक दबावापोटी ५० किलो ऐवजी ४५ किलो माल आला तरीही ५० किलोची पोच देत असेल तर कंत्राटदार त्यामधून निर्दोष सुटला जातो त्यामुळे त्यांच्यावर लक्ष ठेवण्यासाठी एखादी समिती असली पाहिजे असे सचिवांनी आश्वासित केले आहे. त्यानुसार एकट्या मुख्याध्यापकास जबाबदार धरण्यापेक्षा शालेय पोषण आहाराचा पुरवठा, साठा याकरीता शालेय पोषण आहार समिती, ग्रामपंचायत व मुख्याध्यापक या सर्वावर जबाबदारी विभागण्यात यावी. त्याचप्रमाणे शासनाने कंत्राटदारा समवेत केलेल्या कराराची प्रत प्रत्येक शाळेला पाठवून त्या करारासंदर्भात अंमलबजावणी करण्याकामी मुख्याध्यापक किंवा शिक्षक यांची प्रत्येक जिल्ह्याच्या ठिकाणी वर्षातून किमान दोन वेळा कार्यशाळा आयोजित करावी व कराराप्रमाणे धान्य पुरवठा होतो किंवा नाही याची कडक अंमलबजावणी करावी. तसेच प्रस्तुत प्रकरणी कंत्राटदाराने निकृष्ट दर्जाचा माल पुरविला असल्याने नियमानुसार त्याचेवर देखील कारवाई करावी व केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस दोन महिन्यात पाठविण्यात यावी. अशी समितीची शिफारस आहे.**

---------------

## प्रकरण तीन

# जिल्हा परिषद, अमरावती (प्रशासन)

### अमरावती जिल्हा परिषदेतील विविध अधिकारी/कर्मचारी यांची रिक्त पदे भरण्याबाबत

समितीने दिनांक ५ ते ७ नोव्हेंबर, २०१५ या कालावधीत अमरावती जिल्हा परिषदेस भेट दिली. भेटीच्या वेळी जिल्हा परिषदेच्या पदाधिका-यांसोबत केलेल्या अनौपचारीक चर्चेच्यावेळी समितीच्या निदर्शनास आणून देण्यात आले की, अमरावती जिल्हा परिषदेमध्ये मोठ्या संख्येने प्रशासकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांची पदे रिक्त आहेत. रिक्त पदे असल्यामुळे कामकाजास विलंब होऊन नागरिकांना त्रास सहन करावा लागतो. तसेच अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी ०१ पद रिक्त आहे. उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य) ०१ पद रिक्त आहे. तसेच प्रकल्प संचालक (जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा) ०१ पद रिक्त आहे. गट विकास अधिकारी (उच्चश्रेणी) ०१ पद रिक्त आहे. सहायक गट विकास अधिकारी (निवडश्रेणी) ०४ पदे रिक्त आहेत. तसेच बाल विकास प्रकल्प अधिकाऱ्यांच्या १४ पदांपैकी ०८ पदे रिक्त आहेत. गट शिक्षणाधिकारी यांच्या १४ पदांपैकी ०७ पदे रिक्त आहेत. तालुका वैद्यकीय अधिकाऱ्यांची १४ पैकी ०७ पदे रिक्त आहेत. वैद्यकीय अधिकारी (गट-अ) १०५ पैकी ०५ पदे रिक्त आहेत. वैद्यकीय अधिकारी, (गट-ब) ११० पैकी ०९ पदे रिक्त आहेत. आरोग्य सेवेची मोठ्या संख्येने पदे रिक्त असल्यामुळे रुग्णांना योग्य व वेळेत उपचार मिळत नाहीत व शिक्षणाची देखील तीच परिस्थिती आहे. राज्यातील इतर जिल्हा परिषदेमध्ये शिक्षण विभागाची ७५ टक्के पदे भरण्यात आली असून २५ टक्के पदे रिक्त आहेत. परंतु अमरावती जिल्हा परिषदेमधील शिक्षण विभागाची ५० ते ६० टक्के पदे रिक्त आहेत. इतर जिल्ह्याप्रमाणे या जिल्ह्यातील पदे भरण्यात यावीत.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्द्यांबाबत विभागाकडून माहिती मागविली.**

समितीने अमरावती जिल्हा परिषदेला भेट दिली असता जिल्हा परिषद, पंचायत समित्या यामधील विविध अधिकारी व कर्मचारी यांची अनेक पदे रिक्त असल्याचे आढळून आले आहे. या रिक्त पदांमुळे शासनाच्या विविध कल्याणकारी योजनांच्या अंमलबजावणीवर विपरीत परिणाम होण्याची शक्यता लक्षात घेता सदरहू रिक्त पदे भरण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली आहे.

**उपरोक्त मुद्द्यांसंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

जिल्हा परिषद, अमरावती अंतर्गत गट-ब (अराजपत्रित), गट-क व गट-ड संवर्गातील पदांचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| संवर्ग (१) | मंजूर पदे (२) | भरलेली पदे (३) | रिक्त पदे (४) |
|---|---|---|---|
| गट-ब (अराजपत्रित) | १००५ | ९१५ | ९० |
| गट-क | ८७७७ | ८२५४ | ५२३ |
| गट-ड | १०४७ | १०२७ | २० |
| एकूण | १०८२९ | १०१९६ | ६३३ |

शासन परिपत्रक क्र.नियुक्ती २०१५/प्र.क्र.२११/आस्था-८ दिनांक ८ ऑक्टोबर, २०१५ **(परिशिष्ट ३.१)** मधील वित्त विभागाच्या दिनांक ०२ जून, २०१५ **(परिशिष्ट ३.२)** रोजीच्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार वेतनावरील खर्च नियंत्रित करण्याच्या दृष्टीने पदभरती करीता निश्चित करण्यात आलेल्या टक्केवारीच्या मर्यादेत जिल्हा परिषद, अमरावती अंतर्गत माहे नोव्हेंबर, २०१५ ते मार्च, २०१७ दरम्यान गट-क ची १३० पदे व गट-ड ची ५ पदे अशी एकूण १३५ पदे सरळ सेवा भरतीने भरण्यात आलेली आहेत. गट-अ व ब मधील रिक्त पदे भरण्याची बाब शासनाच्या अखत्यारीतील आहे.

**उपरोक्त मुद्यासंदर्भात ग्रामविकास विभागाकडून खालीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

**ग्रामविकास विभागाचे अभिप्राय :-**

महाराष्ट्र विकास सेवा, गट-अ आणि गट-ब मधील अधिका-यांची रिक्त पदे भरण्याची कार्यवाही या विभागाकडून करण्यात येते. सद्यस्थितीत महाराष्ट्र विकास सेवा गट-अ मधील १८ मंजूर पदांपैकी १७ पदे भरलेली असुन ०१ पद रिक्त आहे. सदरची रिक्त पदे पदोन्नतीने/बदलीने भरण्याची कार्यवाही सुरु आहे. तसेच गट-ब मधील सर्व रिक्त पदे भरण्यात आलेली आहेत.

**चौकशी अहवाल**

**महाराष्ट्र विकास सेवा वर्ग १ व वर्ग २ रिक्त पदाबाबत माहिती**

| अ.क्र. (१) | नाव (२) | पदाचे नाव (३) | शेरा (४) |
|---|---|---|---|
| १ | रिक्त पद | अति मुकाअ | |
| २ | श्री.पी.ए.तट्टे | उपमुकाअ(सा.) | |
| ३ | श्री.जे.एन.आभाळे | उपमुकाअ (पं) | |
| ४ | श्री.पी.के.कापडे | गविअ अमरावती | |
| ५ | श्री.एस.पी.थोरात | गविअ भातकुली | |
| ६ | श्री.एन.टी.देसले | गविअ चिखलदरा | |
| ७ | रिक्त पद | गविअ धारणी | श्री.देशमुख यांची बदलीने नियुक्ती करण्यात आली आहे. |
| ८ | श्री.बी.एस.रायबोले | गविअ अचलपूर | |
| ९ | श्री.बी.एस.रेंगडे | गविअ अंजनगाव सुर्जी | |
| १० | श्री.अे.यु.गुडघे | गविअ दर्यापूर | |
| ११ | श्री.बी. एस.अकलाडे | गविअ चांदूर बाजार | |
| १२ | श्री.डी.एस.मानकर | गविअ मोर्शी | |
| १३ | रिक्त पद | गविअ वरुड | |
| १४ | श्री.एस.के.तलवारे | गविअ चांदूर रेल्वे | |
| १५ | श्री.के.आर.कलोडे | गविअ धामणगाव रेल्वे | |
| १६ | श्री.एस.व्ही.गोहाड | गविअ नांदगांव खंडे. | |
| १७ | श्री.जी.एस.धायगुडे | गविअ तिवसा | |
| १८ | श्रीमती माया वानखडे | सहा.गविअ अमरावती | |
| १९ | श्री.एन.एस.धारगे | सहा.गविअ भातकुली | |
| २० | रिक्त पद | सहा.गविअ चिखलदरा | |
| २१ | श्री. चंतन हिवंज | सहा.गविअ धारणी | |
| २२ | श्री.डब्ल्यू.एम.कनाटे | सहा.गविअ अचलपूर | |
| २३ | श्री.एस.आर.खानंदे | सहा.गविअ अंजनगाव सुर्जी | |

**चौकशी अहवाल**--चालू

| (१) | (२) | (३) | (४) |
|---|---|---|---|
| २४ | श्रीमती उज्वला ढोले | सहा.गविअ दर्यापूर | |
| २५ | रिक्त पद | सहा.गविअ चांदूर बाजार | |
| २६ | श्री.आर.बी.पवार | सहा.गविअ मोर्शी | |
| २७ | रिक्त पद | सहा.गविअ वरुड | |
| २८ | श्री.एन.जी.सुरंसे | सहा.गविअ चांदूर रेल्वे | |
| २९ | रिक्त पद | सहा.गविअ धामणगाव रेल्वे | |
| ३० | श्री.ए.एम.पऱ्हाते | सहा.गविअ नांदगांव खंडे. | |
| ३१ | श्री.डी.ए.पतंगराव | सहा.गविअ तिवसा/पंचायत विभाग | |

| अ.क्र | भरलेली पदे | रिक्त पदे |
|---|---|---|
| (१) | (२) | (३) |
| १ | २४ | ७ |

**बाल विकास प्रकल्प अधिकारी**

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| **वर्ग-२ गट-ब** | | | | | |
| १ | रिक्त पद | बाविप्रअ अमरावती | १ | ० | १ |
| २ | रिक्त पद | बाविप्रअ भातकुली | १ | ० | १ |
| ३ | श्री.व्ही.डब्ल्यू.दुर्गे | बाविप्रअ चिखलदरा | १ | १ | ० |
| ४ | श्री.एस.एस.झंझाड | बाविप्रअ धारणी | १ | १ | ० |
| ५ | रिक्त पद | बाविप्रअ अचलपूर | १ | ० | १ |
| ६ | रिक्त पद | बाविप्रअ अंजनगाव सुर्जी | १ | ० | १ |
| ७ | रिक्त पद | बाविप्रअ दर्यापूर | १ | ० | १ |
| ८ | रिक्त पद | बाविप्रअ चांदूर बाजार | १ | ० | १ |
| ९ | रिक्त पद | बाविप्रअ मोर्शी | १ | ० | १ |
| १० | श्री.आर.बी.पाटील | बाविप्रअ वरुड | १ | १ | ० |
| ११ | श्री.एस.ई.जोल्हे | बाविप्रअ चांदूर रेल्वे | १ | १ | ० |
| १२ | रिक्त पद | बाविप्रअ धामणगाव रेल्वे | १ | ० | १ |
| १३ | रिक्त पद | बाविप्रअ नांदगांव खडे. | १ | ० | १ |
| १४ | रिक्त पद | बाविप्रअ तिवसा | १ | ० | १ |

**जिल्हा परिषदेकडील वर्ग-१, वर्ग-२ मधील रिक्त पदाच्या स्थितीबाबत**

**एप्रिल, २०१६ अखेर स्थिती.**

| पदाचे नाव | वर्ग१/वर्ग-२ | मंजूर पदे | कार्यरत पदे | रिक्त पदे |
|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
| **वित्त विभाग** | | | | |
| मुख्य लेखा तथा वित्त अधिकारी | वर्ग-१ | १ | १ | ० |
| वित्त व लेखा सेवा गट-अ (कनिष्ठ) | वर्ग-१ | १ | १ | ० |
| लेखाअधिकारी | वर्ग-२ | २ | २ | ० |
| **बांधकाम विभाग** | | | | |
| कार्यकारी अभियंता | वर्ग-१ | १ | १ | ० |
| उप अभियंता | वर्ग-२ | ८ | ५ | ३ |
| **पाटबंधारे विभाग** | | | | |
| कार्यकारी अभियंता | वर्ग-१ | १ | १ | ० |
| उप अभियंता | वर्ग-२ | ८ | ४ | ४ |
| **ग्रामीण पाणी पुरवठा विभाग** | | | | |
| कार्यकारी अभियंता | वर्ग-१ | १ | १ | ० |
| उप अभियंता | वर्ग-२ | ९ | ८ | १ |
| सहाय्यक भूवैज्ञानिक | वर्ग-२ | १ | ० | १ |
| कनिष्ठ भूवैज्ञानिक | वर्ग-२ | २ | २ | ० |
| **आरोग्य विभाग** | | | | |
| जिल्हा आरोग्य अधिकारी | वर्ग-१ | १ | १ | ० |
| अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी | वर्ग-१ | १ | १ | ० |
| सहाय्यक जिल्हा आरोग्य अधिकारी | वर्ग-१ | २ | १ | १ |
| जिल्हा लसीकरण अधिकारी | वर्ग-१ | १ | १ | ० |
| वैद्यकीय अधिकारी गट-अ | वर्ग-१ | १०६ | १०२ | ०४ |
| तालुका वैद्यकीय अधिकारी गट-अ | वर्ग-२ | १४ | ०७ | ०७ |
| वैद्यकीय अधिकारी गट-ब | वर्ग-२ | ११० | ९९ | ११ |
| प्रशासकीय अधिकारी | वर्ग-२ | १ | ० | १ |
| सांख्यिकी अधिकारी | वर्ग-२ | १ | १ | ० |
| जिल्हा प्रसिध्दी माध्यम विस्तार अधिकारी | वर्ग-२ | १ | १ | ० |

**जिल्हा परिषदेकडील वर्ग-१, वर्ग-२ मधील रिक्त पदाच्या स्थितीबाबत**--चालू

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
|---|---|---|---|---|
| **पशुसंवर्धन विभाग** | | | | |
| जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी | वर्ग-१ | १ | १ | ० |
| पशुधन विकास अधिकारी गट-अ | वर्ग-१ | ५१ | ५१ | ० |
| पशुधन विकास अधिकारी गट-ब | - | ०३ | ०३ | - |
| **कृषि विभाग** | | | | |
| कृषि विकास अधिकारी | वर्ग-१ | १ | १ | ० |
| जिल्हा कृषि अधिकारी | वर्ग-२ | २ | १ | १ |
| मोहीम अधिकारी | वर्ग-२ | १ | १ | ० |
| जिल्हा कृषि अधिकारी (वि.घ.यो.) | वर्ग-२ | १ | १ | ० |
| **शिक्षण विभाग** | | | | |
| शिक्षणाधिकारी (प्रा.) | वर्ग-१ | १ | १ | ० |
| शिक्षणाधिकारी (मा.) | वर्ग-१ | १ | १ | ० |
| शिक्षणाधिकारी (निरंतर शिक्षण.) | वर्ग-१ | १ | १ | ० |
| उप शिक्षणाधिकारी (प्राथ.) | वर्ग-२ | २ | २ | ० |
| उप शिक्षणाधिकारी (माध्य.) | वर्ग-२ | ४ | ३ | १ |
| अधीक्षक राजपत्रित (माध्य.) | वर्ग-२ | १ | १ | ० |
| उप शिक्षणाधिकारी (निरंतर शिक्षण) | वर्ग-२ | १ | ० | १ |
| गट शिक्षणाधिकारी | वर्ग-२ | १४ | ०२ | १२ |
| मुख्याध्यापक | वर्ग-२ | १० | ०३ | ०७ |
| लेखाधिकारी | वर्ग-२ | ०१ | ०१ | ० |
| अधीक्षक (शापोआ) | वर्ग-२ | १३ | ०८ | ०५ |
| अधीक्षक (राजपत्रित) | वर्ग-२ | ०१ | ०१ | ० |

**जिल्हा परिषदेकडील वर्ग-१, वर्ग-२ मधील रिक्त पदाच्या स्थितीबाबत**--चालू

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
|---|---|---|---|---|
| **समाज कल्याण विभाग** | | | | |
| समाज कल्याण अधिकारीवर्ग-१ | १ | १ | ० | |
| **जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा** | | | | |
| सहाय्यक प्रकल्प अधिकारी (पशु) | वर्ग-१ | ०१ | ०१ | ०० |
| सहाय्यक प्रकल्प अधिकारी (पाणलोट/कृषी) | वर्ग-१ | ०१ | ०० | ०१ |
| सहाय्यक प्रकल्प अधिकारी (संनियंत्रण) | वर्ग-२ | ०१ | ०० | ०१ |
| सहाय्यक प्रकल्प अधिकारी (उद्योग) | वर्ग-२ | ०१ | ०० | ०१ |
| वरिष्ठ लेखाधिकारी | वर्ग-१ | ०१ | ०० | ०१ |
| लेखाधिकारी | वर्ग-२ | ०२ | ०१ | ०१ |
| उप अभियंता | वर्ग-१ | ०१ | ०० | ०१ |
| सहाय्यक प्रकल्प अधिकारी (रोजगार) | वर्ग-२ | ०१ | ०१ | ०० |
| **जलस्वराज्य प्रकल्प विभाग** | | | | |
| अभियांत्रिकी तज्ञ | वर्ग-१ | ० | ० | ० |
| गटप्रमुख जिल्हा आर्थिक व्यवस्थापन | वर्ग-२ | ० | ० | ० |
| भुजल तज्ञ | वर्ग-२ | ० | ० | ० |
| आरोग्य व स्वच्छता तज्ञ | वर्ग-१ | ० | ० | ० |

**गोषवारा**

| संवर्ग | वर्ग१/वर्ग२ | मंजूर पदे | भरलेली पदे | रिक्त पदे |
|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
| तांत्रिक पदे | वर्ग-१ | ७३ | ५५ | १८ |
| एकूण | वर्ग-१ | ७३ | ५५ | १८ |
| तांत्रिक पदे | वर्ग-२ | ३१७ | २६५ | ५२ |
| एकूण | वर्ग-२ | ३१७ | २६५ | ५२ |
| एकूण . . | वर्ग-१ + वर्ग २ | ३९० | ३२० | ७० |

**दिनांक मार्च, २०१६ अखेरची स्थिती**

| अ.क्र. | नांव | पदाचे नाव | मंजूर पदे | भरलेली पदे | रिक्त पदे |
|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) |
| | **वर्ग-१ गट-अ** | | | | |
| १ | श्री.सुनिल पाटील | मा मुकाअ | १ | १ | ० |
| २ | रिक्त पद | अति मुकाअ | १ | ० | १ |
| ३ | श्री.पी.ए.तट्टे | उपमुकाअ(सा.) | १ | १ | ० |
| ४ | श्री.जे.एन.आभाळे | उपमुकाअ (पं) | १ | १ | ० |
| ५ | श्री.के.एन.घोडके | महिला व बाल वि.अधि | १ | १ | ० |
| | **वर्ग-१ गट-अ** | | | | |
| १ | श्री.पी.के.कापडे | गविअ अमरावती | १ | १ | ० |
| २ | श्री.एस.पी.थोरात | गविअ भातकुली | १ | १ | ० |
| ३ | श्री.एन.टी.देसले | गविअ चिखलदरा | १ | १ | ० |
| ४ | रिक्त पद | गविअ धारणी | १ | ० | १ |
| ५ | श्री.पी.एस.रायबोले | गविअ अचलपूर | १ | १ | ० |
| ६ | श्री.बी.एस.रेंगडे | गविअ अंजनगाव सुर्जी | १ | १ | ० |
| ७ | श्री.अे.यु.गुडघे | गविअ दर्यापूर | १ | १ | ० |
| ८ | श्री.बी.एस.अकलाडे | गविअ चांदूर बाजार | १ | १ | ० |
| ९ | श्री.डी.एन.मानकर | गविअ मोर्शी | १ | १ | ० |
| १० | रिक्त पद | गविअ वरुड | १ | ० | १ |
| ११ | श्री.एस.के.तलवारे | गविअ चांदूर रेल्वे | १ | १ | ० |
| १२ | श्री.के.आर.कलोडे | गविअ धामणगाव रेल्वे | १ | १ | ० |
| १३ | श्री.एस.व्ही.गोहाड | गविअ नांदगांव खंडे | १ | १ | ० |
| १४ | श्री.जी.एस.धायगुडे | गविअ तिवसा | १ | १ | ० |
| | **वर्ग-२ गट-ब** | | | | |
| १ | श्रीमती माया वानखडे | गविअ अमरावती | १ | १ | ० |
| २ | श्री.एन.एस.धारगे | गविअ भातकुली | १ | १ | ० |
| ३ | रिक्त पद | गविअ चिखलदरा | १ | ० | १ |
| ४ | श्री.चेतन हिवंज | गविअ धारणी | १ | १ | ० |
| ५ | श्री.बी.डब्ल्यू कनाटे | गविअ अचलपूर | १ | १ | ० |
| ६ | श्रीमती एस.आर.खानंदे | गविअ अंजनगाव सुर्जी | १ | १ | ० |
| ७ | श्रीमती उज्वला ढोले | गविअ दर्यापूर | १ | १ | ० |
| ८ | रिक्त पद | गविअ चांदूर बाजार | १ | ० | १ |
| ९ | श्री.आर.बी.पवार | गविअ मोर्शी | १ | १ | ० |
| १० | रिक्त पद | गविअ वरुड | १ | ० | १ |
| ११ | श्री.एन.जी.सुरंसे | गविअ चांदूर रेल्वे | १ | १ | ० |
| १२ | रिक्त पद | गविअ धामणगाव रेल्वे | १ | ० | १ |
| १३ | श्री.ए.एम.पऱ्हाते | गविअ नांदगांव खंडे | १ | १ | ० |
| १४ | श्री.डी.ए.पतंगराव | गविअ तिवसा | १ | १ | ० |

## जिल्हा परिषद अमरावती

## विवरणपत्र ब-१ (गोषवारा)

## (३१.३.२०१६ अखेर रिक्त पदाचा अहख्वाल)

### दिनांक ३१.३.२०१६ अखेर सर्व संवर्गातील भरण्यात आलेली पदे व रिक्त पदे यांची संवर्ग निहाय माहिती

| अ.क्र. | संवर्गाचे नाव | दिनांक ३१.३.२०१६ रोजीची मंजूर पदसंख्या | | | दिनांक ३१.३.२०१६ रोजी भरलेली पदे | | | दिनांक ३१.३.२०१६ रोजी रिक्त असलेली पदे | | | अभिप्राय |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | सरळ सेवा | पदोन्नती | एकूण | सरळ सेवा | पदोन्नती | एकूण | सरळ सेवा | पदोन्नती | एकूण | |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) | (१० | (११) | (१२) |
| | गट ब .. | ४४६ | ६०५ | १०५१ | ३५५ | ६२० | ९७५ | ९१ | -१५ | ७६ | |
| | गट क .. | ८२६३ | ६९१ | ८९५४ | ७८२८ | ६५२ | ८४८० | ४३५ | ३९ | ४७४ | |
| | गट ड .. | ९९९ | ३८ | १०३७ | ९५८ | ३० | ९८८ | ४१ | ८ | ४९ | |
| | एकूण .. | ९७०८ | १३३४ | ११०४२ | ९१४१ | १३०२ | १०४४३ | ५६७ | ३२ | ५९९ | |

**टिप** :--गट ब मध्ये दर्शविण्यात आलेली पदे ही गट-क मधील आहेत परंतू सदरील पदाची वेतनश्रेणी ९३००-३४८००, ग्रेड पे ४३०० ते ४५०० या मधील असल्याने सदरची पदे गट-ब मध्ये दर्शविण्यात आलेली आहेत

## विवरणपत्र ब-३

### दिनांक ३१.३.२०१६ अखेर सर्व संवर्गातील भरण्यात आलेली पदे व रिक्त पदे यांची संवर्ग निहाय माहिती

### (गट ब मधील संवर्गनिहाय पदे) वेतनब्रँड रु.९३००-३४८००, ग्रेड पे रु.४३००/- ते रु. ४५००/- मधील पदे

| अ.क्र. | संवर्गाचे नाव | दिनांक ३१.३.२०१६ रोजीची मंजूर पदसंख्या | | | दिनांक ३१.३.२०१६ रोजी भरलेली पदे | | | दिनांक ३१.३.२०१६ रोजी रिक्त असलेली पदे | | | अभिप्राय |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | सरळ सेवा | पदोन्नती | एकूण | सरळ सेवा | पदोन्नती | एकूण | सरळ सेवा | पदोन्नती | एकूण | |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) | (१० | (११) | (१२) |
| १ | सहायक प्रशासन अधिकारी | ० | २३ | २३ | ० | २३ | २३ | ० | ० | ० | |
| २ | लघुलेखक उ.श्रे | १ | १ | २ | १ | १ | २ | ० | ० | ० | |
| ३ | लघुलेखक नि.श्रे | २ | २ | ४ | १ | २ | ३ | १ | ० | १ | |
| ४ | सहा.लेखाधिकारी | ० | २७ | २७ | ० | १७ | १७ | ० | १० | १० | |
| ५ | आयु.वैध | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | |
| ६ | वैद्यकिय अधिकारी वर्ग-३ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | |
| ७ | अवैद्यकीय पर्यवेक्षक | ० | १ | १ | ० | १ | १ | ० | ० | ० | |
| ८ | युनानी हकीम/तबीब | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | |

**विवरणपत्र ब-३**--चालू

| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) | (१० | (११) | (१२) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ९ | कृषि अधिकारी | ७ | २१ | २८ | ५ | २० | २५ | २ | १ | ३ | |
| १० | कनिष्ठ अभियंता बांधकाम | ५१ | १७ | ६८ | ४४ | १६ | ६० | ७ | १ | ८ | |
| | कनिष्ठ अभियंता ग्रापापु | ४५ | १ | ४६ | ३२ | १ | ३३ | १३ | ० | १३ | |
| | कनिष्ठ अभियंता सिंचन | ३१ | १० | ४१ | ३१ | ० | ३१ | ० | १० | १० | |
| ११ | मुख्य आरेखक | ० | १ | १ | ० | १ | १ | ० | ० | ० | |
| १२ | आरेखक (सहा) | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | |
| १३ | विस्तार अधि (शि) श्रे-२ | ९ | २८ | ३७ | ९ | १७ | २६ | ० | ११ | ११ | |
| १४ | विस्तार अधि (शि) श्रे-३ | ० | २० | २० | ० | १६ | १६ | ० | ४ | ४ | |
| १५ | केंद्र प्रमुख | ५६ | ८३ | १३९ | ० | ८३ | ८३ | ५६ | ० | ५६ | शालेय क्रिडा विभाग शा. नि. क्र. पीआर ई२००५/ ४४६६/ प्राशि-१ दि.२.२.२०१० नुसार ४० टक्के सरळ सेवा ३० टक्के पदे विभागीय स्पर्धा परिक्षा सद्यस्थितीमध्ये सर्व पदे पदोन्नतीने भरण्यात आलेली असून ३० टक्के पदोन्नतीच्या पदामध्ये समाविष्ट आहे. त्यामुळे सदरहू पदे अतिरिक्त दिसून येतात रोष्टरला याप्रमाणे नव्याने मंजूरात प्राप्त आहे. |
| १६ | मुख्याध्यापक (अ.रा) (माध्य) | ० | १४ | १४ | ० | १३ | १३ | ० | १ | १ | |
| १७ | उप मुख्याध्यापक | ० | १ | १ | ० | ० | ० | ० | १ | १ | |
| १८ | उच्च श्रेणी मुख्याध्यापक (मराठी) | ० | २४३ | २४३ | ० | ३२२ | ३२२ | ० | -७९ | -७९ | |
| | उच्च श्रेणी मुख्याध्यापक (उर्दु) | ० | ३४ | ३४ | ० | ५५ | ५५ | ० | -२१ | -२१ | |
| १९ | वरिष्ठ मुख्याध्यापक | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | |
| २० | सहाय्यक शिक्षक/ (उ.श्रे.)मराठी | ९२ | ४२ | १३४ | ८९ | १६ | १०५ | ३ | २६ | २९ | |
| | सहाय्यक शिक्षक/ (उ.श्रे.) उर्दु | १८ | १८ | ३६ | १६ | ३ | १९ | २ | १५ | १७ | |
| २१ | सहाय्यक शिक्षक/ (नि.श्रे) (मराठी) | ९८ | ० | ९८ | ९६ | ० | ९६ | २ | ० | २ | |
| | सहाय्यक शिक्षक/ (नि.श्रे) (उर्दु) | १३ | ० | १३ | १३ | ० | १३ | ० | ० | ० | |
| २२ | कनिष्ठ व्याख्याता | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | |

**विवरणपत्र ब-३**--चालू

| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) | (१० | (११) | (१२) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २३ | पर्यवेक्षक | ० | ९ | ९ | ० | ६ | ६ | ० | ३ | ३ | |
| २४ | साथरोग वैद्यकीय अधिकारी | १ | ० | १ | १ | ० | १ | ० | ० | ० | राज्य शासकीय कर्मचारी आहे |
| २५ | सांख्यिकी पर्यवेक्षक | १ | ० | १ | १ | ० | १ | ० | ० | ० | राज्य शासकीय कर्मचारी आहे |
| २६ | सांख्यिकी सहाय्यक | १ | | १ | १ | | १ | ० | ० | ० | राज्य शासकीय कर्मचारी आहे |
| २७ | जि.सार्व.आरोग्य परिचर | १ | ० | १ | १ | ० | १ | ० | ० | ० | प्रपत्रात नव्याने समाविष्ट (स.क. विभाग) चे पद आहे. |
| २८ | शारीरिक शिक्षक | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | |
| | वैद्यकीय सामाजिक कार्यकर्ता (स.क.विभाग) | ० | १ | १ | ० | १ | १ | ० | ० | ० | |
| २९ | आरेखक (बांध) | १ | २ | ३ | १ | १ | २ | ० | १ | १ | |
| | आरेखक (ग्रापापु) | ० | | ० | | | ० | ० | ० | ० | |
| ३० | कनिष्ठ महा विद्या शिक्षक (मराठी) | १८ | ६ | २४ | १३ | ५ | १८ | ५ | १ | ६ | |
| | कनिष्ठ महा विद्या शिक्षक (उर्दु) | ६ | २ | ८ | ६ | १ | ७ | ० | १ | १ | |
| | **एकूण ..** | **४४६** | **६०५** | **१०५१** | **३५५** | **६२०** | **९७५** | **९१** | **-१५** | **७६** | |

**विवरणपत्र-ब-४**

**दिनांक ३१.३.२०१६ अखेर सर्व संवर्गातील भरण्यात आलेली पदे व रिक्त पदे यांची संवर्ग निहाय माहिती.**

**(गट-क मधील संवर्ग निहाय पदे) (वेतन बैंड रु.९३००-३४८००, ग्रेड पे रु.५२००-२०२०० ग्रेड पे रु.१९०० ते ३५०० यातील पदे)**

| अ.क्र. | संवर्गाचे नाव | दिनांक ३१.३.२०१६ रोजीची मंजूर पदसंख्या | | | दिनांक ३१.३.२०१६ रोजी भरलेली पदे | | | दिनांक ३१.३.२०१६ रोजी रिक्त असलेली पदे | | | अभिप्राय |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | सरळ सेवा | पदोन्नती | एकूण | सरळ सेवा | पदोन्नती | एकूण | सरळ सेवा | पदोन्नती | एकूण | |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) | (१० | (११) | (१२) |
| १ | कनिष्ठ प्रशासन अधिकारी | ० | ४४ | ४४ | | ४३ | ४३ | | १ | १ | |
| २ | विस्तार अधि.(सांख्यि) | ३३ | ० | ३३ | ३२ | ० | ३२ | १ | ० | १ | |
| ३ | लघुटंकलेखक | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | |
| ४ | वरिष्ठ सहा.लि. | ४० | ८१ | १२१ | ४० | ८१ | १२१ | ० | ० | ० | |
| ५ | वरिष्ठ सहा.लि.स्पर्धा | ४१ | ० | ४१ | ३२ | ० | ३२ | ९ | ० | ९ | |
| ६ | कनिष्ठ सहा.लि. | ३०० | १०० | ४०० | २८५ | १०० | ३८५ | १५ | ० | १५ | |
| ७ | वाहन चालक | १३ | ४२ | ५५ | १३ | ४२ | ५५ | ० | ० | ० | |

**विवरणपत्र ब-४**--चालू

| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) | (१०) | (११) | (१२) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ८ | कनि.लेखाधिकारी | ५ | १६ | २१ | ४ | १६ | २० | १ | ० | १ | |
| ९ | वरिष्ठ सहा. लेखा | २० | २१ | ४१ | १९ | २१ | ४० | १ | ० | १ | |
| १० | कनिष्ठ सहा. लेखा | ३१ | १० | ४१ | ३० | १० | ४० | १ | ० | १ | |
| ११ | विस्तार अधि.(पं) | ११ | ३१ | ४२ | ८ | २७ | ३५ | ३ | ४ | ७ | |
| १२ | ग्रामविकास अधि. | २८ | ८५ | ११३ | २३ | ८४ | १०७ | ५ | १ | ६ | |
| १३ | ग्रामसेवक (नियमीत) | ५१० | ० | ५१० | ४९५ | ० | ४९५ | १५ | ० | १५ | |
| १४ | आरोग्य पर्यवेक्षक (विस्तार अधिकारी) | १० | २९ | ३९ | ८ | १७ | २५ | २ | १२ | १४ | |
| १५ | औषध निर्माता | ८७ | ० | ८७ | ८४ | ० | ८४ | ३ | ० | ३ | |
| १६ | प्रयोगशाळा तंत्रज्ञ | ११ | ० | ११ | ११ | ० | ११ | ० | ० | ० | |
| १७ | कुष्ठरोग तंत्रज्ञ | ४ | ० | ४ | ४ | ० | ४ | ० | ० | ० | |
| १८ | आरोग्य सहाय्यक पु. | ० | १०७ | १०७ | ० | १०१ | १०१ | ० | ६ | ६ | |
| १९ | आरोग्य सेवक पु. | २५५ | ० | २५५ | २३१ | ० | २३१ | २४ | ० | २४ | |
| २० | आरोग्य सेविका | ४०२ | ० | ४०२ | ३७० | ० | ३७० | ३२ | ० | ३२ | |
| २१ | आरोग्य सहा. (महिला) LHV | ० | ६८ | ६८ | ० | ६२ | ६२ | ० | ६ | ६ | |
| २२ | चलचित्रपट चालक | १ | ० | १ | १ | ० | १ | ० | ० | ० | |
| २३ | फोटोग्राफर | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | |
| २४ | विस्तार अधि(कृषि) | १५ | १६ | ३१ | १४ | १६ | ३० | १ | ० | १ | |
| २५ | स्थापत्य अभि.सहा. (बांधकाम) | ९० | ० | ९० | ६८ | ० | ६८ | २२ | ० | २२ | |
| | स्थापत्य अभि.सहा.सिंचन | ७ | ० | ७ | ५ | ० | ५ | २ | ० | २ | |
| २६ | कनिष्ठ आरेखक | ४ | ११ | १५ | ३ | ५ | ८ | १ | ६ | ७ | |
| २७ | अनुरेखक | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | |
| २८ | मेस्त्री श्रेणी-१ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | |
| २९ | मेस्त्री श्रेणी-२ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | |
| ३० | वरिष्ठ यांत्रिकी | ० | १ | १ | ० | ० | ० | ० | १ | १ | |
| ३१ | कनिष्ठ यांत्रिकी | १ | ० | १ | १ | ० | १ | ० | ० | ० | |
| ३२ | तारतंत्री | १ | ० | १ | १ | ० | १ | ० | ० | ० | |
| ३३ | जोडारी | १ | ० | १ | १ | ० | १ | ० | ० | ० | |
| ३४ | संगणक | १ | ० | १ | ० | ० | ० | १ | ० | १ | |
| ३५ | सहा.पशुधन विकास अधि. | ० | २१ | २१ | ० | २० | २० | ० | १ | १ | |
| ३६ | पशुधन पर्यवेक्षक | ७७ | ० | ७७ | ७३ | ० | ७३ | ४ | ० | ४ | |
| ३७ | प्राथमिक शिक्षक | ५४८२ | ० | ५४८२ | ५२७० | ० | ५२७० | २१२ | ० | २१२ | |
| | प्राथमिक शिक्षक उर्दु | ६३१ | ० | ६३१ | ५८१ | ० | ८५१ | ५० | ० | ५० | |
| ३८ | उप मुख्याध्यापक | ० | १ | १ | ० | १ | १ | ० | ० | ० | |

**विवरणपत्र ब-४**--चालू

| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) | (१० | (११) | (१२) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ३९ | प्रयोगशशाळा सहाय्यक (कनिष्ठ शि. सहा.) | २५ | ० | २५ | २५ | ० | २५ | ० | ० | ० | |
| ४० | माध्यमिक शिक्षक | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | |
| ४१ | चित्रकला शिक्षक | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | |
| ४२ | हिंदी शिक्षक | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | |
| ४३ | सा.बां.प्रकल्प अधि. | ० | १ | १ | ० | १ | १ | ० | ० | ० | |
| ४४ | पर्यवेक्षिका | ९९ | २ | १०१ | ८१ | २ | ८३ | १८ | ० | १८ | |
| ४५ | हस्तकला शिक्षक | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | |
| ४६ | आरेखक | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | |
| ४७ | नि. श्रे. सहा. अध्यापक (माध्य.) | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | |
| ४८ | रिंगमन | १ | ० | १ | ० | ० | ० | १ | ० | १ | |
| ४९ | सहा.शिक्षक उ. श्रे. (पर्यवेक्षक) | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | |
| ५० | कनिष्ठ महा. शिक्षक | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | |
| ५१ | सहा. आवेदक | २ | ० | २ | २ | ० | २ | ० | ० | ० | |
| ५२ | जॅकहॅमर डिलर | ५ | ० | ५ | २ | ० | २ | ३ | ० | ३ | |
| ५३ | यांत्रिकी (ग्रापापु) | १ | ० | १ | ० | ० | ० | १ | ० | १ | |
| ५४ | वायु संपिडक चालक | ६ | ० | ६ | ० | ० | ० | ६ | ० | ६ | |
| ५५ | लघुलेखक (उ.श्रे.) | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | |
| ५६ | लघुलेखक (नि.श्रे.) | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | |
| ५७ | कनिष्ठ अभियंता | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | |
| ५८ | पदवीधर शिक्षक | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | |
| ५९ | वि.अ.(शि) वर्ग-३ श्रे-३ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | |
| ६० | जिल्हा सार्व. परिचारिका | ० | १ | १ | ० | १ | १ | ० | ० | ० | |
| ६१ | जिल्हा समन्वयक | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | |
| ६२ | साथरोग वैद्यकीय अधिकारी | १ | ० | १ | १ | ० | १ | ० | ० | ० | राज्य शासकीय कर्मचारी |
| ६३ | विस्तार अधिकारी (आयु) | ० | १ | १ | ० | १ | १ | ० | ० | ० | |
| ६४ | रोड चालक | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | |
| ६५ | वाहन चालक (यांत्रिकी उप विभाग) | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | |
| ६६ | अर्थ पर्यवेक्षक | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | |
| ६७ | मदतनीस | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | |
| ६८ | मुख्याध्यापक माढा | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | |
| ६९ | पर्यवेक्षक माढा | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | |
| ७० | सहाय्यक शिक्षक माढा | ६ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | |
| ७१ | अर्धवेळ ग्रंथपाल माढा | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | |
| ७२ | समाज कल्याण निरिक्षक | ४ | १ | ५ | ४ | १ | ५ | ० | ० | ० | |
| ७३ | वरिष्ठ लिपीक (स.क.विभाग) | १ | १ | २ | ० | ० | ० | १ | १ | २ | |
| ७४ | कनिष्ठ लिपीक (स.क.विभाग) | १ | ० | १ | १ | ० | १ | ० | ० | ० | |
| ७५ | कनिष्ठ सहाय्यक (सीआरटी) | १ | ० | १ | १ | ० | १ | ० | ० | ० | |

**विवरणपत्र ब-४**--चालू

| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) | (१० | (११) | (१२) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ७६ | मेत्री ग्रेड (सीआरटी) | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | |
| ७७ | प्रयोगशाळा सहाय्यक | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | |
| ७८ | आयु वैध | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | |
| ७९ | चौकीदार/परि/हमा/ जॅक टिल | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | |
| ८० | वाहन चालक (सीआरटी) (स.क.विभाग) | ० | ० | ० | ३ | ३ | ० | ३ | ० | ० | सर्व विभागातील वाहन चालक समाविष्ट |
| ८१ | वरिष्ठ सहाय्यक (राज्य शा) | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | |
| ८२ | कनिष्ठ सहाय्यक (राज्य शा) | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | |
| ८३ | सहाय्यक लेखाधिकारी (ग्रापापु) | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | |
| ८४ | वरिष्ठ सहाय्यक लेखा (ग्रापापु) | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | प्रपत्रात नव्याने समाविष्ट (स.क.विभाग) |
| | सहाय्यक सल्लागार (स.क.विभाग) | १ | ० | १ | १ | ० | १ | ० | ० | ० | चे पद आहे. |
| ८५ | क.सहा (कामानुसार हुद्दा हुद्यानुसार वेतन) | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | |
| ८६ | प्रशिक्षित दाई | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | |
| | **एकूण** . . | ८२६३ | ६९१ | ८९५४ | ७८२८ | ६५२ | ८४८० | ४३५ | ३९ | ४७४ | |

**विवरणपत्र-ब-५**

**दिनांक ३१.३.२०१६ अखेर सर्व संवर्गातील भरण्यात आलेली पदे व रिक्त पदे यांची संवर्ग निहाय माहिती.**

**(गट-ड मधील संवर्ग निहाय पदे) (वेतन बँड रु.५२००-२०२००, ग्रेड पे रु.१८००/- ते १९००/-व, वेतन बँड रु ४४००-७४०० ग्रेड पे रु.१३००/- ते १७००/- यातील पदे)**

| अ.क्र. | संवर्गाचे नाव | दिनांक ३१.३.२०१६ रोजीची मंजूर पदसंख्या | | | दिनांक ३१.३.२०१६ रोजी भरलेली पदे | | | दिनांक ३१.३.२०१६ रोजी रिक्त असलेली पदे | | | अभिप्राय |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | सरळ सेवा | पदोन्नती | एकूण | सरळ सेवा | पदोन्नती | एकूण | सरळ सेवा | पदोन्नती | एकूण | |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) | (१० | (११) | (१२) |
| १ | परिचर/हवालदार | ८३० | ० | ८३० | ८१५ | ० | ८१५ | १५ | ० | १५ | |
| २ | व्रणोपचार | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | |
| ३ | हवालदार | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | |
| ४ | स्त्री परिचर/ (पट्टीबंधक) | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | |
| | पट्टीबंधक पशुसंवर्धन | ० | ३८ | ३८ | ० | ३० | ३० | ० | ८ | ८ | |
| | पट्टीबंधक आरोग्य | १३ | ० | १३ | १३ | ० | १३ | ० | ० | ० | |

**विवरणपत्र ब-५**--चालू

| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) | (१० | (११) | (१२) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ५ | चौकीदार | ३ | ० | ३ | ३ | ० | ३ | ० | ० | ० | |
| ६ | मदतनीस | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | |
| ७ | मुकादम | २ | ० | २ | २ | ० | २ | ० | ० | ० | |
| ८ | मैलमजुर | १४ | ० | ९४ | ९४ | ० | ९४ | ० | ० | ० | |
| ९ | फायरमन | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | |
| १० | स्वीपर | ५७ | ० | ५७ | ३१ | ० | ३१ | २६ | ० | २६ | |
| | **एकूण** .. | **९९९** | **३८** | **१०३७** | **९५८** | **३०** | **९८८** | **४१** | **८** | **४९** | |

**स्वीपर :** सदरहू रिक्त पदे आरोग्य विभागामार्फत कंत्राटी स्वरुपाने भरण्याचे कार्यवाहीत आहेत.

## विभागीय सचिवांची साक्ष

पंचायती राज समितीने अमरावती जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्यावर अधिक माहिती घेण्यासाठी समितीने दिनांक ३ व ४ ऑक्टोबर, २०१७ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की, समितीने अमरावती जिल्हा परिषदेला भेट दिली असता, जिल्हा परिषद, पंचायत समित्या यांमधील विविध अधिकारी व कर्मचारी यांची अनेक पदे रिक्त असल्याचे आढळून आले आहे. या रिक्त पदांमुळे शासनाच्या विविध कल्याणकारी योजनांच्या अंमलबजावणीवर विपरित परिणाम होण्याची शक्यता लक्षात घेता सदर रिक्त पदे भरण्याच्या संदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली आहे. त्या अनुषंगाने जिल्हा परिषदेने केलेल्या कार्यवाहीमध्ये, गट “ब” मध्ये ९०, गट “क” मध्ये ५२३, गट “ ड ” मध्ये २० अशाप्रकारे एकूण ६३३ पदे रिक्त असल्याचे सांगितले आहे. समिती सदस्यांनी रिक्त पदांच्या संदर्भात मुख्य सचिवांची ३ वेळा भेट घेतली आहे, त्यांच्याकडे या संदर्भातील माहिती आहे. अमरावती जिल्ह्यात डॉक्टरांची एक्सेस पदे भरली आहेत. मात्र डॉक्टर सेवेत रुजू झाल्यापासून बाहेर आहेत किंवा तेथे नाहीतच. याबद्दल विभागाला जिल्हा परिषदेने किंवा सिव्हिल सर्जनने कळवून सुध्दा माहिती अपडेट होत नसेल तर यामध्ये दोषी कोण आहे हे आपण शोधले पाहिजे. वित्त विभागाच्या सन २०१५ च्या शासन निर्णयानुसार अत्यावश्यक रिक्त पदे भरण्याच्यासंदर्भात आरोग्य विभाग, लेखा विभाग अशा विभागांना कोणताही निर्बंध नाही, असे मुख्य सचिवांनी स्वतः समिती सदस्यांना सांगितले आहे. समिती वारंवार हा मुद्दा उपस्थित करीत आहे. समितीने भेट दिली, तेव्हाची ही जुनी रिक्त पदे आहेत. तत्कालीन आरोग्य मंत्री कालावधीत, प्राथमिक आरोग्य केंद्र व उप केंद्र यांचा बृहत आराखडा तयार केला होता, त्याचे ७० टक्के काम पूर्ण झाल्यानंतर, तेथील पदे भरण्यात यावीत, असा शासन निर्णय होता. सन २०१४ पासून प्राथमिक आरोग्य केंद्र, उप केंद्र येथे रिक्त पदे असल्याचे आढळून येत होते, मात्र ती पदे अद्यापही भरण्यात आलेली नाहीत. त्यामुळे यासाठी कोण जबाबदार आहे, एक-एक प्राथमिक आरोग्य केंद्राची इमारत तीन ते साडे तीन कोटी रुपयांची आहे. सद्यस्थितीत त्या इमारतीची किंमत साडे चार कोटी रुपये असणार आहे. ४३ ते ४७ लाख रुपयांची उप केंद्रे देखील बांधली आहेत, तेथे दोन नर्सेस आहेत. तेथे त्यांना राहण्याची देखील व्यवस्था आहे. मात्र असे असताना २-३ वर्षापासून अमरावती जिल्ह्यात एकही पद भरलेले नाही. वित्त विभागाचीही अडचण नाही, ग्रामविकास विभागाचीही अडचण नाही. मुख्य सचिव सांगत आहेत की, पदे भरावीत. मग पदे का भरली जात नाहीत हा प्रश्न निर्माण होत आहे त्यामुळे या प्रश्नाचे उत्तर आले पाहिजे. यावर प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग यांनी समितीस विदित केले की, प्राथमिक आरोग्य केंद्राच्या अंतर्गत पूर्वीपासून जी वैद्यकीय अधिकारी ही पदे आहेत, ती पदे भरण्यासाठी ३-४ प्रकारचे प्रयत्न करीत आहोत. पूर्वी ही पदे भरण्याचे अधिकार जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखालील समितीला दिले होते, मात्र त्यानंतर विषय असा उपस्थित झाला की, बिंदुनामावलीनुसार सर्व करावे. त्या जिल्ह्यात जो बिंदू आला आहे, त्या बिंदूचे वैद्यकीय अधिकारी नव्हते, त्यामुळे शासन स्तरावर धोरणात्मक निर्णय घेतला, त्यानुसार आपण ते सर्व बिंदू एकत्रित केले आहेत. आता जवळपास ३९४ पदांसाठी जाहिरात प्रसिध्द करण्यात आली होती. त्यांच्या विरूध्द अर्ज सादर करण्याची मुदत दिनांक २५ सप्टेंबर, २०१७

अशी ठेवण्यात आली होती. विभागाकडे जवळपास २२००-२३०० अर्ज प्राप्त झाले आहेत. प्राथमिक आरोग्य केंद्रातील वैद्यकीय अधिकारी यांची जवळपास ४०० पदे रिक्त आहेत, त्यातून ती पदे भरण्यात येतील त्याशिवाय माननीय मुख्यमंत्र्यांनी अलीकडेच वैद्यकीय अधिकारी यांची पदे १०० टक्के भरण्याची परवानगी दिली आहे. बिंदू ठरविण्याचे काम सुरु आहे. सार्वजनिक आरोग्य विभागाकडून सामान्य प्रशासन विभागाकडे तो प्रस्ताव पाठविलेला आहे. अस्थायी वैद्यकीय अधिकारी यांचा देखील अनुशेष आहे. अस्थायी वैद्यकीय अधिकारी यांच्या नियुक्तीचा प्रस्ताव माननीय मुख्यमंत्री यांच्याकडे सादर केला होता, त्या प्रस्तावाला माननीय मुख्यमंत्र्यांनी परवानगी दिली आहे. मात्र अडचण अशी आली आहे की, अस्थायी स्वरुपाचे, कॉंट्रॅक्च्युअल वैद्यकीय अधिकारी यांचे वेतन, वेतन लेखाशीर्षातून काढता येत नाही. मागच्या आठवड्यात सदर बाबतीतील प्रस्ताव माननीय मुख्यमंत्री यांच्याकडे सादर केला आहे. मार्च, २०१७ पर्यंत सार्वजनिक आरोग्य विभागाला अशी मुभा होती, तात्पुरत्या वैद्यकीय अधिका-यांचे वेतन, वेतन लेखाशीर्षातून काढत होतो. आता जर तशी परवानगी मिळाली तर तो प्रश्न सुटेल. असे जवळपास ८०० अधिकारी होते, त्यातील जवळपास ३०० अधिकारी सोडून गेले आहेत. कारण त्यांना एप्रिलनंतर वेतन नव्हते. ३-४ प्रकारचे कार्यक्रम हाती घेऊन वैद्यकीय अधिकारी ही पदे भरण्याचे पत्र निर्गमित करीत आहोत. जिल्हांतर्गत असणारे कर्मचारी यांचा आराखडा ठरविलेला आहे, ते कर्मचारी ग्रामविकास विभागामार्फत भरले जातात. सार्वजनिक आरोग्य विभागाची संबंधितांशी चर्चा झाली आहे.

समितीने विचारणा केली की, समितीचा आक्षेप असा आहे की, आराखडा काय ठरवायचा आहे, उप केंद्राचा व प्राथमिक आरोग्य केंद्राचा आराखडा ठरलेला आहे. मग आराखड्याचा विषय येतोच कुठे, प्राथमिक आरोग्य केंद्रात किती कर्मचारी/ अधिकारी असावेत, हे अगोदरच ठरलेले आहे. यावर प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग यांनी समितीस विदित केले की, समितीचे म्हणणे अगदी बरोबर आहे. सार्वजनिक आरोग्य विभागाने तोच मुद्दा वित्त विभागाकडे सादर केला आहे. जिल्हा रुग्णालयात किती पदे आवश्यक आहेत, प्राथमिक आरोग्य केंद्रात किती पदे आवश्यक आहेत, उप केंद्रात किती पदे आवश्यक आहेत, हे आपण ठरविलेले आहे. अशाप्रकारे संस्था वाढत असतील तर त्याप्रमाणे पदांमध्ये वाढ झाली पाहिजे. मात्र वित्त विभागाचा याला १०० टक्के सहमती नाही. तरीही वित्त विभागाने सार्वजनिक विभागाला सांगितले आहे की, काटकसरीचे धोरण बाकी विभागांसाठी आहे, ते आरोग्य विभागासाठी लागू करणार नाही. मात्र तरीही सार्वजनिक आरोग्य विभागाला प्रत्येक गोष्टीमध्ये वित्त विभागाकडे जावे लागते, त्यांची परवानगी घ्यावी लागते. यावर समितीने अशी विचारणा केली की, वित्त विभागाकडून नाकारले जाते का, हा मुद्दा अतिशय महत्वाचा आहे. सार्वजनिक आरोग्य विभागाच्या प्रधान सचिवांनी मुख्य सचिवांचा उल्लेख केला आहे, वित्त विभाग प्रस्ताव नाकारतात का, शासनाने शासन निर्णय काढलेला आहे. त्याला अधीन राहून मान्यता दिली पाहिजे. यावर प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग यांनी समितीला विदित केले की, शासन निर्णय आहे. प्राथमिक आरोग्य केंद्रासाठी किती कर्मचारी लागतात, उपकेंद्रासाठी किती कर्मचारी लागतात, जिल्हा रुग्णालयासाठी किती कर्मचारी लागतात, २०० बेडसाठी किती कर्मचारी लागतात, ३०० बेडसाठी किती कर्मचारी लागतात. यासंदर्भात व्यवस्थित शासन निर्णय आहे. यावर समितीने असे मत व्यक्त केले की, ते ठरलेले आहे. यावर प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग यांनी समितीस विदित केले की, मात्र तरीही नवीन आरोग्य संस्था निर्माण करण्यात येतात, त्यावेळी सार्वजनिक आरोग्य विभागाला पदे निर्माण करण्याकरिता वित्त विभागाकडे परवानगीसाठी जावे लागते. यावर समितीने अशी विचारणा केली की, शासनाने निर्णय केल्यानंतरही वित्त विभागाला हे सादर करावे लागते का, यावर प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग यांनी समितीस विदित केले की, होय एका संस्थेसाठी किती कर्मचारी लागतात, त्या संदर्भात शासन निर्णय आहे. वित्त विभागाचा अलीकडचा जो निर्णय आहे, त्याप्रमाणे सार्वजनिक आरोग्य विभागाला कार्यवाही करावी लागते. सार्वजनिक आरोग्य विभागाला वित्त विभाग पदे मंजूर करुन देतात. मात्र सार्वजनिक आरोग्य विभागाला वित्त विभागाकडे परवानगीसाठी जावे लागते.

समितीने अशी विचारणा केली की, अस्थायी वैद्यकीय अधिकारी यांचे ज्या लेखाशीर्षातून वेतन काढले जात होते, ते लेखाशीर्ष बंद करण्यात आले आहे. त्यामुळे आता त्यातून वेतन काढता येत नाही. राज्यात प्राथमिक आरोग्य केंद्र, ग्रामीण रुग्णालय, उप केंद्र यांच्या इमारती बांधून तयार आहेत. मात्र २-३ वर्षापासून कर्मचारी नसल्यामुळे लोकांकडून इमारतींचा नाश करण्यात येत आहे. लोक काचा फोडतात, तेथे जुगार खेळला जातो. २-३ वर्षापासून स्थायी पदे भरायची नाहीत, अस्थायी पदे भरायची नाहीत, आराखडा नाही, हे बरोबर नाही. इतक्या मोठ्या प्रमाणात अशा गोष्टी आरोग्य विभागात सुरु असतानाही तत्संदर्भात अंतिम निर्णय होत नाही, यावर समितीने पुढे असे मत व्यक्त केले की, समिती सदस्यांनी जो विषय मांडला आहे, तो संपूर्ण राज्याशी निगडीत विषय आहे. आरोग्य विभागाच्या संदर्भातील वातावरण काही योग्य नाही. शासन निर्णय काढला आहे, त्यानुसार त्या पदांना मान्यता देऊन पदे भरली गेली पाहिजेत. बिंदुनामावलीचा देखील विषय सांगण्यात आला. सदर विषयाच्या संदर्भात सारासार चर्चा झाली पाहिजे आणि या संदर्भात काही सोक्षमोक्ष लागला पाहिजे. जेणेकरुन राज्याच्या आरोग्य खात्याकडून योग्य कार्यवाही होईल. वैद्यकीय अधिका-यांची पदे भरली जातील.

## अभिप्राय व शिफारशी

पंचायती राज समितीने दिनांक ५ ते ७ नोव्हेंबर, २०१५ या कालावधीत अमरावती जिल्हा परिषदेला भेट दिली. भेटीच्या वेळी जिल्हा परिषदेच्या पदाधिकाऱ्यांसोबत केलेल्या अनौपचारीक चर्चेच्यादरम्यान अमरावती जिल्हा परिषदेअंतर्गत अधिकारी आणि कर्मचाऱ्यांची पदे मोठ्या प्रमाणावर रिक्त असल्याची बाब समितीच्या निदर्शनास आली. रिक्त पदांमुळे शासनाच्या विविध कल्याणकारी योजनांच्या अंमलबजावणीवर विपरीत परिणाम होण्याची शक्यता लक्षात घेता सदर रिक्त पदे तातडीने भरण्यासंदर्भात शासनाने केलेल्या कार्यवाहीबाबतची माहिती जाणून घेण्यासाठी समितीने दिनांक ३ व ४ ऑक्टोबर, २०१७ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली.

समितीने माहे नोव्हेंबर, २०१५ मध्ये भेट देण्याच्या वेळी रिक्त असलेल्या पदांपैकी गट “क” ची १३० व गट “ड” ची ५ अशी १३५ पदे विभागीय सचिवांचे साक्षीपर्यंत भरलेली आहेत. असे असूनही गट “क” व “ड” मधील ५०३ पदे रिक्त आहेत. गट “ब” मधील ८६ पदे अजूनही रिक्त आहेत. सदर ५८९ रिक्त पदांचा अतिरिक्त कार्यभार कार्यरत अधिकाऱ्यांवर देऊन त्यांचेकडून कामे करुन घेण्यात येत असल्यामुळे शासनाच्या कल्याणकारी योजनांची अंमलबजावणी प्रभावी होत नसल्याचे समितीला सांगण्यात येत असले तरी ज्या कर्मचाऱ्याकडे अतिरिक्त कार्यभार देण्यात आलेला आहे त्याच्या नियमित कामावर आणि अतिरिक्त कामावर दोन्हीकडे तो योग्यरितीने सक्षमपणे सेवा देऊ शकत नसल्यामुळे व्यापक जनहित साधले जात नाही. वित्त विभागाने दिनांक २ जून, २०१५ रोजी शासन निर्णय निर्गमित करुन वेतनावरील खर्च नियंत्रित करण्याच्या दृष्टीने पद भरती करीता टक्केवारी निश्चित केल्यामुळे जिल्हा परिषदेत मोठ्या प्रमाणावर रिक्त पदे आहेत. **अत: शिक्षण, आरोग्य, पाणीपुरवठा इत्यादी अत्यावश्यक विभागांना वर नमूद शासन निर्णयातील टक्केवारीची मर्यादा शिथिल करुन प्रशासन गतीमान होण्याच्या दृष्टीने आवश्यक त्या रिक्त जागा भरण्याच्या दृष्टीने तातडीने कार्यवाही करावी अशी समितीची शिफारस आहे.**

सन २००१ मध्ये सार्वजनिक आरोग्य विभागाने बृहत आराखडा मंजूर केलेला आहे. सदर बृहत आराखड्यास अनुसरुन नवीन प्राथमिक आरोग्य केंद्रे व उपकेंद्रांच्या इमारती बांधून तयार आहेत. अशा इमारतींमध्ये कर्मचारी नेमलेले नसल्यामुळे रिकाम्या इमारतीत असामाजिक व्यक्तींचा सुळसुळाट होऊन त्यांचा गैरवापर व त्यांची दुरावस्था होत आहे. **वस्तुत: एखाद्या प्राथमिक आरोग्य केंद्राला व उपकेंद्राला आवश्यक असणारा कर्मचाऱ्यांचा आकृतीबंध राज्यात सर्वत्र एकच असल्यामुळे त्यामध्ये कमीजास्त करण्याची आवश्यकता नसते. त्यामुळे आरोग्य विभागात तातडीने भरती करावी व ग्रामीण भागातील जनतेला वैद्यकीय सुविधा द्याव्यात अशी समितीची शिफारस आहे.**

**राज्यात सुमारे ४०० वैद्यकीय अधिकाऱ्यांची पदे रिक्त असून ती भरण्याकरीता मा.मुख्यमंत्र्यांनी परवानगी देऊनही ती भरण्याची प्रक्रिया अद्याप पूर्ण झालेली नाही. वैद्यकीय अधिकाऱ्यांचे बिंदू ठरविण्याचे काम सुरु असल्याची व ते काम सामान्य प्रशासन विभागाकडे प्रलंबित असल्याची माहिती समितीस प्राप्त झाली. त्या अनुषंगाने सामान्य प्रशासन विभागाने वैद्यकीय अधिकाऱ्यांची बिंदू नामावली तातडीने अद्ययावत करून ती अंतिम करावी अशीही समितीची शिफारस आहे.**

आरोग्य विभागातील अस्थायी वैद्यकीय अधिकाऱ्यांचा अनुषेश देखील प्रचंड प्रमाणात आहे. वर्षानुवर्षे अनेक डॉक्टरर्स अस्थायी वैद्यकीय अधिकारी म्हणून राज्यातील ग्रामीण व दुर्गम भागातील नागरीकांना वैद्यकीय सुविधा देत असत, परंतू अस्थायी स्वरुपाचे कंत्राटी वैद्यकीय अधिकारी यांचे वेतन ज्या लेखाशीर्षातून काढण्यात येत असे ते लेखाशीर्षच बंद केले असल्यामुळे अस्थायी स्वरुपाच्या, कंत्राटी वैद्यकीय अधिकाऱ्यांचे वेतन काढता आलेले नाही. **परिणामी राज्यातील जे सुमारे ८०० अस्थायी, कंत्राटी वैद्यकीय अधिकारी कार्यरत होते त्यातील ३०० वैद्यकीय अधिकारी शासनाच्या सेवेतून बाहेर पडले आहेत. त्यामुळे ग्रामीण व दुर्गम भागातील आरोग्य सेवा मोठ्या प्रमाणात विस्कळीत झालेली आहे. अत: विभागाने युध्दपातळीवर कार्यवाही करुन राज्यातील वैद्यकीय अधिकाऱ्यांची रिक्त पदे तातडीने भरण्यासंदर्भात कार्यवाही करावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल दोन महिन्यांत समितीस सादर करावा अशीही समितीची शिफारस आहे.**

-----------------

## प्रकरण चार

## जिल्हा परिषद, अमरावती (प्रशासन)

### ग्रामीण तीर्थक्षेत्र विकास योजना (पंचायत समिती, चांदूर रेल्वे)

पंचायती राज समितीने दिनांक ५ ते ७ नोव्हेंबर, २०१५ या कालावधीत अमरावती जिल्हा परिषदेस भेट दिली. भेटीच्या वेळी सन २०१२-२०१३ या वर्षाच्या वार्षिक प्रशासन अहवालावरील चर्चेदरम्यान जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने अशी विचारणा केली की, अवधूत महाराज तीर्थक्षेत्र, सावंगा हे " ब " वर्ग तीर्थक्षेत्र आहे. परंतु, तेथे येणाऱ्या भाविकांसाठी कोणत्याही सोईसुविधा उपलब्ध नाहीत. यावर उप अभियंता बांधकाम यांनी समितीस विदित केले की, अवधूत महाराज तीर्थक्षेत्र विकासाचा ८ कोटी १६ लाख रुपयांचा प्रस्ताव शासनाकडे सादर केलेला आहे. सन २०१४-१५ मध्ये अवधूत महाराज तीर्थक्षेत्र येथे भक्त निवासाचे बांधकाम सुरु करण्यात आले आहे. त्यासाठी ५० लाख रुपयांची तरतूद प्राप्त झालेली आहे. भक्त निवासाच्या बांधकामासाठी ६५ लाख रुपये खर्च येणार आहे. भक्त निवासाच्या पायाचे खोदकाम झालेले असून काम सुरु आहे. तेथील विकास कामे प्रस्तावित आहेत. यावर समितीने विचारणा केली की, आपल्याला तीर्थक्षेत्र विकास कार्यक्रमांतर्गत तेथे भाविकांसाठी सोईसुविधा उपलब्ध करुन देता येतील. तीर्थक्षेत्राच्या विकासासाठी यापूर्वी निधी केव्हा प्राप्त झाला होता, भक्त निवासाचे काम केव्हा सुरु करण्यात आले आहे, यावर उप अभियंता बांधकाम यांनी समितीस विदित केले की, सन २००७-०८ मध्ये पाणी पुरवठा योजनेसाठी ५ लाख रुपये प्राप्त झाले होते. पाणी पुरवठा करण्यासाठी तेथे ६ टाक्यांचे बांधकाम करण्यात आले आहे. तेथे विहिरीवरुन पाणी पुरवठा केला जातो. तसेच, तेथे प्रधानगृहाचे बांधकाम केलेले आहे. मागील महिन्यात काम सुरु केलेले आहे. भक्त निवासासाठी नदीकाठी जागा घेण्यात आली होती. परंतु, त्या जागेचा वाद होता. त्यामुळे विलंब झालेला आहे.

समितीने पुढे अशी विचारणा केली की, बुडित क्षेत्रात बांधकाम करण्यास परवानगी कशी काय दिली जाते, समितीने तेथे भेट दिली असता तेथे शौचालयाचे बांधकाम केल्याचे आढळून आले नाही. तेथे पाण्याची देखील टंचाई आहे. तीर्थक्षेत्र विकासासाठी शासनाकडून मोठ्या प्रमाणावर निधी मिळतो. भक्त निवासाच्या बांधकामासाठी ५० लाख रुपये केव्हा प्राप्त झाले होते, यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस विदित केले की, भक्त निवासाच्या जागेचा वाद होता. तो त्यांनी सोडविलेला आहे. आता बुडित क्षेत्राऐवजी वरच्या भागात भक्त निवासाचे बांधकाम करण्यात येत आहे. यावर कार्यकारी अभियंता, बांधकाम यांनी समितीस विदित केले की, या तीर्थक्षेत्राला "क" वर्ग दर्जा प्राप्त झालेला होता. परंतु, सन २०१३-१४ मध्ये या तीर्थक्षेत्राला "ब" वर्ग दर्जा प्राप्त झालेला आहे. आम्ही तीर्थक्षेत्र विकासाचा ८ कोटी रुपयांचा प्रस्ताव शासनाकडे सादर केलेला आहे. या तीर्थक्षेत्राला "क" वर्ग दर्जा प्राप्त असताना सन २००७-०८ मध्ये तेथे वाहन तळ आणि पाण्याच्या टाकीचे काम करण्यात आलेले आहे. यावर समितीने विचारणा केली की, तेथील रस्त्याचे काम अपूर्ण आहे. यावर कार्यकारी अभियंता बांधकाम यांनी समितीस विदित केले की, ६०० मीटर रस्त्याचे काम हाती घेतलेले आहे. १० लाख रुपये किंमतीचे काम आहे. रस्त्याच्या बीबीएमचे काम पूर्ण झालेले आहे. यावर समितीने निदेश दिले की, रस्त्याचे काम पूर्ण करुन घ्यावे.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्द्यांबाबत विभागाकडून माहिती मागविली.**

(१) समितीने अवधुत महाराज तीर्थक्षेत्र, सावंगा वि., ता. चांदुर रेल्वे, जि. अमरावती या तीर्थक्षेत्राला भेट दिली असता तेथे भाविकांसाठी कोणत्याही सोयी सुविधा आढळून आल्या नाहीत. तसेच भक्त निवास बांधकाम नदिकाठी प्रस्तावित केलेले असुन त्या जागेचा वाद असणे, शौचालय बांधकाम अद्याप केलेले नसणे, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था नसणे, इत्यादी बाबी समितीच्या निदर्शनास आलेल्या आहेत. या संदर्भात चौकशी करुन अहवाल सादर करण्याचे निदेश समितीने दिले आहेत. त्यानुसार चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले ?

(२) राज्य शासनाकडून तीर्थक्षेत्र विकास योजनेवर मोठ्या प्रमाणावर निधी दिला जातो त्याचा विनियोग योग्य प्रकारे होतो किंवा कसे या बाबत पडताळणी करण्यासंदर्भात शासनाचे धोरण काय आहे ?

**उपरोक्त मुद्द्यांसंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

श्री.अवधुत महाराज तीर्थक्षेत्र, सावंगा विठोबा या संस्थानास महाराष्ट्र शासन ग्रामविकास व जलसंधारण विभागातील ग्रामविकास उपविभाग, मुंबई यांचे पत्र क्रमांक तिर्थक्षेत्र/२०१३/प्र.क्र.६५/ योजना ७, दिनांक १ नोव्हेंबर, २०१३ नुसार “ब” वर्ग तीर्थक्षेत्राचा दर्जा प्राप्त झालेला आहे.

श्री. अवधुत महाराज तीर्थक्षेत्र, सावंगा विठोबा, ता.चांदुररेल्वे, जि.अमरावती येथे महाराष्ट्र शासन, ग्रामविकास प्र.क्र.३६३/योजना-७/मंत्रालय मुंबई, दि.२२ ऑगस्ट २०१४ नुसार, भक्तनिवास (स्त्री) बांधकामास रू.६५.०० लक्ष या रक्कमेला प्रशासकीय मान्यता प्राप्त झालेली आहे.

सदर कामास अधीक्षक अभियंता सार्वजनिक बांधकाम मंडळ, अमरावती यांनी तांत्रिक मंजुरी क्र.१९७/अ.अ./इमा/ जि.प./२०१४-१५ नुसार रु.५७,०३,०००/- या रक्कमेला मान्यता प्रदान केलेली आहे. कामाचे तांत्रिक बाबींमध्ये स्त्री भक्त निवासांमध्ये/ शौचालयाचे बांधकाम अंतर्भुत केलेले आहे.

या कामावर आतापर्यंत एकूण रुपये ६५.०० लक्ष निधी प्राप्त झाला सद्य:स्थितीत स्त्री भक्त निवासाचे काम पूर्ण झाले असून या कामावर ३१ मार्च, २०१६ पर्यंत रु.३.७४ लक्ष खर्च झालेला आहे.

ग्रामपंचायत सावंगा विठोबा यांचे ठराव क्र.११ दिनांक ३०-०६-२०१५ नुसार नमुना ८ अ, मालमत्ता क्रमांक २३७, वॉर्ड क्र.२ येथील ८० फुट X ८० फुट आकाराची नदीकाठी असलेली जागा स्त्री भक्त निवासाचे बांधकामा करीता ग्रामपंचायत ने प्रस्तावित केलेली होती. सदर जागेबाबत श्री.अवधुत महाराज संस्थान, सावंगा विठोबा व ग्रामस्थांनी आक्षेप घेतलेला होता.

परंतू स्त्री भक्त निवासाचे बांधकाम प्रस्तावित करतांना नमुना ८ अ, मालमत्ता क्रमांक ३६३, वार्ड क्र.३, येथील १०० फुट X ५० फुट जागा नियोजित करून देण्यात आलेली होती. सध्या स्त्री भक्त निवासाचे बांधकाम या नियोजित जागीच करण्यात येत असून, सदर जागा बुडीत क्षेत्रात येत नाही.

श्री. अवधुत महाराज संस्थान सावंगा, विठोबा यापुर्वी क वर्ग तिर्थ क्षेत्रामध्ये असल्यामुळे त्या जागी वेगळे शौचालयाचे बांधकाम क वर्ग तीर्थक्षेत्र विकास निधी अंतर्गत वर्ष २००७-२००८ मध्ये रूपये ३.८६ लक्ष या रक्कमेचे पुर्ण करण्यात आलेले आहे.

तसेच सन २००७-२००८ मध्ये या जागी वेगवेगळया ठिकाणी रूपये ५.०० लक्ष या प्राप्त निधी मधुन पिण्याचे पाण्याची व्यवस्था करण्यात आलेली आहे.

**उपरोक्त मुद्यासंदर्भात ग्रामविकास विभागाकडून खालीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

पंचायती राज समितीने दिलेल्या निर्देशानुसार श्री.अवधुत महाराज तीर्थक्षेत्र, सावंगा विठोबा या तीर्थक्षेत्राच्या ठिकाणी करण्यात येणाऱ्या कामांबाबत गट विकास अधिकारी, पंचायत समिती चांदुर रेल्वे यांनी भेट देऊन चौकशी केलेली आहे. सदर चौकशीत आढळून आलेल्या बाबी खालीलप्रमाणे आहेत :-

**(अ) भक्तनिवास (स्त्री) जागेबाबतचा वाद :**

पंचायती राज समितीने सदर तीर्थक्षेत्रास भेट दिली तेव्हा जागेचा वाद होता. सदर वाद आता संपुष्टात आला आहे. ग्रामपंचायतीने ठरविलेल्या नियोजित जागेवरच (देवस्थानच्या बाजूला) भक्तनिवासाचे बांधकाम सुरू असून त्यामध्ये शौचालय सुविधा अंतर्भुत केलेल्या आहेत.

**(ब) शौचालयाचे बांधकाम अद्याप केलेले नसणे :**

सन २००५-०६ मध्ये वर्ग ग्रामीण तीर्थक्षेत्र विकास योजनेतून भाविकांकरीता १२ शौचालयाचे बांधकाम केलेले आहे. तसेच सन २००७-०८ मध्ये ६ शौचालय व ६ स्नानगृहाचे बांधकाम करण्यात आलेले आहे. तसेच सद्य:स्थितीत बांधण्यात येणाऱ्या भक्तनिवास (स्त्री) यामध्येही शौचालयाची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे.

**क) पिण्याच्या पाण्याची व्यवस्था नसणे :**

भारत निर्माण योजनेतून सावंगा विठोबा येथे गावकरी व भाविकांकरीता ५०,००० लीटर पाण्याच्या टाकीचे व नळ योजनेचे काम करण्यात आले आहे. तसेच सन २००७-०८ मध्ये " क " वर्ग ग्रामीण तीर्थक्षेत्र विकास योजनेतून गावकरी व भाविकांकरीता वेगवेगळया ठिकाणाहून पिण्याच्या पाण्याची सोय करण्यात आली आहे.

**राज्य शासनाकडून देण्यात येणाऱ्या निधीच्या विनियोगाची पडताळणी करण्याबाबतचे शासनाचे धोरण**

सद्य:स्थितीत श्री.अवधुत महाराज तीर्थक्षेत्र, सावंगा विठोबा ता.चांदुर रेल्वे, जि.अमरावती येथे भक्त निवास (स्त्री) बाधकामाकरीता ग्रामविकास विभाग, शासन निर्णय, दिनांक २२ ऑगस्ट, २०१४ नुसार रूपये ६५.०० लक्ष इतक्या रक्कमेला प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली आहे. त्यापैकी रु. ५०.०० लक्ष इतका निधी जिल्हा परिषद, अमरावती यांना वितरीत करण्यात आला आहे. सदर वितरीत निधीपैकी मार्च २०१६ अखेर रू.३१.८१ लक्ष इतका खर्च झालेला आहे. सदर खर्चाचा विनियोग योग्य रितीने होतो किंवा कसे याबाबत स्थानिक निधी लेखा परिक्षण यांचेकडून दरवर्षी पडताळणी करण्यात येते.

**चौकशी अहवाल**

श्री. क्षेत्र सावंगा (विठोबा) ता.चांदुर रेल्वे अवधुत महाराज संस्थान या तीर्थक्षेत्रास पंचायती राज समितीने दिनांक ६ नोव्हेंबर, २०१५ रोजी भेट दिली असता त्यांना प्रत्यक्ष पाहणीच्या वेळी आढळलेल्या तुटी संदर्भात चौकशी करुन अहवाल सादर करण्याबाबत निर्देश दिलेले आहे. त्याप्रमाणे चौकशी करुन अहवाल सादर करण्यात येत आहे.

ग्राम पंचायत सावंगा विठोबा येथे जाऊन चौकशी केली असता खालील बाबी निदर्शनास आल्या.---

श्री. क्षेत्र अवधुत महाराज संस्थान अंदाजे ३०० वर्षापुर्वीचे जुने मंदीर आहे. त्या संस्थानास यापुर्वी "क" वर्ग दर्जा प्राप्त होता. दिनांक १-११-२०१३ अन्वये या संस्थानास "ब" वर्ग दर्जा प्राप्त झालेला आहे. संस्थान "क" वर्ग दर्जामध्ये असतांनी भाविकांकरता सन २००५-०६ मध्ये ग्राम पंचायत बांधकाम मार्फत १२ शौचालयाचे बांधकाम केले आहे. आज रोजी ते वापरात नाही.

तसेच सन २००७-०८ मध्ये तिर्थक्षेत्र विकास कार्यक्रमा अंतर्गत बांधकाम विभागामार्फत ०६ शौचालयाचे व ६ स्नानगृहाचे पुरुष व स्त्री करिता बांधकाम केले आहे. ही सुविधा यात्रेचे काळात अपुरी आहे.

तसेच गावकरी व भाविकांकरिता सावंगा विठोबा येथे ५०,००० लीटर पाण्याची टाकीचे व नळ योजनेचे काम भारत निर्माण योजने मधुन करण्यात आले आहे. सन २००७-०८ मध्ये "क" वर्ग तीर्थक्षेत्र अंतर्गत गावकरी व भाविकांकरिता वेगवेगळया ठिकाणावरुन पाणी वितरणाची व्यवस्था करण्यात आली आहे. ही सुविधा सुध्दा यात्रेचे काळात अतीशय अपुरी आहे. तसेच सन २०१४-१५ मध्ये तिर्थक्षत्र विकास कार्यक्रमा अंतर्गत महिला भक्त निवासाचे काम मंजूर असून समितीने जेव्हा भेट दिली. तेव्हा जागेचा वाद होता तो वाद आता संपुष्टात आलेला आहे. ग्राम पंचायतीने पहिले ठरविलेल्या नियोजीत जागेवरच भक्त निवासाचे काम सुरु केले असून त्यामध्ये शौचालय सुविधा अंतर्भूत केलेल्या आहेत. जागेचा वाद संपुष्टात आलेला असून बांधकाम प्रगतीत आहे. सोबत बांधकामाचे फोटो जोडलेले आहे.

**विभागीय सचिवांची साक्ष**

पंचायती राज समितीने अमरावती जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्यावर अधिक माहिती घेण्यासाठी समितीने दिनांक ४ ऑक्टोबर, २०१७ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की, समितीने अवधुत महाराज तीर्थक्षेत्र, सावंगा वि,.ता.चांदुर रेल्वे, जि. अमरावती या तिर्थक्षेत्राला भेट दिली असता तेथे भाविकांसाठी कोणत्याही सोयी सुविधा आढळून आल्या नाहीत. तसेच भक्त निवास बांधकाम नदिकाठी प्रस्तावित केलेले असुन त्या जागेचा वाद असणे, शौचालय बांधकाम अद्याप केलेले नसणे, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था नसणे, इत्यादी बाबी समितीच्या निदर्शनास आलेल्या आहेत. या संदर्भात चौकशी करुन अहवाल सादर

करण्याचे निदेश समितीने दिले आहेत. त्यानुसार चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, राज्य शासनाकडून तिर्थक्षेत्र विकास योजनेवर मोठ्या प्रमाणावर निधी दिला जातो त्याचा विनियोग योग्य प्रकारे होतो किंवा कसे या बाबत पडताळणी करण्यासंदर्भात शासनाचे धोरण काय आहे, यावर सचिव, ग्रामविकास विभाग यांनी समितीस विदित केले की, या मुद्द्यातील सर्व कामे संपलेली आहेत. यामध्ये जे ६४ लाख रुपये होते त्यापैकी ३४ लाख रुपये खर्च झालेले आहेत आणि ३० लाख रुपयांची कामे प्रगतीपथावर आहेत.

## अभिप्राय व शिफारशी

पंचायती राज समितीने दिनांक ५ ते ७ नोव्हेंबर, २०१५ या कालावधीत अमरावती जिल्हा परिषदेला भेट दिली. सन २०१२-१३ या वर्षाच्या वार्षिक प्रशासन अहवालावरील प्रश्नावली क्रमांक २ च्या संदर्भात जिल्ह्यातील शाळा, प्राथमिक आरोग्य केंद्रे, उपकेंद्रे, अंगणवाड्या, तीर्थक्षेत्र, पशुवैद्यकीय दवाखाने इत्यादींना भेटी दिल्या. त्यापैकी समितीने श्री अवधुत महाराज तीर्थक्षेत्र, सावंगा वि., ता.चांदुर रेल्वे, जि. अमरावती या तिर्थक्षेत्राला भेट दिली असता तेथे भाविकांसाठी कोणत्याही सोयी-सुविधा आढळून आल्या नाहीत. तसेच भक्त निवास बांधकाम नदीकाठी प्रस्तावित केलेले असुन त्या जागेचा वाद असणे, शौचालय बांधकाम अद्याप केलेले नसणे, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था नसणे, इत्यादी बाबी समितीच्या निदर्शनास आलेल्या आहेत. या संदर्भात चौकशी करुन अहवाल सादर करण्याचे निदेश समितीने दिले.

समितीने दिलेल्या निदेशानुसार जिल्हा परिषदेने प्रस्तुत प्रकरणात चौकशी करुन त्याबाबतचा अहवाल समितीस सादर केला. श्री. अवधूत महाराज तीर्थक्षेत्र यांस “ब” वर्ग तीर्थक्षेत्राचा दर्जा प्राप्त झाला असल्याचे समितीस कळविले, तसेच ग्रामविकास विभागाने महिला भक्तनिवास बांधण्याकरीता ६५ लक्ष रुपयांच्या कामाला प्रशासकीय मान्यता दिली. सदरहू भक्तनिवासाच्या कामामध्ये शौचालयाचे बांधकाम अंतर्भूत केले होते. नदीच्या काठावर बांधण्यात येत असलेल्या महिला भक्तनिवासाच्या कामाला तीर्थक्षेत्र संस्थांन आणि ग्रामस्थांनी आक्षेप घेतला होता. त्यामुळे मध्यंतरी त्याचे काम बंद पडलेले होते. परंतू जागेचा वाद मिटल्यामुळे महिला भक्त निवास बांधकाम प्रगतीपथावर आहे.

**समितीच्या भेटी, विभागीय सचिवांची साक्ष या सर्वांचा परिणाम स्वरुप ३०० वर्ष जुने श्री क्षेत्र अवधूत महाराज संस्थान या तीर्थक्षेत्रावर दूर अंतरावरुन येणाऱ्या महिला भक्तांना निवासाकरीता सुविधा देण्यासाठी किरकोळ वादामुळे बंद पडलेले काम पुन्हा सुरु झाल्याबाबत समिती समाधान व्यक्त करते. परंतू जेव्हा अवधूत महाराजांची यात्रा भरते तेव्हा यात्रा कालावधीमध्ये पुरुष आणि स्त्रियांकरीता बांधण्यात आलेली ६ शौचालये ही अत्यंत अपुरी असून भक्तांच्या संख्येस अनुसरुन शौचालयांची व प्रसाधनगृहांची संख्या वाढविण्यात यावी तसेच आगामी यात्रा विचारात घेता प्रगतीपथावर असलेले काम तातडीने पूर्ण करावे व केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस एक महिन्यात पाठविण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

-----------------

## प्रकरण पाच

## जिल्हा परिषद, अमरावती

### जिल्हा परिषद अमरावती अंतर्गत गैरव्यवहार व अपहाराची प्रलंबित प्रकरणे

पंचायती राज समितीने दिनांक ५ ते ७ नोव्हेंबर, २०१५ या कालावधीत अमरावती जिल्हा परिषदेस भेट दिली. भेटीच्या वेळी सन २०१२-१३ या वर्षाच्या वार्षिक प्रशासन अहवालावरील चर्चेदरम्यान अमरावती जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने अशी विचारणा केली की सन २०१२-१३ मध्ये पंचायत समिती अमरावती अंतर्गत सामान्य निधीची ७ प्रकरणे उघडकीस आली आहेत. प्रमाणके दफ्तरी उपलब्ध नसणे, वसूल रकमा कमी जमा करणे किंवा जमा न करणे, रॉयल्टीच्या रकमांचा भरणा न करणे, आयकर/विक्रीकर रकमांचा भरणा न करणे, मूल्यांकनापेक्षा जादा खर्च व नियमबाह्य खर्च असे गैरव्यवहाराच्या प्रकरणांचे स्वरुप आहे. सदर प्रकरणांमध्ये एकूण ५,२८,६१७/- रुपये गुंतलेले असून यामध्ये ६ कर्मचाऱ्यांचा समावेश आहे. सदर प्रकरणाची प्राथमिक चौकशीची कार्यवाही करण्यात आली असून यापैकी एकही प्रकरण निकाली निघालेले नाही, असे लेखी उत्तरात नमूद केलेले आहे. यावर गट विकास अधिकारी, पंचायत समिती, अमरावती यांनी समितीस विदित केले की, गैरव्यवहाराच्या ७ प्रकरणांची प्राथमिक चौकशी करुन ती प्रकरणे जिल्हा परिषदेकडे पाठविण्यात आली आहेत. गैरव्यवहाराच्या प्रकरणांमध्ये गुंतलेल्या रकमेपैकी ३,६१,८२३/- रुपये वसूल झालेले आहेत. उर्वरित १,६६,०००/- रुपये वसूल होणे बाकी आहेत. संबंधितांकडून रक्कम वसूल करण्याची कार्यवाही सुरू आहे. गैरव्यवहाराच्या ७ प्रकरणांची प्राथमिक चौकशी करुन ती प्रकरणे दोन महिन्यांपूर्वी जिल्हा परिषदेकडे पुढील कार्यवाहीसाठी पाठविण्यात आली आहेत. यावर समितीने असे निदेश दिले की, संबंधितांची एक वेतनवाढ थांबवावी, त्यांच्या सेवा पुस्तकात नोंद घ्यावी आणि त्यांच्याकडून व्याजासह रक्कम वसूल करावी. व्याजासह रक्कम वसूल होत नसेल तर संबंधितांवर एफआयआर दाखल करावा.

समितीने पुढे अशी विचारणा केली की, सन २०१२-१३ पूर्वी उघडकीस आलेली सामान्य निधीची एकूण ११२ प्रकरणे होती. ११२ प्रकरणांची प्राथमिक चौकशी पूर्ण करण्यात आली असून प्राथमिक चौकशी अहवाल जिल्हा परिषदेकडे सादर करण्यात आला आहे. प्राथमिक चौकशी झालेल्या ११२ प्रकरणांपैकी १८ प्रकरणे निकाली निघालेली असून उर्वरित ९४ प्रकरणे निकाली निघालेली नाहीत. सिद्ध अपहार रकमांचा भरणा करण्याबाबत संबंधितांना नोटिसेस दिल्या असून वसुलीची कार्यवाही सुरु असल्याचे लेखी उत्तरात नमूद केले आहे. ११२ प्रकरणांमध्ये एकूण किती रक्कम गुंतलेली आहे, त्यापैकी किती रक्कम वसूल झाली आणि किती रक्कम वसूल होणे बाकी आहे, यावर गट विकास अधिकारी यांनी समितीस माहिती दिली की, ११२ प्रकरणांमध्ये ८३,८९,१११/- रुपये गुंतलेले आहेत. सिद्ध अपहाराची रक्कम ४३,६५,६९६/- रुपये आहे. समायोजनासह वसूल झालेली रक्कम ४१,७७,४५९/- रुपये आहे. यावर समितीने अशी विचारणा केली की, अद्याप ४२ लाख रुपयांच्या आसपास रक्कम वसूल झालेली नाही. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस माहिती दिली की, १४ कोटी रुपयांची वसुली करावयाची आहे. जिल्हा परिषदेकडे एकूण २४३ प्रकरणे आलेली आहेत. आम्ही त्या प्रकरणांची छाननी सुरु केलेली आहे. जी प्रकरणे प्राथमिक चौकशीमध्ये निकाली निघणार नाहीत त्या प्रकरणांमध्ये जिल्हा परिषद एफआयआर दाखल करेल.

समितीने पुढे विचारणा केली की, सन १९८०-८१ चे जुने प्रकरण आहे. या प्रकरणामध्ये आता पर्यंत वकिलाला किती फी दिलेली आहे, या समितीच्या प्रश्नावर गट विकास अधिकारी यांनी अशी माहिती दिली की, याबाबतची माहिती जिल्हा परिषद स्तरावर असते. ग्रामसेवक, श्री. टवलारे सेवानिवृत्त झालेले आहेत. त्यांच्यावर सन १९८६ मध्ये गुन्हा दाखल झालेला आहे. या प्रकरणी जिल्हापरिषदेने वकील नियुक्त केलेला आहे. या प्रकरणामध्ये ७,१४४/- रुपये गुंतलेले आहेत. समितीने दिलेल्या निदेशानुसार जिल्हापरिषदेने याबाबत माहिती घ्यावी आणि ती समितीला सादर करावी. समजा ७ हजार रुपये वसूल करण्यासाठी वकिलाला ७० हजार रुपये फी दिली गेली असेल तर ते गंभीर आहे. जिल्हा परिषदेने हे प्रकरण अद्याप निकाली

का काढले नाही, वकिलाला एका दिवसाची ५०० रुपये फी द्यावी लागते. मग ती रक्कम गट विकास अधिकाऱ्यांच्या वेतनातून का वसूल करण्यात येऊ नये, या समितीच्या प्रश्नावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस विदित केले की, १४ कोटी रुपये रक्कम आहे. जिल्हा परिषद सरसकट एफआयआर दाखल करणार आहे. समितीने यावर निदेश दिले की, जिल्हा परिषदेने वकील नियुक्त केलेला आहे. जिल्हा परिषदेला वकिलाला जास्त फी द्यावी लागेल. गैरव्यवहाराच्या प्रकरणात ५० हजार किंवा २५ हजार रुपयांपेक्षा जास्त रक्कम गुंतलेली असेल तर संबंधित व्यक्तीला नोटीस द्यावी आणि त्यांनी वेळेवर पैसे दिले नाहीत तर त्यांच्यावर फौजदारी गुन्हा दाखल करावा. तसेच, ज्या प्रकरणामध्ये १ लाख रुपयांपेक्षा जास्त रक्कम गुंतलेली असेल त्या प्रकरणी प्रथमदर्शनी एफआयआर दाखल करावा. ज्या प्रकरणात १० हजार रुपयांपेक्षा जास्त रक्कम गुंतलेली आहे त्या प्रकरणी एफआयआर दाखल केला तर त्या व्यक्तीला सामोरे जावे लागते. म्हणून ती व्यक्ती १० हजार रुपये भरेल. त्यांनी पैसे भरले तर केस दाखल करण्याची आवश्यकता नाही. परंतु, तरीही आपली प्रशासकीय कार्यवाही सुरू राहील. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस विदित केले की, संबंधित अधिकारी/कर्मचारी सेवानिवृत्त होऊन १० वर्षे झालेली असली तरी आपण त्यांच्यावर गुन्हा दाखल करु शकतो. समितीच्या मते जिल्हापरिषदेने असे केले तर गैरव्यवहाराच्या प्रकरणांमध्ये गुंतलेली रक्कम मोठ्या प्रमाणावर वसूल होईल आणि जे गुन्हेगार आहेत त्यांना शिक्षा होईल. समितीने सूचना केली की, ज्या प्रकरणांमध्ये १० हजार रुपयांपेक्षा जास्त रक्कम गुंतलेली आहे त्या प्रकरणी संबंधितांना नोटीस द्यावी. एफआयआर दाखल केल्यानंतर संबंधितांना त्याला सामोरे जावे लागेल. जास्त रक्कम गुंतलेली असेल तर थेट एफआयआर दाखल करावा. यावर सहा.संचालक यांनी समितीस विदित केले की, १० हजार रुपयांपेक्षा जास्त रक्कम गुंतलेली असेल तर संबंधितांना नोटीस द्यावी आणि ५० हजार रुपयांपेक्षा जास्त रक्कम गुंतलेली असेल तर एफआयआर दाखल करावा. ते वकिलाची नियुक्ती करुन केस लढतील. १० हजाराच्या आत रक्कम गुंतलेली असेल तर प्रशासकीय कार्यवाही करावी. समितीच्या मते सन १९८०-८१ चे प्रकरण अद्याप निकाली निघालेले नाही. प्रकरण लवकर निकाली निघाले नाही तर वकिलाला फी मिळते. आपण हे प्रकरण लवकरात लवकर निकाली काढावे. संपूर्ण राज्यात हा विषय आहे. आपण शक्य असेल तर हे प्रकरण लोक अदालतमध्ये दाखल करुन ते निकाली काढावे असे निदेश समितीने दिले.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्दयांबाबत विभागाकडून माहिती मागविली.**

समितीने विविध जिल्हा परिषदांना भेटी दिल्या असत्या सर्व जिल्हा परिषदांमध्ये गैरव्यवहार व अपहाराची प्रकरणे दीर्घ काळापासुन प्रलंबित असल्याचे व अशा प्रकरणामध्ये मोठया प्रमाणावर शासनाचा निधी गुंतून पडल्याचे निदर्शनास आले आहे. थोडया रक्कमा असलेल्या प्रकरणात गुन्हे दाखल केल्यास त्या रक्कमेपेक्षा जास्त रक्कम वकीलाची फी इत्यादीवर खर्च होऊ शकते. परिणामी अशा प्रकरणामध्ये विगतवारी करुन कार्यवाही करण्यासंदर्भात शासनाची भुमिका काय आहे ?

**उपरोक्त मुद्यांसंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालील प्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

गट विकास अधिकारी, अमरावती यांचे प्राप्त अहवालावरून पंचायत समिती अमरावती अंतर्गत सन २०१२-१३ मध्ये एकूण ७ अफरातफर प्रकरणे उघडकीस आली. त्यात ६ ग्रामसेवक गुंतलेले आहेत. गुंतलेली एकूण रक्कम रू.५,२८,६१७/- असुन यापैकी रक्कम रुपये ३,६८,७२५/- समायोजन करण्यात आलेले आहे व उर्वरित रक्कम रुपये १,५९,८९२/- वसुल करण्यात आलेली आहे.

सन २०१२-१३ पुर्वी एकूण ११२ अफरातफर प्रकरणे उघडकीस आली. त्यापैकी सर्व प्रकरणांची प्राथमिक चौकशी पूर्ण करण्यात आली असुन ११२ प्रकरणामध्ये एकुण रुपये ८३,८९,१११/- संशयीत रक्कम आहे. त्यापैकी रु. ४०,३२,२९२/- समायोजन करण्यात आले असुन वसुलपात्र रक्कम रुपये ४३,५६,८१९/- पैकी रु. ३,६५,७५७/- वसुल करण्यात आलेले आहेत. उर्वरित रु. ३९,९१,०६२/- थकीत आहेत.

सदर थकित रक्कमेबाबत संबंधितास नोटीसेस देवुन

| | |
|---|---|
| (१) सेवेतून कमी करण्यात आले | १ ग्रामसेवक |
| | (१ प्रकरण) |
| (२) फौजदारी गुन्हा दाखल | ५ ग्रामसेवक |
| | (११ प्रकरणे) |
| (३) वेतनवाढ रोखणे | ६ ग्रामसेवक |
| (४) ताकीद देण्यात आलेले | ५५ ग्रामसेवक |

वरीलप्रमाणे पंचायत समिती अमरावती व्दारा कार्यवाही करण्यात आलेली आहे.

**उपरोक्त मुद्यांसंदर्भात ग्रामविकास विभागाकडून खालील प्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

**ग्रामविकास विभागाचे अभिप्राय**

ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्र. झेडपीए २०१३/प्र.क्र.२६/वित्त-९, दिनांक ७ ऑगस्ट, २०१३ अन्वये सर्व जिल्हा परिषदांना स्पष्ट सूचना देण्यात आल्या आहेत. तसेच वित्त विभागाच्या शासन निर्णय क्र. विअप्र-२०१३/ प्र.क्र.३०/२०१३/विनियम भाग-२, दिनांक १७ एप्रिल, २०१५ अन्वये दुर्विनियोग, हानी, अफरातफर, चोरी, लबाडी इत्यादी प्रकरणे निकाली काढण्याबाबत स्वयंस्पष्ट आदेश निर्गमित करण्यात आले आहेत.

**विभागीय सचिवांची साक्ष**

पंचायती राज समितीने अमरावती जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्यावर अधिक माहिती घेण्यासाठी समितीने दिनांक ४ ऑक्टोबर, २०१७ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की, पंचायती राज समितीने आक्षेप घेतला म्हणून आपण शिक्षा करीत आहात, पण पंचायत समितीचा गटविकास अधिकारी वर्षातून एक वेळा ग्रामपंचायतींची तपासणी करतो, ग्रामसेवकाच्या पगाराची नोंद घेतो, त्याच्या डेली नोटस् पाठवतो. त्याचा सी.आर. लिहितो, चांगला आहे म्हणून त्याच्या सेवा पुस्तिकेमध्ये नोंद करतो. तेव्हा त्याला अफरातफर दिसत नाही का, वर्षातून दोन वेळा तपासणी केली होती पण ही तपासणी करताना सी.आर.मध्ये नोंद घेतात आणि पगार बिलाच्या नोंदणीशिवाय त्याच्या बिलाला मंजूर करता येते काय, तर मग गटविकास अधिका-याची काय जबाबदारी आहे. यामध्ये जी अफरातफरीची प्रकरणे झालेली आहेत त्यात आपण कारवाई केलेली आहे. सदर थकित रकमेबाबत संबंधितास नोटीसेस देवून १. सेवेतुन कमी करण्यात आले. १ ग्रामसेवक, २ फौजदारी गुन्हा दाखल - ५ ग्रामसेवक, ३ वेतनवाढ रोखणे-६ ग्रामसेवक, ४ ताकीद देण्यात आलेले-५५ ग्रामसेवक ही सर्व अफरातफरीची प्रकरणे आहेत. यात आपण त्यांना फक्त ताकीदवर सोडून देणार तर हा कुठला प्रकार आहे, यावर सचिव, ग्रामविकास विभाग यांनी समितीस विदित केले की, ज्यांना ताकीद दिली आहे त्यामध्ये चुक दिसत असेल तर त्यांच्यावर कारवाई झाली असती. अफरातफरीच्या नावावर त्यांनी चेक काढुन ठेवलेला होता ते काम पूर्ण झाल्यावर त्यांनी द्यायला पाहिजे होता. पण त्यांनी का ठेवला यासाठी आपण त्यांना ताकीद दिली होती. यावर समितीने अशी विचारणा केली की, किती रुपयांपर्यंतचा अपहार झाला तर तो सिरियस असतो, यावर सचिव, ग्रामविकास विभाग यांनी समितीस विदित केले की, १ रुपयांचा जरी अपहार झाला असेल तरी तो सिरियस असतो. यात जो काही आक्षेप आलेला आहे तो चौकशीच्या नंतर आलेला आहे. ज्या केसेसला ताकीद देण्यात आलेली आहे त्या केसेसपैकी एखादी केस आपल्याकडे सबमीट करु शकतो. त्यामुळे समितीला बघता येईल की, फारच सिरियस असताना सुध्दा ताकीद देऊन सोडले आहे काय.

समितीने पुढे विचारणा केली की, सन २०१२-१३ मध्ये जवळपास ११२ अफरातफरीची प्रकरणे होती ती कोणत्या हेडची होती, यावर मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद अमरावती यांनी समितीस विदित केले की, ही दोन वर्षाची प्रकरणे असुन सामान्य निधी विभागाच्या हेडखाली आहेत. यावर समितीने पुढे विचारणा केली की, या विभागाने तपासणी केली असल्यास यांची नोंद केली असेल की, त्यात ग्रामपंचायतने तपासणी केली त्यात सर्व काम आढळून आले आहे. मग त्यात तक्रार झाली म्हणूनच चौकशी अहवाल मागितला तर त्यामध्ये विस्तार अधिका-याने काय केले, यामध्ये सर्वांची जबाबदारी आहे नाहीत तर मग जिल्हा परिषदेची प्रशासकीय यंत्रणा कशासाठी आहे, त्या ग्रामसेवकावरच कारवाइ झाली नाही तर विस्तार अधिका-यावर कशी होणार आहे. म्हणजे ज्यांचा अहवाल प्राप्त झाला त्यांच्यावरच कारवाई नाही झाली. यावर सचिव, ग्रामविकास विभाग यांनी समितीस विदित केले की, यामध्ये फक्त ताकीद देऊन सोडले आहे. त्या केसचे स्वरुप काय होते आणि फक्त ताकीद देऊन का सोडले, यासाठी त्यांना शिक्षा देण्यासाठी त्या केसचे स्वरुप लक्षात घ्यावे लागेल. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अमरावती यांनी समितीस विदित केले की, ३९,९१,०६२ एवढी रक्कम सध्या राहिलेली आहे. त्यापैकी ३४,१३,३५८ एवढया रकमेसाठी ५ ग्रामसेवकांवर एफ.आय.आर. दाखल झाले आहेत. समितीने आणखी अशी विचारणा केली की, ज्या ग्रामपंचातींची तपासणी झाली त्यांचे रिपोर्ट काय आहेत, एवढ्या मोठ्या कामाची अफरातफर करण्याची हिंमत कोणी करणार नाही. सरकारची एवढी चांगली व्यवस्था आहे की, सुरवातीला मुख्य कार्यकारी अधिकारी नंतर त्यांच्या खाली उप मुख्य कार्यकारी अधिकारी आहेत, उप मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांच्या खाली गट विकास अधिकारी, गट विकास अधिकाऱ्यांच्या खाली विस्तार अधिकारी आहेत आणि विस्तार अधिकाऱ्यांच्या खाली ग्रामसेवक आहेत. या प्रत्येकांची जबाबदारी वेगवेगळी आहे. कोणाच्या हिमतीविना ग्रामसेवक एवढी मोठी अफरातफर करु शकत नाही. ग्रामसेवक कारवाईस पात्र आहेत पण विस्तार अधिकाऱ्याने त्या ग्रामपंचायतीची तपासणी केली असेल आणि तपासणी रिपोर्टमध्ये त्या ग्रामसेवकाचे काम चांगले असेल तर विस्तार अधिकाऱ्यांचा काय फायदा या बद्दल विस्तार अधिकाऱ्याची चौकशी केली आहे का, यावर सचिव, ग्रामविकास विभाग यांनी समितीस विदीत केले की, तुम्ही कोणतीही सुपरवाईजींग ॲथॉरिटी घेतली तरी त्यामध्ये कोणत्याही प्रकारे दुर्लक्ष केले असेल तर त्यांच्यावर ॲक्शन घेणे क्रमप्राप्त आहे. यामध्ये ५ सिरियस केस आहेत. त्यात ३९ लाख रुपयांपैकी ३४ लाख रुपये ५ लोकांचे आहेत. त्यावेळच्या विस्तार अधिकाऱ्याने तपासणी केल्यास त्यांच्या काय लक्षात आले. त्यांच्या अहवालात त्यांनी दुर्लक्ष केले असे लक्षात आले. जाणुनबुजून तसे दिसले आणि अहवालातही तसे आढळून आले आणि दोषी आढळला तर तो कारवाईस क्रमप्राप्त राहील. दुसरा विषय असा आहे की, या केसेसमध्ये फक्त ताकीद देण्यात आली आहे. त्याच्यावर कोणते दोषारोप आढळले आणि त्यात ताकीद देणे हे चुक झाली होती असे आढळून आले तर त्यात असे होऊ नये की, त्याला मोठी शिक्षा द्यायला पाहिजे होती पण काही कारणामुळे कमी दिली. त्यामुळे ५५ लोकांना ताकीद दिली होती. त्यांच्यावर दोषारोप सिध्द झाला तर ३० दिवसात याची कारवाई करु.

समितीने पुढे विचारणा केली की, या ५ प्रकरणांमध्ये एफ.आय.आर. दाखल झाला आहे तर मग हे ग्रामसेवक सध्या सेवेमध्ये आहेत का बडतर्फ आहेत. यावर सचिव, ग्रामविकास विभाग यांनी माहिती दिली की, या ५ ग्रामसेवकांपैकी २ रिटायर झालेले आहेत. सर्वात जास्त म्हणजे २६ लाख ९४ हजार रुपयांचा ज्यांच्यावर गुन्हा आहे ते एस.पी.देखमुख यांना बडतर्फ करायचे होते पण ते झाले नाहीत. बाकीचे २ ग्रामसेवक ५५ हजार रुपयांमधील आहेत ते सध्या कामावर आहेत.

## अभिप्राय व शिफारशी

समितीने अमरावती जिल्हा परिषदेला भेट देवून सन २०१२-२०१३ या वर्षाच्या वार्षिक प्रशासन अहवालावर मुख्य कार्यकारी अधिकारी व इतर संबंधित अधिकारी यांची दिनांक ५ ते ७ नोव्हेंबर, २०१५ रोजी साक्ष घेतली. प्रशासन अहवालावरील प्रश्नावली क्रमांक दोन मधील प्रश्न क्रमांक १५ वर गटविकास अधिकारी, पंचायत समिती, अमरावती यांची साक्ष घेतेवेळी समितीने पंचायत समितीमधील अफरातफर तसेच गैरव्यवहारासंबंधात प्रलंबित प्रकरणांची संख्या व त्याद्वारे वसुल व्हावयाची रक्कम याचा आढावा घेतला. पंचायत समितीच्या विविध विभागांमध्ये अफरातफरीची एकूण ७ प्रकरणे प्रलंबित असल्याचे समितीस आढळून आले.

प्रस्तुत प्रकरणात व एकूण ११२ प्रकरणात ८३,८९,१११/- रुपये गुंतलेले आहेत. गैरव्यवहाराच्या प्रकरणांमध्ये गुंतलेल्या रक्कमेपैकी ३,६५,७५७/- रुपये वसुल झाले असून ३९,९१,०६२/- वसुल होणे बाकी होते. समितीने विविध जिल्हा परिषदांना भेटी दिल्या असता सर्व जिल्हा परिषदांमध्ये गैरव्यवहार व अपहाराची प्रकरणे दिर्घ काळापासुन प्रलंबित असल्याचे व अशा प्रकरणामध्ये मोठया प्रमाणावर शासनाचा निधी गुंतून पडल्याचे निदर्शनास आले. थोडया रक्कमा असलेल्या प्रकरणात गुन्हे दाखल केल्यास त्या रक्कमेपेक्षा जास्त रक्कम वकीलाची फी इत्यादीवर खर्च होऊ शकतो. परिणामी अशा प्रकरणामध्ये विगतवारी करुन कार्यवाही करण्यासंदर्भात शासनाची भुमिका जाणून घेण्यासाठी समितीने दिनांक ४ ऑक्टोबर, २०१७ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. विभागीय सचिवांच्या साक्षीदरम्यान जिल्हा परिषद, अमरावती अंतर्गत सन २०१२-१३ पूर्वीच्या ११२ अफरातफरीच्या प्रकरणात गुंतलेल्या रक्कमेपैकी ३९,९१,०६२/- रुपये विभागीय सचिवांचे साक्षीपर्यंत थकित असल्याबाबत समिती सखेद आश्चर्य व्यक्त करते.

अपहारात गुंतलेली रक्कम वसुल करण्याच्या संदर्भातील जबाबदारी ज्या अधिकाऱ्यांवर होती ती त्यांनी पार पाडलेली नाही असे प्रस्तुत प्रकरणात दिसून येते. नियमाप्रमाणे शासनाच्या पैशांची अफरातफर केल्याची बाब प्रारंभिक तपासात उघडकीस आल्यानंतर शक्य तितक्या लवकर विभागीय चौकशी पूर्ण करुन संबंधित कर्मचाऱ्याकडून गुंतलेली रक्कम वसुल करण्यात यावी अशी तरतूद करण्यात आलेली आहे. प्रस्तुत प्रकरणात विलंब झाला असून याबाबत पर्यवेक्षिय अधिकाऱ्याची व तपास करणाऱ्या अधिकाऱ्यांची जबाबदारी निश्चित करणे आवश्यक होते. प्रस्तुत विभागीय चौकशीचे प्रकरण सूचना व विहित कालमर्यादेचे पालन करुन विषयाचे गांभीर्य लक्षात घेऊन शीघ्रतेने पूर्ण करणे आवश्यक होते. यासंदर्भात लोकलेखा समितीने चौथ्या विधानसभेच्या कालावधीत आपल्या तेराव्या अहवालात केलेल्या शिफारशीनुसार अफरातफरीच्या प्रकरणामधील विभागीय चौकश्या पूर्ण करण्यामध्ये विलंब टाळण्यासाठी शासनाने तपशिलवार सूचना देणारे परिपत्रक दिनांक ७ ऑगस्ट, १९८२ रोजी निर्गमित केलेले आहे. त्याबरोबर ग्रामविकास विभागाने आपल्या अभिप्रायात दिनांक ७ ऑगस्ट, २०१३ व दिनांक १७ एप्रिल, २०१५ रोजी शासन निर्णय निर्गमित करुन दुर्विनियोग, हानी, अफरातफर, चोरी, लबाडी इत्यादी प्रकरणे निकाली काढण्याबाबत स्वयंस्पष्ट आदेश निर्गमित करण्यात आली असल्याबाबतची माहिती समितीस दिली. सदर परिपत्रकास अनुसरुन विभाग प्रमुखांनी कार्यवाही केल्याचे समितीस आढळून येत नाही. अफरातफरीच्या प्रकरणांच्या प्रगतीचे मासिक पूनर्विलोकन करुन आवश्यक कार्यवाहीला वेग देण्यासाठी विभाग प्रमुखांनी उपाययोजना केली नसल्याचे समितीस आढळून आले. **एवढेच नव्हे तर संबंधित ग्रामविकास विभागातील मंत्रालयीन उप सचिव दर्जाच्या अधिकाऱ्याची अफरातफरीच्या प्रकरणाच्या प्रगतीवर लक्ष ठेवण्याची जबाबदारी होती. याबाबत विभागीय चौकशी मधील विलंबाची सामान्य प्रशासन विभागाने स्वतंत्रपणे चौकशी करावी. सदर विभागीय चौकशीमध्ये आढळून आलेल्या त्रुटी व त्यास जबाबदार असलेल्या पर्यवेक्षिय अधिकाऱ्यांवर जबाबदारी निश्चित करावी व त्याबाबतचा अहवाल समितीस दोन महिन्यात पाठवावा अशी समितीची शिफारस आहे.**

**तसेच राज्यातील इतर जिल्हा परिषदांमधील अफरातफर व गैरव्यवहाराची अनेक प्रकरणे प्रदिर्घ कालावधीपासून प्रलंबित आहेत. या सर्व प्रकरणांचा आढावा शासनाने घ्यावा व कालबध्द कार्यक्रम हाती घेऊन विभागीय चौकशीसाठी प्रलंबित असलेली प्रकरणे तातडीने निकाली काढावीत व वसुलपात्र रकमांची वसुली करावी व केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला तीन महिन्यांच्या आत उपलब्ध करुन द्यावी अशी समितीची शिफारस आहे.**

-----------------

## प्रकरण सहा

## जिल्हा परिषद, अमरावती (प्रशासन)

### जिल्हा परिषद शाळांमध्ये शिक्षक व विद्यार्थी यांच्या उपस्थिती संदर्भात बायोमॅट्रीक हजेरी प्रणाली राबविण्याबाबत

पंचायती राज समितीने दिनांक ५ ते ७ नोव्हेंबर, २०१५ या कालावधीत अमरावती जिल्हा परिषदेस भेट दिली. भेटीच्या वेळी सन २०१२-१३ या वर्षाच्या वार्षिक प्रशासन अहवालावरील चर्चेदरम्यान अमरावती जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने अशी विचारणा केली की, अमरावती जिल्ह्यातील धारणी तालुक्यातील जिल्हा परिषद शाळांमध्ये शिक्षक व विद्यार्थी यांच्या उपस्थिती संदर्भात बायोमॅट्रीक हजेरी प्रणाली राबविण्याकरिता आदिवासी उपयोजनेंतर्गत १ कोटी २९ लाख ४९ हजार ७०० रुपयांच्या बायोमॅट्रीक मशीन्स खरेदीकरिता मे. झेनिथ कंट्रोल सिस्टिम, कोरामांगला, बंगलोर या कंपनीला पुरवठा करण्याचे आदेश देण्यात आले होते. सदरहू कंपनीला दिनांक ०२.०६.२०१२ रोजी ८० लाख रुपये ॲडव्हान्स देण्यात आलेला आहे. बायोमॅट्रिक मशीन्स १५ दिवसांच्या आत म्हणजेच दिनांक १७.०६.२०१२ पर्यंत मशिन्स कार्यान्वीत होणे आवश्यक होते. परंतु मशीन्स अजुनही कार्यान्वीत झाल्या नाही. शासनाने करोडो रुपये खर्च करुनही या मशीन्स धुळखात पडून आहेत. याबाबत संबंधितांवर कोणती कार्यवाही करणार आहात, सद्या मशिन्स लावण्यात आलेल्या आहे काय, यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस विदित केले की, सद्या मशिन्स लावलेल्या नाही. ही योजना शासनाने दिलेली आहे. त्या भागामध्ये वीज पुरवठा वेळेत होत नसल्यामुळे बायोमॅट्रिक मशिन्स कार्यान्वित होऊ शकल्या नाहीत.

समितीने पुढे अशी विचारणा केली की, या योजनेमध्ये शासनाचे पैसे गुंतलेले आहे. संबंधित ठेकेदारांना देण्यात आलेल्या ॲडव्हान्सची रक्कम वसूल करण्यात यावी. देण्यात आलेल्या ॲडव्हान्सचा फायदा ठेकेदार व अधिकाऱ्यांना झालेला आहे.सदरहू योजना राज्य स्तरावरील होती. आजही बायोमॅट्रिक मशिन्स लावलेल्या नाहीत. सदरहू कंपनीला किंवा ठेकेदाराला पेमेन्ट रिलीज करतांना त्यांची कन्सेन्ट घेण्यात आली आहे काय, यावर शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांनी समितीस विदित केले की, होय. संमती घेऊनच पैसे दिलेले आहेत. यावर समितीने असे मत व्यक्त केले की, सदरहू योजना अयशस्वी ठरली. संबंधित कंपनीला सप्लाय करण्याबाबत शासनाने निर्धारित केले असेल. परंतु सदरच्या मशिन्स कार्यान्वित होतात किंवा कसे हे तपासणे आपले काम होते. तसेच त्या ठिकाणी विजेची अडचण व इत्यादी कारणांबाबत अहवाल देऊन ठेकेदारांना दिलेला ॲडव्हान्स थांबविता येऊ शकत होते. परंतु असे न होता, ठेकेदारांना ८० लाख रुपयांचे पेमेंट दिले गेले आहे. या योजनेबाबत शासनाने निर्णय घेतला असेल. संबंधित कंपनीला ॲडव्हान्समध्ये निधी दिला गेला. बायोमॅट्रिक मशिन्सची खरेदी झाली. परंतु ही रिक्वॉयरमेन्ट कशी झाली, यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस विदित केले की, मेळघाटामध्ये मोठ्या संख्येने अप्सेन्टीझम असून तो होऊ नये, याकरिता ही योजना होती. यावर समितीच्या मते त्या भागामध्ये वेळेत वीज नसते, त्यामुळे मशिन्सचा उपयोग नाही, असा अहवाल शासनास सादर करणे आवश्यक होते. ही योजना कार्यान्वित होऊ शकली नसल्यामुळे शासनाचा मोठ्या प्रमाणात निधी व्यर्थ गेलेला आहे. या योजनेचा उपयोग झाला किंवा कसे, याबाबत अहवाल सादर करण्यात यावा असे निदेश समितीने दिले.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्द्यांबाबत विभागाकडून माहिती मागविली.**

जिल्हा परिषद शाळांमध्ये शिक्षक व विद्यार्थी यांच्या उपस्थित संदर्भात बायोमॅट्रीक हजेरी प्रणाली राबविण्याकरिता आदिवासी उपाययोजने अंतर्गत १ कोटी २९ लाख ४९ हजार ७०० रुपयांच्या बायोमॅट्रीक मशीन्स खरेदीकरिता मे. झेनिथ कंट्रोल सिस्टिम, कारामांगला, बंगलोर या कंपनीला आदेश देऊन दिनांक २०/६/२०१२ रोजी ८० लाख रुपये ॲडव्हान्स देण्यात आला असुन मशीन्स अजुनही कार्यान्वीत झाल्या नाहीत या नुकसानीची जबाबदारी निश्चित केली आहे काय तसेच सदर यंत्रणा पुर्वस्थापित करण्याकरिता कोणती उपाययोजना करण्यात येत आहे ?

**उपरोक्त मुद्द्यांसंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालील प्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

शासनाचे पत्र क्र.संगणक २०१०/प्र.क्र.४ दि.१५/०३/२०१२ **(परिशिष्ट ६.१)** अन्वये पंचायत समिती, धारणी मधील १७१ जि.प. शाळांमध्ये बायोमेट्रिक हजेरी प्रणाली राबविण्याचे निर्धारित झाले आहे. शासन स्तरावरील करारनामा व पत्रान्वये सदर कंपनीला ५०% अग्रीम रूपये ६४,७४,९००/- दि.०२/०६/२०१२ विहीत मुदतीत देण्यात आला. कंपनीने विहीत कालावधीत मशीन न बसविणे व बँक गँरटी वाढवून न दिल्याबद्दल स्थायी समितीच्या दि.१८/१२/२०१५ च्या चर्चेप्रमाणे व ठरावानुसार सदर कंपनीवर कार्यालयाचे पत्र दि. १५/०१/२०१६ अन्वये फौजदारी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. धारणी अंतर्गत विद्युत पुरवठा तथा इंटरनेट सुविधा शाळांमध्ये नसल्यामुळे सदर योजना कार्यान्वीत करणे शक्य नसल्याबाबत शासनाचे पत्र दि.११/०१/२०१६ अन्वये कळविले आहे. आजमितीस सदर यंत्रे कालबाह्य झालेली आहेत. त्यामुळे कार्यान्वित करणे शक्य नाही.

**उपरोक्त मुद्यासंदर्भात ग्रामविकास विभागाकडून खालीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

**ग्रामविकास विभागाचे अभिप्राय**

जिल्हा परिषदेमधील शाळांमध्ये शिक्षक व विद्यार्थी यांच्या उपस्थिती संदर्भात बायोमेट्रिक प्रणालीचा अवलंब करावा व त्याद्वारे विद्यार्थ्यांची एकंदरीत शाळेतील उपस्थिती, शाळा सोडण्याचे प्रमाण या संदर्भात माहिती व्हावी म्हणून शासनाने राज्यातील ६ तालुक्यांमधील जिल्हा परिषदांच्या शाळांमध्ये बायोमॅट्रिक प्रणालीचा प्रायोगिक तत्वावर राबविण्याचा विचार केला व तशी योजना सन २०१० पासून राबविण्याचा निर्णय घेण्यात आला. राज्यातील वेगवेगळया भागातील वेगवेगळया भौगोलिक परिस्थितीत ही बायोमॅट्रिक प्रणाली राबविता येऊ शकते का? यासाठी अमरावती जिल्ह्यातील आदिवासी क्षेत्रातील धारणी तालुक्याचा विचार करण्यात आला. राज्य शासनाने निविदा प्रक्रियेद्वारे वेगवेगळया कंपन्यांची यासाठी निवड केलेली आहे. अमरावतीमध्ये मेसर्स झेनिथ कंट्रोल ॲन्ड सिस्टीम्स प्रा.लि., बंगलोर या कंपनीची निवड करण्यात आली होती.

धारणी पंचायत समितीमधील एकूण १७१ शाळांमध्ये बायोमॅट्रिक प्रणाली लावण्याचे निश्चित झाले व १०० विद्यार्थ्यांसाठी १ याप्रमाणे मेसर्स झेनिथ कंट्रोल ॲन्ड सिस्टीम्स प्रा.लि. यांच्याशी करार करण्यात आला व ३८२ मशीन्सची खरेदी करण्यात आली.

अमरावती जिल्हा परिषदेला रू.१,२९,४९,८००/- इतका निधी या अनुषंगाने दिलेला असून शासनाने वेळोवेळी या संदर्भातील आढावा घेतला असता धारणी जिल्ह्यात नेट कनेक्टीव्हिटीचा प्रश्न गंभीर असून दुर्गम भागामध्ये शाळा असल्याने कनेक्टिव्हीटी होत नाही असे निदर्शनास आले आणि त्यामध्ये शासनाची जी अपेक्षा होती त्याप्रमाणे डेटा ऑनलाईन करण्यामध्ये काही अडचणी येत होत्या. राज्य शासनाने अमरावती जिल्हा व अन्य जिल्ह्याच्या मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांच्या समवेत या योजनेसंदर्भात वेळोवेळी बैठका घेतल्या होत्या व अंतिमतः या संदर्भात संबंधित मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद व शिक्षण अधिकारी यांचे अभिप्राय जाणून घेऊन पुरेसा प्रतिसाद व त्यांचे संनियंत्रण होत नाही असे आढळून आल्यानेही योजना बंद करण्याचा शासन स्तरावर निर्णय घेण्यात आला व त्याप्रमाणे जिल्हा परिषदेला कळविण्यात आले.

असे करताना ज्या मशीन्स चालू स्थितीत आहेत मात्र नेट कनेक्टीव्हिटी नाही त्यांचा अन्यत्र वापर करावा. ज्या मशीन्स बंद आहेत त्यापैकी दुरूस्त होणाऱ्या मशीन्स दुरूस्त करून घ्याव्या. तसेच करारनाम्यात नमूद केल्याप्रमाणे आवश्यक ती कार्यवाही करावी अशा प्रकारच्या सूचना शासनाने दिलेल्या होत्या. सबब मशीन्सच्या बाबतीत जिल्हा परिषदेने करारनाम्याप्रमाणे कारवाई करणे आवश्यक आहे. जिल्हा परिषदेने पोलीस तक्रार केलेली आहे.

## चौकशी अहवाल

मा.शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद अमरावती यांचे पत्र क्र./जिप/शिक्षण/पंरास /१०४५९/२०१६/दिनांक २१/११/२०१६ अन्वये पंचायत राज समितीने दिलेल्या भेटीच्या संदर्भात समितीने बायोमॅट्रीक हजेरी प्रणाली संबंधी मुददा उपस्थित केल्यानुसार सदर मुद्द्याच्या अनुषंगाने चौकशी तथा योजना राबविणे शक्य आहे काय ? याबाबत खालीलप्रमाणे संयुक्त समिती नियुक्त करण्यात आली.

| अ.क्र. | नाव | पदनाम |
|---|---|---|
| (१) | (२) | (३) |
| १ | श्रीमती ए.व्ही.पवार | चौकशी अधिकारी तथा अधिक्षक वर्ग-२, शिक्षणाधिकारी (प्राथ) यांचे कार्यालय, जि.अमरावती |
| २ | श्री के.एस.पुरी | सदस्य, चौकशी समिती तथा विस्तार अधिकारी, शिक्षणाधिकारी (प्राथ) यांचे कार्यालय, जि.अमरावती |

उपरोक्त आदेशान्वये श्रीमती ए.व्ही.पवार, अधिक्षक वर्ग-२ व श्री के.एस.पुरी, विस्तार अधिकारी यांनी दि.२७/१२/२०१६ रोजी शिक्षणाधिकारी (प्राथमिक) कार्यालय, जिल्हा परिषद अमरावती येथे चौकशी केली त्यानुसार-

१. श्री व्हि.एच.तराळ, प्रभारी ग.शि.अ, पंचायत समिती धारणी

२. श्री देवानंद मेश्राम (क.स.) भांडार, शिक्षण विभाग (प्राथ.) जिल्हा परिषद अमरावती

३. श्री सुनील वानखेडे (तत्कालीन भांडार लिपीक) शिक्षण विभाग (प्राथ.) जिल्हा परिषद अमरावती (व.स.) म.बा.क.

४. श्री.विनायक ठाकरे (तत्कालीन भांडार लिपीक) शिक्षण विभाग (प्राथ.) जिल्हा परिषद अमरावती यांचे समक्ष बायोमॅट्रीक हजेरी प्रणाली मुद्द्यासंबंधी अभिलेख्यांची पडताळणी करण्यात आली असता खालील बाबी निदर्शनास आल्या.

१. जिल्हा परिषद शाळांमध्ये शिक्षक व विद्यार्थी यांच्या उपस्थिती संदर्भात बायोमॅट्रीक हजेरी प्रणाली राबविण्याकरिता अमरावती जिल्ह्यातील आदिवासी क्षेत्रातील धारणी तालुक्याची निवड राज्य स्तरावरुन करण्यात आली याकरिता मे.झेनिथ कंट्रोल ॲन्ड सिस्टिम, प्रा.लि. बंगलोर या कंपनीची शासन परिपत्रक दि.१५/०३/२०१२ नुसार राज्य शासनाकडून निवड करण्यात आली होती. (संदर्भ :- शासन परिपत्रक संगणक २०१०/प्र.क्र.४/संगणक कक्ष/दि.१५/०३/२०१२).

२. धारणी पंचायत समितीतील एकूण १७१ शाळांमध्ये १०० विद्यार्थ्यांसाठी १ याप्रमाणे उपरोक्त कंपनीशी करार करुन एकूण ३८२ मशिन्सचा पुरवठा आदेश दि.२५/०५/२०१२ रोजी संबंधित कंपनीस दिला. (पुरवठा आदेशाची प्रत पृष्ठांकित केली आहे.).

३. पुरवठा आदेशानुसार कंपनीने १५ दिवसांत मशिन्स बसविणे अपेक्षित होते. परंतु कंपनीने विलंबाने दि.११/०८/२०१२ रोजी ३८२ पैकी १२५ मशिन्स व दि.१२/०९/२०१२ रोजी उर्वरित २५७ मशिन्स पंचायत समिती स्तरावर पुरविल्या आहेत.

४. शाळा स्तरावर विहित मुदतीत सयंत्र बसविणेकरिता दि.०२/०१/२०१३ च्या पत्रान्वये कंपनीस कळविण्यात आले. (पत्राची प्रत पृष्ठांकीत करण्यात आली आहे).

५. ३८२ मशिन्सपैकी ६७ शाळेवर १४९ मशिन्स बसविण्यात आल्या. त्यापैकी १०३ मशिन्समध्ये तांत्रिक बिघाड असल्याने दि.०९/०६/२०१४ रोजी पुनर्स्थापित व दुरुस्तीबाबत कंपनीस मशीनमध्ये तांत्रिक बिघाड दुरुस्त करणे, ज्या शाळांमध्ये विद्युत पुरवठा नाही परंतु मशीन बसविली आहे त्या शाळांमधील मशिन्स विद्युत पुरवठा असलेल्या शाळांमध्ये बसविणे या व अन्य सूचना देण्यात आल्या. (सदर कार्यवृत्ताची प्रत पृष्ठांकीत केली आहे).

## विभागीय सचिवांची साक्ष

पंचायती राज समितीने अमरावती जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्यावर अधिक माहिती घेण्यासाठी समितीने दिनांक ४ ऑक्टोबर, २०१७ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की, ही योजना नेट कनेक्टीव्हीटी संबंधीत नव्हती का, आणि तसे असते तर तो मुद्दा विचारात न घेता ८० लाख रुपये त्या कंत्राटदाराला कसे काय देण्यात आले, हा मुद्दा खुप गंभीर आहे त्यामुळे यात सर्व तपासणी करुन केस करायला पाहिजे. यावर सचिव, ग्रामविकास विभाग यांनी समितीला विदित केले की, कॉन्ट्रक्टप्रमाणे त्यांना अग्रिम देण्यात आले आहे. यावर समितीने असे मत व्यक्त केले की,नेट कनेक्टीव्हीटीच्या संदर्भात गंभीर प्रश्न आहे. बायोमॅट्रीकच्या संदर्भात १ कोटी २९ लाख ४९ हजार ७०० रुपये खर्च केले. हे सर्व करण्यापूर्वी त्याची तपासणी करण्याचे काम शासनाचे आहे पण ते झालेले नाही. ८० लाख रुपये अग्रिम देण्यात आले त्याची तपासणी झाली नाही. हे करण्याची शासनाची जबाबदारी होती. यासाठी कोण जबाबदार आहे. आपण कोणत्या आधारावर पैसे दिले आहेत, करारनाम्यामध्ये ज्या अटी किंवा शर्ती घातल्या होत्या त्यांचे पालन केले किंवा नाही याची तपासणी केली काय, महिनाभराचे आऊटपूट काढून ते कार्यालयास सादर करता येते. यावर सचिव, ग्रामविकास विभाग यांनी समितीस विदित केले की, या कामाच्या निविदा ग्रामविकास विभागाने मागविल्या होत्या. राज्यातील जिल्हा परिषदेच्या शाळांमधील विद्यार्थ्यांची उपस्थिती वाढविणे व ज्या शाळेत शिक्षक अनुपस्थित असतील तेथे तातडीने बदली शिक्षक उपलब्ध करुन देणे या हेतूने ग्राम विकासविभागामार्फत जिल्हा परिषदेच्या शाळेमध्ये बायोमेट्रीक हजेरी प्रणाली राबविण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे. त्यानुसार प्रथमतः ही प्रणाली प्रायोगिक तत्वावर राज्यातील सहा तालुक्यातील श्रीवर्धन (जि.रायगड), वाळवा (जि.सांगली) धारणी (जि.अमरावती), मुदखेड (जि.नांदेड) देवळी (जि.वर्धा) व संगमनेर (जि.अहमदनगर) जिल्हा परिषदेच्या सर्व शाळांमध्ये राबविण्यात येत आहे. या कामासाठी चार कंपन्यांची निवड करण्यात आली. (१) ओसब्रेन सिस्टिम्स ॲण्ड सॉप्टवेअर,पुणे, (२) अरिथमॅटिक सिस्टिम्स ॲण्ड सॉप्टवेअर, पुणे (३) झेनिथ कंट्रोल्स ॲण्ड लिमिटेड, बंगलोर, (४) रिया इन्फोटेक, पुणे.

समितीने पुढे अशी विचारणा केली की, ही निविदा प्रक्रिया एकत्रित करण्याचे अधिकार विभागाला कोणी दिले, हा डीपीसीचा निधी आहे व ७३ व्या घटना दुरुस्तीनुसार डीपीसी अस्तित्वात आलेली आहे तिचे स्वतंत्र अस्तित्व आहे. समितीचा प्रश्न हा आहे की ही एकत्रित निविदा प्रक्रिया कोणी केली, यावर, सचिव, ग्रामविकास विभाग यांनी समितीला विदित केले की, डीपीसी ही निविदा काढणारी यंत्रणा नाही. निविदा काढणे हा वेगळा विषय आहे.

समितीने अशी विचारणा केली की, नेट कनेक्टीव्हीटी नसताना ही योजना कार्यान्वीत कशी केली, यास कोण जबाबदार आहे. यावर सचिव, ग्रामविकास विभाग यांनी समितीस पुन्हा एकदा शासन निर्णय वाचून दाखविला. अमरावती जिल्ह्यातील धारणी तालुक्यातील काम झेनिथ कंट्रोल्स ॲण्ड लि.बंगलोर कंपनीस देण्यात आले. ही योजना प्रायोगिक तत्वावर सहा तालुक्यांमध्ये राबविण्याचा निर्णय घेण्यात आला. या कामाची निविदा ग्राम विकास विभागामार्फत काढण्यात आली. त्यानुसार वरील चार कंपन्यांची निवड करण्यात आली. विभागाने ईओआय मधून निवडलेल्या ४ कंपन्यांकडून एल-१ कंपनीनी नमूद केलेल्या दराप्रमाणे ७५ तासाच्या बॅटरी बॅकअप व सेंगम/सेक्युजन सेन्सरसह रुपये ३५१००/- (रु. ३३,२००/- मशीन दर अधिक १९००/- रुपये सॉप्टवेअर कॉस्ट) प्रमाणे यंत्र खरेदी करण्यास माहिती व तंत्रज्ञान विभाग व विभागाने घटित केलेल्या प्रकल्प अंमलबजावणी समितीची मान्यता मिळालेली आहे. यावर समितीने विचारणा केली की, सहा तालुक्यांमध्ये प्रायोगिक तत्वावर ही सिस्टीम सुरु करण्यात आली. अमरावती जिल्ह्यातील धारणी तालुक्यात ही सिस्टीम बंद पडल्याचे दिसत आहे. अन्य पाच ठिकाणी काय सद्यस्थिती आहे, धारणी तालुक्यात कनेक्टीव्हिटी नसताना जिल्हा परिषदशाळांमध्ये बायोमेट्रीक प्रणाली राबविण्याचा निर्णय कोणी घेतला, हा जिल्हा परिषदेचा विषय असल्यामुळे त्यास जिल्हा परिषदेच्या सर्वसाधारण सभेची मंजुरी घेतली होती काय,या कामाच्या करारातील अटी व शर्ती काय होत्या, करारामध्ये अग्रीम देण्याचा विषय असला तरी नियमानुसार अग्रीम देण्यात येतो काय, या कामामध्ये ८० लाख रुपये अग्रिम देण्यात आलेला आहे. राज्याच्या दृष्टीने हा विषय अतिशय गंभीर आहे, खरे म्हणजे या विषयावर सचिवांनी यापूर्वीच चर्चा करावयास पाहिजे होती. या कामासाठी

८० लाख रुपये अग्रीम देण्यात आला. ही रक्कम कमी नाही. नेट कनेक्टीव्हीटी नसताना बायोमेट्रीक प्रणाली बसविण्याचा निर्णय घेण्यात आला. या योजनेमध्ये राज्याचे फार मोठया प्रमाणात नुकसान झालेले आहे. यात पैशाची अफरातफर झालेली आहे. याप्रणालीचा विद्यार्थी आणि शिक्षक यांना काही उपयोग झालेला नाही. यावर सचिव, ग्रामविकास विभाग यांनी समितीस विदित केले की, एका चांगल्या भावनेतून ही सिस्टिम राबविण्यात आली यामध्ये कोणाचे दुमत असण्याचे कारण नाही. ही मशीन ऑफलाईन रेकॉर्ड मेन्टेन करणार होती. नेट कनेक्टीव्हीटी होती किंवा कसे हे डिझाईन पाहून कळेल. एकूण ६ तालुक्यांपैकी एका तालुक्यात ही प्रणाली अपयशी झाली. बाकीच्या ५ तालुक्यात काय वस्तुस्थिती आहे याचा आढावा घेतल्यानंतरच समजेल. तसेच सदर कंपनीने काही बाबींची पुर्तता न केल्यामुळे कंपनीविरोधात फौजदारी गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. कंपनीवर दिवाणी खटला दाखल करीत आहोत. कंपनीकडून पैसे परत मिळण्यासाठी प्रयत्न करावा लागेल. इतर पाच तालुक्यातील बायोमेट्रीक प्रणालीची काय सद्य:स्थिती आहे याची माहिती घेऊन अहवाल सादर करण्यासाठी एक महिन्याची मुदत द्यावी अशी विनंती समितीस केली. यातील काही मशीन्स सुरु आहेत, काही बंद आहेत. दुरुस्त करण्यायोग्य मशीन्स असतील त्या दुरुस्त करण्यात येतील. ही प्रणाली अपयशी का ठरली याची कारणमीमांसा करावी लागेल.

समितीने असे मत व्यक्त केले की, जिल्हा परिषदेने केलेल्या कार्यवाहीमध्ये असे नमूद केलेले आहे की, आजमितीस सदर यंत्रे कालबाह्य झालेली आहेत. त्यामुळे कार्यान्वीत करणे शक्य नाही यावर विभागाचे काय मत आहे, या प्रकरणामध्ये जिल्हा परिषदेने पोलीस तक्रार केलेली आहे. जिल्हा परिषदेच्या कामाची निविदा राज्य शासनाने मागविली. म्हणजे मंत्रालयाने जिल्हा परिषदेच्या निधीवर अतिक्रमण आहे. जिल्हा परिषदेच्या अधिकाऱ्यांवर दबाव टाकण्यात आला काय, त्या भागात नेट कनेक्टीव्हीटी नसताना बायोमेट्रीक प्रणाली बसविण्याच्या तांत्रिक कामास कोणत्या सक्षम अधिकाऱ्याने मंजुरी दिली, करारनाम्यामध्ये कोणत्या अटी व शर्ती होत्या, यावर सचिव, ग्रामविकास विभाग यांनी समितीस विदित केले की, या कामाचा करारनामा जिल्हा पातळीवर झालेला आहे. तांत्रिक मान्यता कोणी दिली त्याबाबतची माहिती लेखी कळविण्यात येईल. यावर समितीने असे निदेश दिले की, समितीने विचारलेली माहिती वेळेत देण्यात यावी. या खर्चास सर्वसाधारण सभेची मान्यता घेतली होती काय, यावर सचिव, ग्रामविकास विभाग यांनी समितीस होकारार्थी उत्तर दिले. यावर समितीने असे निदेश दिले की, हा अतिशय गंभीर विषय आहे. ही बाब पूर्वीच सचिवांच्या निदर्शनास यावयास पाहिजे होती व त्यादृष्टीने कार्यवाही करावयास पाहिजे होती, परंतु तसे झालेले नाही. सहा तालुक्यांपैकी अमरावती तालुक्यातील प्रणाली बंद पडलेली आहे. इतर पाच तालुक्यातील प्रणाली सुस्थितीत आहे किंवा कसे याची आपल्या स्तरावर चौकशी करावी व यामध्ये जे कोणी दोषी असतील त्यांच्यावरील कारवाईचा अहवाल समितीला एका महिन्यात सादर करावा असे समितीने निदेशित केले.

## अभिप्राय व शिफारशी

पंचायती राज समितीने दिनांक ५ ते ७ नोव्हेंबर, २०१५ या कालावधीत अमरावती जिल्हा परिषदेला भेट दिली. भेटीच्या वेळी जिल्हा परिषद शाळांमध्ये शिक्षक व विद्यार्थी यांच्या उपस्थिती संदर्भात बायोमॅट्रीक हजेरी प्रणाली राबविण्याकरिता आदिवासी उपाययोजने अंतर्गत १ कोटी २९ लाख ४९ हजार ७०० रुपयांच्या बायोमॅट्रीक मशीन्स खरेदीकरिता मे. झेनिथ कंट्रोल सिस्टिम, कारामांगला, बंगलोर या कंपनीला आदेश देऊन दिनांक २०/६/२०१२ रोजी ८० लाख रुपये ॲडव्हान्स देण्यात आला असुन मशीन्स समितीने अमरावतीला भेट देईपर्यंत कार्यान्वित झाल्या नाहीत यासंदर्भात चौकशी करुन अहवाल सादर करण्याचे निदेश समितीने दिले होते.

राज्यातील जिल्हा परिषदेच्या शाळांमधील विद्यार्थ्यांची उपस्थिती वाढविणे व ज्या शाळेत शिक्षक अनुपस्थित असतील तेथे बदलीने शिक्षक उपलब्ध करुन देणे या हेतूने ग्रामविकास विभागाने राज्यातील सहा तालुक्यातील जिल्हा परिषद शाळेतील बायोमॅट्रीक हजेरी प्रणालीस प्रशासकीय व तांत्रिक मान्यता दिली. सदर सहा तालुक्यांमध्ये अमरावती जिल्ह्यातील धारणी तालुक्याची निवड करण्यात आली व ग्रामविकास विभागाने झेनिथ कंस्ट्रोल्स ॲण्ड लिमिटेड, बंगलोर या कंपनीची निवड करुन त्यांना काम दिले. आदिवासी उपयोजनेअंतर्गत १ कोटी २९ लाख ४९ हजार ७०० रुपयांच्या बायोमॅट्रीक मशीन्स

खरेदीकरीता कंपनीला पुरवठा आदेश देण्यात आले होते. सदरहू कंपनीला ८० लाख रुपये ॲडव्हान्स देण्यात आला. पुरवठा आदेश दिल्या पासून १५ दिवसांच्या आत सर्व शाळांमध्ये बायोमॅट्रीक मशीन्स कार्यान्वित होणे आवश्यक होते. परंतू विभागीय सचिवांच्या साक्षीपर्यंत या मशीन्स कार्यान्वित झाल्या नाहीत. शासनाचे लाखो रुपये खर्च होवूनही या मशीन्स धुळ खात पडून आहेत. ३८२ मशीन्सपैकी ६७ शाळांवर १४९ मशीन्स बसविण्यात आल्या त्यापैकी १०३ मशीन्समध्ये तांत्रिक बिघाड असल्याने दिनांक ९ जून, २०१४ रोजी दुरुस्तीबाबत कंपनीस पत्राद्वारे कळवूनही कंपनीने कोणतीही कारवाई केलेली नाही.

सदरहू प्रकरणी समितीने विभागीय सचिवांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी सदर कामाची निविदा ग्रामविकास विभागामार्फत काढण्यात आली असल्याचे तसेच कंपनीबरोबर ग्रामविकास विभागाने करारनामा केल्याचे निदर्शनास आले आहे. सदर कंपनीची निवड कशी करण्यात आली यासंदर्भात समितीस माहिती मिळू शकली नाही. परंतू यंत्र खरेदी करण्यास माहिती व तंत्रज्ञान विभागाने गठीत केलेल्या प्रकल्प अंमलबजावणी समितीची मान्यता मिळालेली आहे. धारणी तालुक्यात कनेक्टीव्हीटी नसताना जिल्हा परिषद शाळांमध्ये बायोमॅट्रीक प्रणाली राबविण्याचा निर्णय कोणी घेतला, त्यास जिल्हा परिषदेच्या सर्व साधारण सभेची मंजूरी होती काय, सदर मशीन ऑफलाईन रेकॉर्ड मेन्टेन करणार होती की ऑनलाईन याबाबत विभागीय सचिवांना माहिती देता आली नाही. तसेच धारणी शिवाय इतर पाच तालुक्यांमध्ये सदर योजनेची वस्तुस्थिती काय याचा आढावा देखील सचिवांनी समितीसमोर येण्यापूर्वी घेतलेला नव्हता. सुमारे ८० लाख रुपये अग्रिम देण्यात आलेली रक्कम निष्फळ गेली आहे. जिल्हा परिषदेच्या निधी व अधिकारांवर शासनाने अशाप्रकारे अतिक्रमण करुन थेट पुरवठादाराशी करारनामा करुन क्षेत्रिय स्तरावरील अडचणी लक्षात न घेता पुरवठादार कंपनीची कार्यक्षमता, अनुभव इत्यादी बाबींचा कोणताही विचार न करता कोणत्याही नियोजनाशिवाय अंमलबजावणी केली. त्यामुळे सदर योजनेचा उद्देश सफल झालेला नाही. कंपनीने करारनाम्यातील अटी व शर्तींचा भंग केल्यावरुन जिल्हा परिषदेने दिनांक १५ जानेवारी, २०१६ रोजी ४ वर्ष विलंबाने गाडगे नगर, पोलीस स्टेशन, अमरावती येथे गुन्हा दाखल करण्याबाबत पत्र दिलेले आहे. प्रस्तुत प्रकरणी गुन्हा दाखल झाला किंवा कसे याबाबतची स्पष्ट माहिती विभागीय सचिवांचे साक्षीचे वेळी समितीस प्राप्त झाली नाही. याप्रकरणी संबंधीतांवर गुन्हा दाखल करून त्या संबंधीची माहिती समितीस एक महिन्यात पाठविण्यात यावी.

मंत्रालयीन स्तरावरुन काटेकोर नियोजनाशिवाय अशाप्रकारे प्रकल्प राबविल्यामुळे शासनाचे कोट्यवधी रुपयांचे नुकसान झाले आहे. या योजनेतील पुरवठादार कंपन्यांकडून शासनाची रक्कम वसुल करण्यासंदर्भात मंत्रालयीन स्तरावरुन कोणतीही उपाययोजना झालेली नाही याबाबत समिती सखेद आश्चर्य व्यक्त करते. सदरहू योजना राबविण्याचा निर्णय कोणी घेतला, याच चार कंपन्यांची निवड का केली हे प्रश्न अनुत्तरीत राहिल्यामुळे संपूर्ण योजनेच्या हेतुबद्दल समितीला शंका उत्पन्न झाली आहे म्हणून **सदर योजनेची समितीने वर नमुद केलेल्या बाबी संदर्भात उच्च पातळीवरुन व त्रयस्थ यंत्रणेकडून चौकशी होणे आवश्यक आहे. या प्रकरणी एकंदरीतच योजना राबविण्यामध्ये संबंधितांचा गलथानपणा व शासनाच्या निधीचा एक प्रकारे दुरुपयोग होऊन योजनेची काही फलनिष्पत्ती दिसून येत नाही त्यामुळे निष्पक्ष व त्रयस्थ यंत्रणेकडून संबंधीतांची सखोल चौकशी करण्यात यावी व तद्नुषंगाने दोषींबर कडक स्वरूपाची कारवाई करावी आणि तत्संबंधित कार्यवाहीचा अहवाल समितीस तीन महिन्याच्या आत पाठवावा अशी समितीची शिफारस आहे.**

-----------------

## प्रकरण सात

## जिल्हा परिषद, अमरावती

### जिल्हा परिषदेच्या मुद्रणालयाची रक्कम स्वत:च्या नावावर ठेवल्याबाबत

पंचायती राज समितीने दिनांक ५ ते ७ नोव्हेंबर, २०१५ या कालावधीत अमरावती जिल्हा परिषदेस भेट दिली. भेटीच्या वेळी सन २०१२-१३ या वर्षाच्या वार्षिक प्रशासन अहवालावरील चर्चेदरम्यान अमरावती जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने अशी विचारणा केली की, उप मुख्य कार्यकारी अधिकारी, सामान्य यांनी जिल्हा परिषदेच्या रकमा लेख्याबाहेर ठेवल्या आहेत. या प्रकरणामध्ये रक्कम रुपये १,२०,२५,१८५/- इतकी रक्कम गुंतलेली आहे. जिल्हा परिषदेला प्राप्त झालेली रक्कम स्वत:च्या नावावर ठेवायची नसते. या प्रकरणी सर्वश्री सुर्यवंशी, पी.डब्ल्यु. दिवाण, एस.पी. मोहोड यांनी रु..६७,४५,८३१/- इतकी रक्कम स्वत:च्या नावावर ठेवली. या प्रकरणी संबंधितांकडून रक्कम रुपये १,२५,२५,१२०/- तातडीने वसूल करणे गरजेचे असल्याबाबत ऑडिट पॅरामधील लेखा परीक्षण अहवाल आहे. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस विदित केले की, जिल्हा परिषदेच्या मागे ५० फुटावर छापखाना आहे. जिल्हा परिषदेने स्वत:च्या उत्पन्नातून सदर छापखाना काढला. या प्रकरणी एका व्यक्तीने त्याचे बँकेत दुसरे अकाऊंट काढून त्यात येणारी रक्कम जमा केली. यासंबंधी ऑडिट झाले आहे. या बाबतीत चौकशी करुन सर्व प्रकरण बाहेर काढून सभागृहाला सविस्तर अहवाल सादर केला आहे. या संदर्भात वकिलाचा सल्ला घेऊन संबंधितांना आपले म्हणणे मांडण्याची संधी दिली आहे. एका अधिकाऱ्याने त्याच बँकेत दुसरे अकाऊंट उघडून येणाऱ्या रकमा ठेवण्यास सुरुवात केली. त्यानंतर तेथे दुसरे अधिकारी आले आहेत. यामुळे त्यांचा सुध्दा यामध्ये सहभाग येत आहे. या प्रकरणी एका व्यक्तीने चुक केल्यामुळे दुसरे लोकसुध्दा त्यात अडकणार आहेत. या प्रकरणी योग्य ती कारवाई करावी लागणार आहे. समिती येण्याच्या अगोदरच्या दिवशी या प्रकरणी नागपूर उच्च न्यायालयाच्या वकिलांकडून ओपीनियन घेतले असता त्यांनी असे सांगितले की, नैसर्गिक न्यायानुसार संबंधितांना त्यांचे म्हणणे मांडण्याचीसंधी द्यावी व त्यानंतर त्यांच्यावर गुन्हे दाखल करावेत. ८ ते १० दिवसांच्या काळात संबंधितांविरुध्द गुन्हे दाखल केले जातील.

समितीने पुढे अशी विचारणा केली की, महत्त्वाची गोष्ट अशी आहे की, या प्रकरणी ऑडिटचीसुध्दा जबाबदारी आहे. हा मुद्दा ऑडिटमधून स्कीप कसा झाला, या प्रकरणी सखोल चौकशी करुन संबंधितांविरुध्द तातडीने कारवाई करणे आवश्यक आहे. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस विदित केले की, या प्रकरणी ८ दिवसाच्या काळात संबंधितांविरूध्द एफ.आय.आर. दाखल करणार आहोत. दैनंदिन कामे करीत असताना आम्हाला खूप सह्या कराव्या लागतात.

समितीने पुढे निदेशीत केले की, कोणत्या वर्षाच्या ऑडिटमध्ये हा मुद्दा आला आहे, सन २००८ पासून ते २०१५ पर्यंतच्या काळात सदर अधिकाऱ्यांनी स्वत:च्या खात्यावर ५.२५ कोटी रुपये जमा करून वापरले आहेत. हा मुद्दा ऑडिट पॅरामध्ये आलेला नाही. सन्माननीय समिती सदस्य यांनी समितीला दिलेली माहिती, त्यांच्याकडे असलेली कागदपत्रे आणि आपल्याकडे असलेले रेकॉर्ड एकत्रित करून या प्रकरणी सखोल चौकशी करावी. त्यात जे कोणी जबाबदार असतील त्यांच्यावर जबाबदारी निश्चित करून समितीला अहवाल सादर करावा. ऑडिटचा विषय आणि आपल्याकडे असलेला विषय वेगळा आहे. या प्रकरणी १०० टक्के चौकशी केली जाईल. जेणेकरुन भविष्यात असे प्रकार घडता कामा नये. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस आश्वासन दिले की, या प्रकरणी सखोल चौकशी केली जाईल. या प्रकरणी तातडीने कारवाई करून संबंधितांविरुध्द फौजदारी गुन्हे दाखल केले जातील. या प्रकरणामध्ये जवळपास १० अधिकारी सहभागी आहेत. काही सेवानिवृत्त झाले असतील. परंतु काही अधिकारी कार्यरत आहेत. त्यांच्याविरुध्द वकीलांच्या अभिप्रायावरुन फौजदारी कारवाई करण्यात येईल.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्दयांबाबत विभागाकडून माहिती मागविली.**

शासनाकडून जिल्हा परिषदेला प्राप्त झालेली रक्कम स्वतःच्या नावावर ठेवायची नसते असे असतानाही सर्वश्री. सोमवंशी, बी.डब्ल्यू दिवाण व एस.पी.मोहोड या अधिका-यांनी एकुण रुपये ६७,४५,८३१/- इतकी रक्कम स्वतःच्या नावावर ठेवल्याचे निदर्शनास आले आहे. या प्रकरणी संबंधितांकडून रक्कम रुपये १,२५,२५,१२०/- तातडीने वसुल करणे गरजेचे असुन या प्रकरणी सखोल चौकशी करुन संबंधितांविरुध्द तातडीने कार्यवाही करण्याचे व याबाबतचा अहवाल सादर करण्याचे निर्देश समितीने दिले आहेत, त्यानुसार चौकशी केली काय, असल्यास त्यात काय निष्पन्न झाले व त्यानुसार दोषींवर कोणती कारवाई केली आहे ?

**उपरोक्त मुद्यांसंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालील प्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

जिल्हा परिषद, अमरावती येथे मुद्रणालय असुन हे मुद्रणालय जिल्हा परिषदेने स्वतःच्या उत्पन्नातुन चालविण्याबाबत धोरण ठरविले होते. सदरहू मुद्रणालयावर नियंत्रण उप-मुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य) यांचे असुन सामान्य प्रशासन विभागातील रोखपाल तथा कनिष्ठ सहाय्यक यांचेकडे मुद्रणालयाचा व्यवस्थापक म्हणुन अतिरिक्त कार्यभार होता. तत्कालीन उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य) श्री. के.एम.अहमद यांना मुद्रणालयातील व्यवस्थापक यांचे कामकाजाविषयी संशय आल्याने त्यांनी प्रकरणी संबंधित व्यवस्थापक जि.प.मुद्रणालय श्री.संजय गिरी, यांना आदेश क्रमांक ११९१ दिनांक ०७.०२.२०१५ अन्वये निलंबित करून त्यांचे विरूध्द पोलीस स्टेशनमध्ये दखल पात्र गुन्हा क्रमांक-५०/१५ दिनांक १४.०२.२०१५ रोजी दाखल केला आहे. तसेच जिल्हा परिषद मुद्रणालयातील गैरव्यवहार प्रकरणी मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे आदेश क्रमांक ४८४९ दिनांक ०४.०६.२०१५ अन्वये वरीष्ठ लेखाधिकारी, वित्त विभाग यांचे अध्यक्षतेखाली चौकशी समिती नेमण्यात आली. सदर प्रकरणी चौकशी समितीने सन २०१२ ते २०१५ या कालावधीतील चौकशी करुन त्यांचे पत्र क्रमांक ५७४७ दिनांक ०७.०९.२०१५ अन्वये चौकशी अहवाल सादर केला. चौकशी अहवालानुसार रुपये ६७,४५,८३१/- इतकी रक्कम संशयीत अपहार झाल्याचे दिसुन आले आहे. सदर अहवाल माहितीस व जिल्हा परिषदेच्या स्थायी समिती सभेत ठेवण्यात आला. चौकशी अहवालानुसार प्रकरणातील संबंधीत तत्कालीन उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य) श्री. सोमवंशी व श्री.मोहोड व श्री. दिवाण हे प्राथमिकदृष्टया जबाबदार असल्याचे दिसुन आले. त्यांचे पैकी श्री. दिवाण यांचा दिनांक ०७.०८.२०१४ रोजी मृत्यु झाल्याने प्रकरणी श्री.सोमवंशी तथा श्री.मोहोड, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य) यांना खुलासा मागविण्यात आला. प्राप्त खुलाश्यानुसार तथा चौकशी अहवालामध्ये श्री.सोमवंशी यांना दोषी ठरविल्यानुसार यापुर्वी दाखल केलेल्या एफआयआर मध्ये श्री.बी.जी.सोमवंशी, तत्कालीन उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य) यांना दिनांक १७.१२.२०१५ सह आरोपी केले आहे. तसेच श्री.बी.जी.सोमवंशी, हे दिनांक ३०.०४.२०१४ रोजी नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झाले असुन त्यांचे विरूध्द जिल्हा परिषद, अमरावती येथील मुद्रणालयातील शासकीय रक्कमेच्या अपहार प्रकरणी विभागीय चौकशी सुरू करण्याबाबतचा प्रस्ताव या कार्यालयाचे पत्र क्रमांक ४३५७ दिनांक १७.०५.२०१६ अन्वये मा.विभागीय आयुक्त कार्यालय, अमरावती यांचेमार्फत शासनाकडे सादर करण्यास्तव सादर करण्यात आलेला होता. तसेच सदर प्रस्ताव पत्र क्रमांक १०६८१ दिनांक १९.१२.२०१६ अन्वये त्रुटी पुर्तता करुन पुनःश्च सादर करण्यात आला.

श्री. मोहोड तत्कालीन उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य) हे सद्यस्थितीत जिल्हा परिषद, यवतमाळ येथे कार्यरत असुन त्यांचा विभागीय चौकशी प्रस्ताव पत्र क्र.४३५८ दिनांक १७.०५.२०१६ अन्वये शासनास सादर करणेस्तव मा.विभागीय आयुक्त कार्यालय अमरावती यांचेकडे सादर केलेला असुन पत्र क्र. ८५११ दिनांक २१.१०.२०१६ व पत्र क्र. १०६८० दिनांक १९.१२.२०१६ अन्वये त्रुटी पुर्तता करुन पुनःश्च सादर करण्यात आला. मा.विभागीय आयुक्त, अमरावती यांनी सदर प्रकरणी पुनःश्च सखोल चौकशी करुन जबाबदारी निश्चित करुन वस्तुनिष्ठ अहवाल सादर करणेबाबत निर्देशित आहे. त्यानुषंगाने या कार्यालयाने पत्र क्रमांक ६१०० दिनांक ६ जुलै, २०१७ अन्वये सहायक संचालक, स्थानिक निधी लेखापरिक्षा अमरावती यांना विषेश लेखा परिक्षण करणेस्तव कळविण्यात आले आहे. व मा.विभागीय आयुक्त, अमरावती यांचे पत्र दिनांक १८-९-२०१७ च्या अनुषंगाने पुनःश्च दिनांक २२.९.२०१७ अन्वये सहायक संचालक, स्थानिक निधी लेखापरिक्षा, अमरावती यांना विशेष लेखा परिक्षण करणेबाबत आदेशित करणेस्तव विनंती करण्यात आली आहे.

सदर प्रकरणी पुढील तपास पोलीस यंत्रणेमार्फत सुरु असून क्रिमीनल केस क्रमांक १३८६/१६ दिनांक १६.११.२०१६ अन्वये मा.न्यायदंडाधिकारी, अमरावती यांचे न्यायालयात न्याय प्रविष्ठ आहे.

**उपरोक्त मुद्यासंदर्भात ग्रामविकास विभागाकडून खालीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

**ग्रामविकास विभागाचे अभिप्राय**

सदर प्रकरणातील श्री.बी.डब्ल्यु. दिवाण हे मयत झाले आहेत तसेच श्री.ए.पी.मोहोड, तत्का.उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य) जिल्हा परिषद अमरावती या अधिका-यांविरुध्दचा विभागीय चौकशीचा प्रस्ताव विभागीय आयुक्त, अमरावती यांचेकडून अद्याप प्राप्त झालेला नाही. आयुक्त कार्यालयाकडुन उक्त अधिका-यांविरुध्द विभागीय चौकशीचा प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर पुढील आवश्यक कार्यवाही करण्यात येईल.

शासन पत्र दिनांक १८ एप्रिल, २०१७ अन्वये श्री. सोमवंशी हे दिनांक ३०.४.२०१४ रोजी नियत वयोमानानुसार शासन सेवेतून सेवा निवृत्त झाले असल्याने महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम १९७९ मधील नियम २७ (२) (बी) (दोन) मधील तरतुदीनुसार त्यांचे विरुध्द सन २००८ ते २०१२ मधील दोषारोपबाबत शिस्तभंगाची कार्यवाही करता येत नसल्याने त्यांचे विरुध्दचे सन २०१३ मधील दोषारोप विचारात घेवून विभागीय चौकशीचा सुधारीत प्रस्ताव सादर करणेबाबत विभागीय आयुक्त, अमरावती यांना कळविण्यात आले आहे. सदर प्रस्ताव अद्याप अप्राप्त आहे.

**चौकशी अहवाल**

मा.मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद अमरावती यांचे आदेश क्रमांक/साप्रवि/ रोखपाल/ ४८४९/२०१५ दिनांक ०४/०६/२०१५ यांचे आदेशान्वये श्री.सुभाष पु.बोडखे लेखाधिकारी वित्त विभाग जिल्हा परिषद अमरावती यांचे अध्यक्षतेखाली चौकशी समिती नेमण्यात आली त्या समितीत श्री.अनिल ग.चवरे सहाय्यक लेखाधिकारी कृषी विभाग जिल्हा परिषद, अमरावती व श्री.प्रमोद स.कोंडे कनिष्ठ सहाय्यक पंचायत समिती मोर्शी यांची नेमणूक करण्यात आली.

मा.मुख्य लेखा तथा वित्त अधिकारी जिल्हा परिषद अमरावती यांचे आदेश क्रमांक/जिप/वित्त/आस्था-१/४३६६/२०१५ दिनांक ११/०६/२०१५ नुसार समितीने प्रत्यक्ष सखोल चौकशी दिनांक २३/०६/२०१५ ते १९/०८/२०१५ पर्यंत करण्यात आली सखोल चौकशीचा कालावधी सन २०१२-२०१३,२०१३-२०१४ व २०१४-२०१५ उपरोक्त आदेशान्वये कालावधी ठरवून देण्यात आला.

उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य) यांनी वेळोवेळी सादर केलेल्या दस्तऐवजा नुसार तसेच चौकशी समितीने अर्धसमासाव्दारे मागविण्यात आलेल्या माहितीच्या आधारे तसेच संबंधीतांनी चौकशी समिती समक्ष दिलेल्या बयाणावरून चौकशी कालावधीत प्रभारात असलेले उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य) यांचेशी वेळोवेळी चर्चा करून चौकशी अहवाल तयार करण्यात आला.

सन २०१२-२०१३ ते २०१४-२०१५ या कालावधीत खालीलप्रमाणे उप मुख्य कार्यकारी आधिकारी (समान्य) कार्यरत होते.

| अ.क्र. | नांव | पासून | पर्यंत | शेरा |
|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
| १ | श्री.बी.जी.सोमवंशी | १४/०७/२००८ | ०६/०८/२०१२ | |
| २ | श्री.बी.डब्ल्यू.दिवाण | ०६/०८/२०१२ | २७/०५/२०१३ | |
| ३ | श्री.बी.जी.सोमवंशी | ०१/०६/२०१३ | १०/०६/२०१३ | प्रभारी |
| ४ | श्री.बी.डब्ल्यू.दिवाण | ११/०६/२०१३ | ०९/०७/२०१३ | |
| ५ | श्री.बी.जी.सोमवंशी | ११/०७/२०१३ | ०१/०९/२०१३ | प्रभारी |
| ६ | श्री.ए.पी.मोहोड | ०२/०९/२०१३ | ०२/०५/२०१४ | प्रभारी |
| ७ | श्री.बी.डब्ल्यू.दिवाण | ०३/०५/२०१४ | ०७/०८/२०१४ | |
| ८ | श्री.के.एम.अहमद | ११/०८/२०१४ | ०७/०६/२०१५ | प्रभारी |
| ९ | श्री.जे.एन.आभाळे | ०८/०६/२०१५ | २०/०६/२०१५ | प्रभारी |
| १० | श्री.के.एम.अहमद | २२/०६/२०१५ | २१/०७/२०१५ | प्रभारी |

सन २०१२-२०१३ ते २०१४-२०१५ या कालावधीत खालीलप्रमाणे जि.प.मुद्रणालय व्यवस्थापक खालीलप्रमाणे कार्यरत होते.

| अ.क्र. | नांव | पासून | पर्यंत | शेरा |
|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
| १ | श्री.संजय गीरी, क.सहा. | ३०/०४/२०११ | ०४/१२/२०१४ | |
| २ | श्री.ईश्वर राठोड, क.सहा. | ०४/१२/२०१४ | अद्यापपावेतो | |

जिल्हा परिषदेची छपाईची कामे नियोजित वेळी सुबक दर्जाची व्हावी याकरिता अमरावती जिल्हा परिषदेने स्वतःच्या उत्पन्नातून ना नफा ना तोटा या तत्वावर सन १९६६-६७ मध्ये ठराव क्र.२२ दिनांक २८/०९/१९६६ अन्वये स्थापन केलेल्या जि.प.मुद्रणालयाच्या आस्थापनेवर करार सेवेअंतर्गत नियुक्त केलेल्या कर्मचाऱ्यांना कार्यालयीन आदेश क्र.जिप/साप्रवि/आस्था-६०८८/८२,दिनांक ०३/०७/१९८२ अन्वये अस्थायी जिल्हा आस्थापनेवर खालील पदे नियमित करण्यात आली.

| | | |
|---|---|---|
| १ | मॅनेजर | १ पद |
| २ | प्रुफरिडर | १ पद |
| ३ | कंपोझिडर | ३ पद |
| ४ | मशिनमॅन | २ पद |
| ५ | बाईंडर | १ पद |
| ६ | अटेंन्डट | १ पद |

वरील एकूण कर्मचाऱ्यांच्या पदाकरिता वेतनाची तरतूद जिल्हा निधीतून करण्यात येत होती उपरोक्त सर्व कर्मचारी सेवानिवृत झाले आहेत.

**जि.प.मुद्रणालय चालविण्याचे धोरण ठरविणे**

मुद्रणालयातील जूनी मशिनरी व मुद्राणलयाची जूनी पध्दत कालबाहय झाल्याने सदर मशिनरी बदलून नवीन ऑफसेट मशीन बसविण्याकरीता सन २००७-०८ जिल्हानिधीच्या अर्थसंकल्पामध्ये १० लक्ष तरतूद करण्यात आली होती.प्राप्त तरतूदीच्या रकमेमधून ॲफसेट मशीन एक्स्प्लोझर (प्लेट मेकींग युनिट) दोन संगणक संच व इतर अनुषंगीक साहित्य खरेदी करण्यात आले.खरेदी करण्यामागे जिल्हा परिषदेचे उत्पन्न वाढविणे हा उद्देश होता.

**स्थायी समिती सभा ठराव क्र.२** :- दिनांक २९/०४/२००८ अन्वये मुद्रणालय हे ठेकेदारी पध्दतीने चालवीण्यास मान्यता देण्यात आली,व तसेच जिल्हा परिषदेच्या कामाव्यतिरिक्त ठेकेदारास बाहेरील कामे करण्याची या ठरावाव्दारे मुभा देण्यात आली.पंरतू कंत्राटदाराचे रू.१००/-च्या स्टॅप पेपरवर करारनामा हस्तालीखीत करण्यात आला करारनाम्याचे अवलोकन केले असता त्यावर मुख्य कार्यकारी अधिकारी किंवा उप मुख्य कार्यकारी अधिकारी यांची करारनामा स्विकृत केल्याची स्वाक्षरी दिसून आली नाही म्हणजेच करारनामा न करता मा.मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प.अमरावती यांनी स्वंयसिध्द अभियंता सेवा सहकारी संस्था राजापेठ अमरावती यांना छपाई बाबत पत्र क्रमांक/जिप/साप्रवि/मुद्रण/११५३५/२००९ दिनांक १७/१२/२००९ नुसार दर पत्रक स्विकृत केल्याचे कळविण्यात आले आहे.मुदत दिनांक ३१ मार्च,२०११ पर्यंत देण्याचे आढळून आले.

तसेच गजानन ऑफसेट ॲन्ड स्टेशनरी सप्लायर्स गांधी चौक अमरावती यांना बाईंडींगचे कामाकरीता रू.१००/-चे स्टॅप पेपर वर हस्तलीखीत करारनामा आढळून आला. परंतू, करारनामा स्विकृत न करता मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी पत्र क्रमांक/जिप/साप्रवि/मुद्रण/११५३६/२००९, दिनांक १७-१२-२००९ नुसार दरपत्रक स्विकृत केल्याचे कळविण्यात आले आहे. मुदत दिनांक ३१ मार्च, २०११ पर्यंत देण्यात आली. स्थायी समितीने घेतलेले निर्णय जिल्हा परिषद सर्वसाधारण सभेत मांडून सभागृहाची मान्यता घेणे आवश्यक होते. परंतू, ही बाब सभागृहात मांडण्यात आली नाही. त्यामुळे जिल्हा परिषद सर्वसाधारण सभेची मान्यता न घेताच मुद्रणालयाचा कारभार तत्कालीन उप मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. बी. जी. सोमवंशी यांनी चालविला.

चौकशी पूर्ण होईपर्यंत जिल्हा परिषदेचा ठराव अवलोकनार्थ सादर करण्यात आला नाही, म्हणजेच सदर बाब ही जिल्हा परिषदेच्या निदर्शनास आणून दिलेली नाही. ही गंभीर बाब आहे. तसेच करारनामा न करताच दरास स्विकृती देणे ही नियम बाह्य बाब आहे असे समितीचे मत आहे.

**स्थायी समिती सभा ठराव क्र.५:-** दिनांक १२-११-२०१९ अन्वये सन २००९-१० ते २०१०-२०११ या वित्तीय वर्षाकरीता मंजुरीचे कामाच्या दरास मंजुरी देण्यात आली. सदर ठरावन्वये मे. स्वयंसिध्द अभियंता, सेवा सहकारी संस्था, अमरावती यांचे कडून छपाई, डी.टी.पी.मल्टीकलर छपाई व मदतनिसांची कामे तसेच मे.गजानन ऑफसेट ॲन्ड स्टेशनरी सप्लायर्स अमरावती यांचे कडून बाईडींगची कामे मंजूर दराप्रमाणे करून घेण्यास मंजूरी देण्यात आली. स्थायी समितीने घेतलेले निर्णय जिल्हा परिषद सर्वसाधारण सभेत मांडून सभागृहाची मान्यता घेणे आवश्यक होते. परंतू, ही बाब सभागृहात मांडण्यात आली नाही. त्यामुळे जिल्हा परिषद सर्वसाधारण सभेची मान्यता न घेताच मुद्रणालयाचा कारभार उप मुख्य कार्येकारी अधिकारी श्री. बी. जी. सोमवंशी यांनी चालविला ही गंभीर बाब आहे.

मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जि. प., अमरावती यांचे आदेश क्र. ७५६०, दिनांक १४-०७-२०११ अन्वये मे. स्वयंसिध्द अभियंता, सेवा सहकारी संस्था, अमरावती यांना छपाईचे कामे कंत्राटी पध्दतीने करून पुरविण्याकरिता दिनांक ०१-०४-२०११ ते ३१-०३-२०१६ पर्यंत या पाच वर्षाकरिता मुदतवाढ देण्यात आली आहे. मुदतवाढीचा करारनामा रू.१००/-च्या स्टॅप पेपर वर करण्यात आला. परंतू, त्यावर मुख्य कार्यकारी अधिकारी किंवा उप मुख्य कार्यकारी अधिकारी सामान्य यांची स्वाक्षरीसह करारनामा स्विकृत करण्यात आला नाही, ही नियमबाहय बाब आहे, असे चौकशी समितीचे मत आहे.

मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जि. प,. अमरावती यांचे आदेश क्र.७५६१, दिनांक १४-०७-२०११ अन्वये मे.गजानन ऑफसेट ॲन्ड स्टेशनरी सप्लायर्स, अमरावती यांना दिनांक ०१-०४-२०११ ते ३१-०३-२०१६ पर्यंत या पाच वर्षांकरिता मुदतवाढ देण्यात आली आहे.

मुद्रणालयावर नियंत्रण ठेवणे करिता जिल्हा परिषद कर्मचाऱ्यांमधून श्री. गजेंद्र पाटील, वरिष्ठ सहाय्यक यांची नेमणूक करण्यात आली. त्यांनी स्वत:चे काम संभाळून अतिरिक्त प्रभार दिनांक १-११-२००७ ते ३०-०४-२०११ पर्यंत सांभाळाला या कार्यकाळात उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य) या पदावर श्री. बी. जी. सोमवंशी हे होते.

दिनांक ३०-४-२०११ ते ४-१२-२०१४ पर्यंत श्री. संजय गोपाल गीरी, कनिष्ठ सहायक (निलंबित) यांना रोखपाल पदाचा सा.प्र.वि.चा प्रभार सांभाळून व्यवस्थापक पदाचा पदभार सोपविला. नस्तीत दर्शविल्यानुसार हुशार व अनुभवी तसेच प्रशासनातील ज्ञान असलेला कर्मचारी व्यवस्थापक या पदावर नेमणूक करावा असे असतांना वरिष्ठ सहायक नेमण्याऐवजी कनिष्ठ सहाय्यकाची नेमणूक करून प्रभार श्री. संजय गो.गीरी (निलंबित) क.स. यांचेकडे हस्तांतरीत करण्यात आला. त्यामुळे पाहिजे त्या प्रमाणात ते मुद्रणालयावर नियंत्रण ठेवण्यास यशस्वी होऊ शकले नाही. तसेच प्रशासनाने मुद्रणालयासारख्या महत्वाच्या जि.प. उत्पन्नवाढीच्या स्तोत्राकडे अक्षम्य दुर्लक्ष केल्याचे दिसून येते. मुद्रणालयावर तसेच संबंधित व्यवस्थापकावर उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य) यांनी नियंत्रण ठेवले नसल्याचे समितीचे मत आहे. **या पुढे पूर्ण वेळ व्यवस्थापक मुद्रणालयीन कामकाजावर देखरेख ठेवण्याकरिता नेमावा व त्याच्या कर्तव्य व जबाबदाऱ्या निश्चित कराव्यात.**

जि.प. मुद्रणालयातील सन २०११-१२ ते २०१४-१५ या कालावधीची दस्ताऐवजाची तपासणी केली असता चौकशी समितीला खालील मुद्दे निदर्शनास आले. **(पहा परिशिष्ट पान क्र.१ ते १९)**

**मुद्दा क्रमांक - १ चलानद्वारे (जिल्हानिधी) सेसफंड बँक खाते क्र. ६४/४ मध्ये जमा न झालेल्या रक्कमा :--**

| अ.क्र. (१) | वर्ष (२) | विभागाचे नांव (३) | धनादेश क्रमांक (४) | दिनांक (५) | रक्कम (६) |
|---|---|---|---|---|---|
| १ | २०११-१२ | भू.सं.वि.यं., अमरावती | २७४४८५ | १२-११-२०१२ | २२५/- |
| २ | २०१२-१३ | भू.सं.वि.यं. अमरावती | २७४४८७ | १२-११-२०१२ | ४५६८/- |
| ३ | २०१२-१३ | शिक्षण (प्रा.) अमरावती | . . | १८-०१-२०१३ | ७८१/- |
| ४ | २०१२-१३ | पंचायत समिती, तिवसा | १३९१९९ | ०५-१२-२०१२ | ३००/- |

उपरोक्त अ.क्रं.१ ते ४ च्या रकमा उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य) यांचेकडे धनादेशाद्वारे प्राप्त झाल्यानंतरही त्या संबंधित खात्यात जमा केल्या नसल्याचे दिसून आले. तेव्हा रु.५८७४/- चे कालबाहय धनादेश पुन्हा संबंधित खात्याकडून पाठपुरावा करून घेऊन जिल्हानिधीत भरणा करावयात.

**मुद्दा क्रमांक - २ मुद्रण छपाईबाबतच्या थकीत रकमा वसूल करणेबाबत.--**

सन २०११-१२ ते २०१४-१५ पर्यंत जि.प.च्या विविध विभाग व पंचायत समितीकडून खालीलप्रमाणे रु.३५,५६,६५५/- चे संबंधित कार्यालयाचे मागणीनुसार मुद्रण कार्य करण्यात आले व संबंधित कार्यालयाकडून पूर्ण रक्कम प्राप्त झाल्यानंतरच सदर साहित्य वितरीत करणे आवश्यक असतांना उधारी तत्वावर साहित्य दिल्याचे दिसून येते. तसेच या वसुलीकरिता करावयाचे प्रयत्न मुद्रणालयाने वेळोवेळी केलेले दिसून येत नाहीत. त्यामुळे दिर्घकाळ रकमा प्रलंबित राहिल्या व जिल्हा परिषदेच्या उत्पन्नात घट झाली असल्याचे दिसून येते.

| अ. क्र. (१) | विभागाचे नांव (२) | २०११-१२ (३) | २०१२-१३ (४) | २०१३-१४ (५) | २०१४-१५ (६) | एकूण वसुलपात्र थकबाकी (७) |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | बांधकाम | १६९८ | ३१२९० | ७५२५५ | १५९२८७ | २६७५३० |
| २ | सा.प्र.वि. | ५९९४० | १०५९३७ | २५०८९२ | १४७३४९ | ५६४११८ |
| ३ | आरोग्य | २४५८८ | ० | ० | ० | २४५८८ |
| ४ | पंचायत | ५०१० | ० | ० | ० | ५०१० |
| ५ | सिंचन | २२७५ | ४३६२ | ० | ३७८२ | १०४१९ |
| ६ | जि.ग्रा.वि.यं. अम. | ० | ० | १५७९६ | ५४५७५ | ७०३७१ |
| ७ | वित्त विभाग | ९२७७३ | १८१६६३ | १७२४०३ | ० | ४४६८३९ |
| ८ | शिक्षण | २८१९३ | ८८८९ | १०२६४ | १५१५८ | ६२५०४ |
| ९ | समाजकल्याण | ० | ११७७७ | ५७४६५ | ४५३५ | ७३७७७ |

| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) |
|---|---|---|---|---|---|---|
| १० | महिला बाल कल्याण | ३८९५९ | ० | ० | ० | ३८९५९ |
| ११ | विभागीय आयुक्त, अमरावती | ० | ४४९९० | ४१०३५ | ० | ८६०२५ |
| १२ | पं.स., चांदुरबाजार | १२२९ | ० | ० | ० | १२२९ |
| १३ | पं.स., चिखलदरा | ० | ४८५ | २७७७८ | ० | २८२६३ |
| १४ | पं.स., नांदगांव खंडे | | | | ५३१२ | ५३१२ |
| १५ | जिल्हाधिकारी, अमरावती | | | | | ४३५१२८ |
| १६ | जिल्हाधिकारी, अमरावती | | | | | ४८५५५० |
| १७ | जिल्हाधिकारी, अकोला | | | | | ७८०३३ |
| १८ | सा.प्र.वि., अमरावती | | | | | ८७३००० |
| १९ | सा.प्र.वि., अमरावती परीक्षेवर जादा खर्च. | | | | | १६९३९०१ |
| | एकूण . . | २५४६६५ | ३८९३९३ | ६५०८८८ | ३८९९९८ | ५२५०५५६ |

अ. क्र. १८ वरील रक्कम जिल्हाधिकारी, भंडारा यांचेकडून प्राप्त झाली. परंतु ती जिल्हा निधीत भरणा न करता उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य) यांचे खाते क्रमांक ५००२०१७७९३७ या खात्यात जमा करण्यात आली ती त्वरीत जिल्हा निधीत जमा करावी. अ.क्र.१९ प्राप्त रकमेपेक्षा रु.१६,९३,९०१/- जास्त खर्च परीक्षेवर मुद्रणालयाच्या प्राप्त रकमेतून करण्यात आला असल्याने ती रक्कम सामान्य प्रशासन विभागाने परत जिल्हा निधीत जमा करावी.

सन २०११-१२ ते १६-१-२०१५ पर्यंत मुद्रणालयाचे थकीत वसुलीबाबत कोणतेही प्रयत्न केलेले नसल्याचे दिसून आले. दिनांक १७-१-२०१५ ते ३०-६-२०१५ पर्यंत खालीलप्रमाणे उपरोक्त विभागास पत्रव्यवहार केल्याचे दिसून आले. परंतु फक्त पत्र व्यवहारच दिसून आला त्यातून वसुलीबाबत काहीही कार्यवाही झालेली आढळून आलेली नाही. या बाबीकडे उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य) यांनी दुर्लक्ष केल्याचे स्पष्ट होते, तेव्हा उपरोक्त वसुलीची कार्यवाही तात्काळ करून रकमा त्वरीत जिल्हा निधीत भरणा कराव्यात व जि.प.च्या उत्पन्नात भर टाकावी, असे समितीचे मत आहे.

| अ.क्र. | पदनाम | जा.क्र. | दिनांक | शेरा |
|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
| १ | मु.का.अ.जि.प., अमरावती | ४७८ | १७-०१-२०१५ | - |
| २ | मु.का.अ.जि.प., अमरावती | १०५५ | ०५-०२-२०१५ | - |
| ३ | मु.का.अ.जि.प., अमरावती | ४१०१ | ०६-०५-२०१५ | - |
| ४ | मु.का.अ.जि.प., अमरावती | ४३४८ | १९-०५-२०१५ | - |
| ५ | मु.का.अ.जि.प., अमरावती | ४७८० | ३०-०६-२०१५ | कारणे दाखवा |

**मुद्दा क्रमांक - ३ साठापंजी (नमुना ३३) अपूर्ण असल्याबाबत :--**

सन २०११-१२ ते २०१४-१५ जि.प. मुद्रणालयातील साहित्याबाबत साठापंजीची तपासणी केली असता खालील त्रुट्या आढळून आल्या.

(अ) सन २०११-१२ मध्ये साहित्य प्राप्तीच्या नोंदीखाली उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य) यांच्या साक्षऱ्या असून साहित्य वितरीत पृष्ठावर व्यवस्थापक यांची स्वाक्षरी नाही. साहित्य वितरण निरंक झाल्यावर उप मुख्य कार्यकारी यांची स्वाक्षरी घेण्यात आली नाही. सन २०११-१२ च्या साठा पत्रकानुसार साठापंजीची तपासणी केली असता शिल्लक साठा निरंक आहे. महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या लेखा संहिता, १९६८ चे नियम ९०, ९१ नुसार दर सहा महिन्यांनी साठा पडताळणी करणे आवश्यक असताना तशी कार्यवाही दिसून आली नाही.

(ब) सन २०१२-१३ च्या साठा पत्रकानुसार शिल्लक साठा नोंदीबरोबर असल्याचे आढळून आले. साहित्य प्राप्तीच्या नोंदीखाली साठापंजीवर प्रत्येक नोंदीसमोर उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य) यांच्या स्वाक्षऱ्या घेणे बंधनकारक असताना तुरळक ठिकाणी स्वाक्षऱ्या घेण्यात आल्या. त्यामुळे नोंदी स्वाक्षांकित न करताच साठा नोंदवही अपूर्ण ठेवण्यात आली. नोंदवहीतील सर्व रकाने भरणे आवश्यक असताना पूर्ण रकाने भरलेले नाहीत.

(क) सन २०१३-१४ मध्ये साहित्य प्राप्तीच्या नोंदी घेण्यात आल्या असून साठापंजीवर उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य) यांच्या स्वाक्षऱ्या घेण्यात आल्या नाहीत. मुद्रणालयातील प्राप्त साठ्यावर संपूर्ण नियंत्रण श्री. संजय गीरी, क.सहा. तथा (निलंबित) व्यवस्थापकांचे असावयास पाहिजे होते, परंतु त्यांनी या बाबीकडे लक्ष दिले नाही.

वितरीत साहित्याबाबत तसेच साठा निरंक झालेल्या नोंदीखाली उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य) यांच्या स्वाक्षऱ्या नाहीत. साठापंजीत साठा पडताळणी केल्याचे आढळून आले नाही. तसेच चौकशी सुरू असताना प्रत्यक्ष शिल्लक साठा पाहिला असता तो खालीलप्रमाणे कमी आढळून आला.

| अ. क्र. | साहित्याचे वर्णन | साठापंजीनुसार शिल्लक साठा | किंमत प्रती नग/बंडल | साठापंजीनुसार कमी साठा | कमी असलेल्या साठ्याची किंमत |
|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) |
| १ | पी.एस.प्लेट | १२ नग | २१८/- प्रती नग | ८ नग | १७४४ |
| २ | झेरॉक्स पेपर लिगल साईज | २८ रिम | १६९/- प्रती रिम | २६ रिम | ४३९४ |
| ३ | बाईंडीग पुठ्ठा जाडा | ५९.५ | ४२८/- | ६.५ | २७८२ |
| ४ | चिक्की | ६८ किलो | ३५ / प्रती कि. | ६८ किलो | २३८० |
| ५ | धागा बंडल | ७६ बंडल | १०८/-प्रती बंडल | ७६ बंडल | ८२०८ |
| ६ | स्टॅपल पिन १० नं. | ३७ पाकीट | ०९ /-प्रती पाकीट | ३७ पाकीट | ३३३ |
| ७ | स्टॅपल पिन २४/६ नं. | ३० पाकीट | १२ /-प्रती पाकीट | ३० पाकीट | ३६० |
| ८ | स्टॅपल पिन २३/१५ नं. | ४५ पाकीट | २४ /-प्रती पाकीट | ४५ पाकीट | १०८० |
| ९ | स्टॅपल पिन २३/१२ नं. | ५० पाकीट | ३५ /-प्रती पाकीट | २१ पाकीट | ७३५ |
| १० | जाडा सेंचुरी पेपर | ४२ नग | ०८ /- प्रती नग | ४२ नग | ३३६ |
| ११ | फेव्हीकॉल | ४ कि.ग्रॅ. | १४३ /-प्रती किलो | ०४ कि.ग्रॅ. | ५७२ |
| | एकूण . . | | | | २२९२४ |

उपरोक्त विवरणपत्रानुसार रु. २२,९२४/- संबंधितांकडून वसूल करून घ्यावेत व सदर रक्कम जिल्हानिधीत भरणा करावी.

**मुद्दा क्रमांक - ४ जि.प.मुद्रणालय उत्पन्न व खर्चाचे नफा तोटा पत्रकाबाबत.--**

| अ.क्र. | वित्तीय वर्ष | उत्पन्न | खर्च | नफा | तोटा |
|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) |
| १ | २०१२-१३ | ५३,७३,०५१ | २९,९४,५७७ | २३,७८,४७४ | |
| २ | २०१३-१४ | २५,०७,४६७ | ३४,९५,५२४ | - | (-) ९,८८,०५७ |
| ३ | २०१४-१५ | २८,३९,५५५ | २९,१५,५६० | - | (-) ७६,००५ |

उपरोक्त पत्रकावरून असे दिसून येते की, सन २०१२-२०१३ पर्यंत मुद्रणालय नफ्यांत होते, तर सन २०१३-२०१४ व सन २०१४-२०१५ या वित्तीय वर्षात मुद्रणालय तोट्यात आल्यामुळे रु.१०६४०६२ (रुपये दहा लाख चौसष्ट हजार बासष्ट फक्त) रुपयांनी जिल्हा परिषदेचे आर्थिक नुकसान जि.प. ला सहन करावे लागले.

मुद्रणालयावर उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य) यांचे प्रत्यक्ष नियंत्रण असल्यामुळे ही बाब वेळोवेळी जिल्हा परिषदेच्या सभागृहास तसेच मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे निदर्शनास आणून देणे आवश्यक होते तशी कार्यवाही झाल्याचे दिसून आले नाही.

**मुद्दा क्रमांक -५ जि.प.मुद्रणालयात छापण्यात आलेल्या मागणी पुस्तकांचे हिशोबाकरिता साठा नोंदवही न ठेवल्याबाबत.--**

मागणी पुस्तके किती छापली याची स्वतंत्र साठा नोंदवही अद्यावत ठेवणे आवश्यक असताना ही नोंदवही न ठेवल्यामुळे किती मागणी पावती पुस्तके छापली याचा अर्थ बोध होत नाही. या महत्वाच्या बाबीकडे श्री. बी. जी. सोमवंशी, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य) व श्री.संजय गीरी, व्यवस्थापक यांनी पूर्णतः दुर्लक्ष केल्याचे दिसून येते.

यावर समितीचे असे मत आहे की, मागणी पावती पुस्तक साठा नोंदवही न ठेवणे म्हणजे प्राप्त होणाऱ्या रकमांचा हिशेब दुसऱ्या कोणालाही माहीत न होऊ देणे, आर्थिकदृष्ट्या अत्यंत महत्वाची नोंदवही असताना ती न ठेवणे म्हणजे मनमानी कारभार चालविणे असा होतो. ही अत्यंत गंभीर बाब आहे, तेव्हा या पावती पुस्तकांचा शोध घ्यावा व यापुढे तरी या बाबीवर उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य) यांनी स्वतः लक्ष घालून नोंदवही अद्यावत करून घ्यावी व पुढील आर्थिक बाबीवर नियंत्रण ठेवावे.

**मुद्दा क्रमांक-६ धनादेश प्राप्त नोंदवही (लेखासंहिता १९६८ नियम ५० नुसार नमुना ११) :--**

वित्तीय वर्ष २०१२-१३ व २०१३-१४ मध्ये नमुना ११ नुसार विहीत नमुन्यात नोंदवही ठेवण्यात आली नाही. ही नोंदवही आर्थिक नियंत्रणाचे दृष्टीने अत्यंत महत्वाची आहे, किती रकमा धनादेशाव्दारे प्राप्त झाल्या व कोणत्या खात्यात जमा करण्यात आल्या याचा अर्थबोध या नोंदवही वरून होतो. सन २०१४-१५ मध्ये नमुना ११ नोंदवही ठेवण्यात आली आहे.

यावर चौकशी समितीचे असे मत आहे की, धनादेश प्राप्त नोंदवही मध्ये प्राप्त धनादेशाच्या नोंदी घेणे आवश्यक असताना सन २०१२-१३ ते २०१३-१४ मध्ये नोंदवही ठेवलेली नसल्याने धनादेश कोणाकडून प्राप्त झाले, याबाबत खात्री करता येत नाही. ही नोंदवही न ठेवणे म्हणजे गैरव्यवहाराला चालणा देणे असा होतो, कारण जिल्हा परिषदेच्या अत्यंत महत्वाच्या उत्पन्नाचे स्तोत्र असलेल्या मुद्रणालयाकडे प्राप्त धनादेश कोणाकडून किती रकमेचे प्राप्त झाले, हे कोणालाही माहीत होऊ न देणे म्हणजेच मनमानी कारभार करणे होय, असे चौकशी समितीचे मत आहे.

**मुद्या क्रमांक- ७ मुद्रणालयाच्या उत्पन्नातून प्राप्त होणाऱ्या रक्कमेंचे ७० टक्के व ३० टक्के प्रमाण सक्षम प्राधिकरणाची परवानगी न घेता ठरविणे व जिल्हानिधीचे खाते असतांना दुसरे बँक खाते उघडून गैरव्यवहार करणे व जि.प.च्या रक्कमा लेख्याबाहेर ठेवणे.--**

**(अ) जि.प.चे दर ठरलेले असतांना ७० टक्के व ३० टक्के प्रमाण सक्षम प्राधिकरणाची परवानगी न घेता ठरविणे :**

जिल्हा परिषदेच्या मुद्रणालयाच्या कामकाजाची संपूर्ण कार्यपध्दती खालीलप्रमाणे ठरविण्यात आली होती.

मा.ओमप्रकाश बकोरिया,मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प., अमरावती यांचे आदेश क्र.७५६०, दिनांक १४-०७-२०११ अन्वये मे.स्वयंसिध्द अभियंता सेवा सहकारी संस्था,अमरावती यांचे छपाईचे मंजूर केलेले दरपत्रक पुढीलप्रमाणे:-

| अ.क्र | विवरण | दर प्रति हजार |
|---|---|---|
| (१) | (२) | (३) |
| १ | ऑफसेट मशीन ऑपरेटर | रू.१६.५०/- प्रति हजार |
| २ | ऑफसेट मशीन मदतनीस | रू.०८.००/- प्रति हजार (सर्व प्रकारचे साईज करिता) छपाई |
| ३ | डि.टी.पी.ऑपरेटर | रू.१०.००/- प्रति पेज टाईप सेटींग |
| ४ | मल्टीकलर प्रिंटींग | रू.९८०/-(प्रति हजार सिंगल साईज) छपाई |
| | | रू.११६०/-(प्रति हजार डबल साईज) छपाई |

तसेच वरीलप्रमाणे मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प., अमरावती यांचे आदेश क्रमांकानुसार मे.गजानन ऑफसेट ॲन्ड स्टेशनरी सप्लायर्स,अमरावती यांचे मुद्रण साहित्य बाईंडींगचे मंजूर केलेले दरपत्रक पुढीलप्रमाणे:-

| अ. क्र. | विवरण | दर प्रती नग |
|---|---|---|
| (१) | (२) | (३) |
| १ | रजिस्टर नंबरीगसह (१७x२७) १/८ ,३०० पेज करिता | रू.१८.५०/- प्रती नग |
| २ | बुकलेट टिचिंग पेस्टींगसह | रू.०९.५०/- प्रती नग |
| ३ | लेटर पॅड १०० पेजेस | रू.०६.५०/- प्रती नग |
| ४ | बिलबुक नंबरींगसह डुप्लीकेट मध्ये | रू.०९.५०/- प्रती नग |
| ५ | बुकलेट ग्यादरींग टिचींग पेस्टींग ५० पेजेस करिता | रू.०५.००/- प्रती नग |

उपरोक्त दराने जिल्हा परिषदेच्या छपाई व बाईंडींगची जिल्हानिधीची देयके याच कंत्राटदारास अदा करण्यात आली असतांना वेगळयाने ७० टक्के व ३० टक्के रकमेचे प्रमाण श्री.बी.जी.सोमवंशी, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य) यांनी स्वत:चे मताप्रमाणे ठरविले.

त्यांनी ठरविल्याप्रमाणे ७०% कंत्राटदार व ३०% जिल्हा परिषद सेस असे प्रमाण ठरविल्यानंतरही रक्कम या प्रमाणात जि.प.सेस चे खात्यात जमा करण्यात आलेली नाही व किती रक्कम प्राप्त झाली याचा अर्थ बोध होण्याचे दृष्टीने वेगळी नोंदवही सुध्दा ठेवण्यात आली नाही. त्यामुळे त्यांचेच मताप्रमाणे विचार केल्यास जि.प.ला ३०% घेणे असलेल्या रक्कमा सुध्दा पूर्ण प्राप्त झाल्या नाहीत.

७०% व ३०% प्रमाणे केलेली विभागणी ही जि.प.स्थायी समिती, जि.प. सर्वसाधारण सभा किंवा मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अमरावती यांचे निदर्शनास आणून देण्याची सर्वस्वी जबाबदारी श्री.बी.जी.सोमवंशी, तत्कालीन उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य) यांची होती त्यांनी ही बाब जिल्हा परिषदेच्या विषय समिती अथवा जि.प. सभागृहात किंवा मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे निदर्शनास आणून दिली नाही म्हणजेच जिल्हा निधीत रक्कमा जमा न करुन जिल्हा परिषदेच्या लेख्यात समाविष्ट न करता त्या रक्कमा जिल्हा परिषदेच्या लेख्याबाहेर ठेवून जिल्हा परिषदेची फसवणूक केली असे समितीचे मत आहे.

मुद्रणालयाच्या छपाईच्या जि.प.व्यतिरिक्त प्राप्त होणाऱ्या कार्यालयाकडील रक्कमा सुध्दा जिल्हा निधीत जमा न करता दुसरे खाते उघडून परस्पर आर्थिक व्यवहार केला. खालील मुद्दा (ब) मध्ये सविस्तर खुलासा करण्यात आला आहे.

**(ब) एक खाते बँकत असतांना दुसरे बँक खाते उघडून गैरव्यवहार करणे :**

उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य) या पदनामाने अलाहाबाद बँक शाखा, राठी नगर, अमरावती या शाखेत खाते क्रमांक ५००२०१७७९३७ दिनांक ०१/१०/२००९ पासून खाते असून या खात्यातून कर्मचाऱ्यांचे वेतन व भत्ते मा.अध्यक्ष,उपाध्यक्ष,विषय समित्यांचे सभापती यांचे मानधन व प्रवासभत्ता तसेच जिल्हा परिषद सदस्य यांचे प्रवासभत्ता, वाहन चालकांचे अग्रीम ईत्यादी बाबींचे आर्थिक व्यवहार सुरळीत सुरू होते व या सर्व बाबींच्या नोंदी नियमाप्रमाणे विहीत नमुन्यातील नोंदवह्यात घेण्यात आल्याचे निदर्शनास आले या खात्याची स्वतंत्र रोखपुस्तीका, प्राप्त धनादेशाची नोंदवही रोख रक्कम वाटप रजिस्टर ठेवण्यात आले असल्याचे दिसून आले.

मुद्रणालयाचे संपुर्ण आर्थिक व्यवहार हे जिल्हा परिषदे संबंधीत असल्यामुळे प्राप्त होणाऱ्या सर्व रक्कमा जिल्हानिधीतच जमा होणे आवश्यक असतांना फक्त जिल्हा परिषदेतील संबंधीत विभागाकडून छपाईचे प्राप्त धनादेशच जिल्हा निधीत जमा करण्यात आले आहे.

जिल्हा परिषदेचे मुद्रणालय असल्यामुळे जिल्हा परिषदे व्यतीरिक्त विविध शासकीय कार्यालयाने जि.प.मुद्रणालयातून छपाई करणे करिता छपाईचे आदेश दिलेत व दिलेल्या आदेशानुसार कामे करण्यात आली, केलेल्या कामांची मागणीप्रमाणे संबंधीत कार्यालयाने रक्कमा धनादेशाव्दारे मुद्रणालयास पाठविण्यात आल्या परंतु प्राप्त झालेल्या रक्कमा नियमाप्रमाणे जिल्हा परिषदेच्या जिल्हा निधीत जमा होणे आवश्यक असतांना श्री.बी.जी.सोमवंशी, तत्कालीन उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य) यांनी जि.प.स्थायी समिती, जि.प.सर्वसाधारण सभा किंवा मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांची मंजुरी न घेता उप मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अमरावती या नावाने स्वतंत्र खाते अलाहाबाद बँक शाखा, राठी नगर, अमरावती येथे खाते क्रमांक ५००८०३४९८१७ दिनांक ०३/१०/२०११ ला गैरव्यवहार करणे करिता उघडण्यात आले.कारण उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सा) यांना हया रक्कमा कुठे जमा करावयास पाहीजे हे माहीत असतांना सुध्दा जाणीवपूर्वक पदाचा दुरूपयोग करून सदर खाते जिल्हा परिषदेपासून लपवून ठेवण्यात आले व स्वतःच्या वैयक्तीक खात्याप्रमाणे आर्थिक व्यवहार केल्याचे दिसून आले व या खात्यात उपरोक्त ७० टक्के व ३० टक्के असे एकूण १०० टक्के जमा करण्यात आल्या वास्तविक पाहता हया रक्कमा जिल्हा निधीत जमा व्हावयास पाहीजे होत्या.

या खात्यात जिल्हा परिषदेच्या मुद्रणालयासंबंधी जिल्हा परिषद कार्यालयाव्यतिरिक्त शासकीय कार्यालयाने पाठविलेले धनादेश परस्पर कोणत्याही कार्यालयीन रेकॉर्डला नोंदी न घेता जमा केले जात होते. याबाबत रोखपुस्तीका, प्राप्त धनादेशांची नोंदवही प्राप्त उपप्रमाणे,धनादेश वितरण नोंदवही यापैकी कुठलीच नोंदवही ठेवण्यात आलेली नाही.

**अलाहाबाद बँक, राठीनगर, अमरावती खाते क्रमांक ५००८०३४९८१७ मधील दिनांक ०४/१०/२०११ ते २८/०२/२०१५ पर्यंत झालेला आर्थिक व्यवहार खालीलप्रमाणे:-**

| | | |
|---|---|---|
| (१) | मुद्रणालयाचे प्राप्त धनादेश | रू. २,७०,८६,९४६/- |
| (२) | सरळ सेवा भरती परिक्षार्थीकडून प्राप्त | रू. ८,०८,५६५/- |
| (३) | प्रबोधीनी अमरावती थकबाकी जमा | रू. ३५,५९५/- |
| (४) | व्याज | रू. ६०,३२७/- |
| (५) | बँकेचे समायोजन रक्कम | रू. ७,२९,१८८/- |
| (६) | एकूण जमा | रू. २,८७,२०,६२१/- |

**उपरोक्त जमा रकमेतून खालीलप्रमाणे झालेला खर्च**

| | | |
|---|---|---|
| (१) | मुद्रणालयावर झालेला खर्च | रू. २,५२,८६,४३३/- |
| (२) | सरळ सेवा भरती परिक्षा खर्च | रू. २५,०२,४६६/- |
| (३) | बँकचे समायोजन रक्कम | रू. ७,२९,१८८/- |
| (४) | बँक चार्जेस | रू. ३२४/- |
| (५) | एकूण खर्च | रू. २,८५,१८,४११/- |
| (६) | बँक स्क्रोल प्रमाणे शिल्लक.(२८-०२-१५) | रू. २,०२,२१०/- |

मुद्रणालयावर एकूण प्राप्त रक्कम २,७०,८६,९४६/- मधून रू.२,५२,८६,४३३/- खर्च करण्यात आला व त्यातील शिल्लक १८,००,५१३/- या रक्कमेतून रू.१६,९३,९०१/- सरळ सेवा भरती परीक्षेकरीता नियमबाह्य खर्च करण्यात आला. कारण परिक्षार्थीकडून फक्त रू.८,०८,५६५/-परिक्षा फी व्दारे प्राप्त झाले असतांना जादा खर्च करण्यात आला तो जिल्हा परिषदेकडून वसूलपात्र ठरतो उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य), जिल्हा परिषद, अमरावती यांना अर्धसमासाव्दारे उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य) या पदनामाचे किती बँक खाते आहेत व कोणकोणत्या बँकेत आहेत त्याबाबत त्यांनी सादर केलेल्या माहितीच्या आधारे परीक्षेचे दुसरे खाते असल्याचे त्यांनी लेखी कळविले नाही तरी सुध्दा असे खाते असल्यास त्याचा शोध घ्यावा व दुबार खाते असल्यास त्या खात्यात जर परीक्षा फी जमा असल्यास या जमा खर्चाचा ताळमेळ दुबार देयके काढण्यात आली किंवा कसे या बाबतची संपर्ण खात्री उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य) यांनी करून घ्यावी व रू.१६,९३,९०१/- जिल्हा निधीत (सेसफंड) भरणा कराव्यात.

मुद्रणालयाची जमा झालेली एकूण रक्कम रू.२,७०,८६,९४६/- च्या ३० टक्के रू.८१,२६,०८४/- जमा होणे आवश्यक होते त्या पैकी रू.१३,८०,२५२/- जिल्हा निधीत जमा करण्यात आले.उर्वरीत रू.६७,४५,८३२/- जिल्हा निधीत जमा करण्याऐवजी संबंधीत मुद्रणालयाचे कंत्राटदार मे.स्वयंसिध्द अभियंता, सहकारी संस्था, अमरावती रू.१४,७७,९५२/- व मे.गजानन ऑफसेट ॲन्ड स्टेशनरी सप्लायर्स, अमरावती रू.५२,६७,८८०/- यांना अदा करण्यात आली. तेव्हा सदर रक्कम संबंधीतांकडून वसूल करून जिल्हा निधीत भरणा कराव्यात असे समितीचे मत आहे.

खालील दर्शविलेल्या अधिकाऱ्यांच्या कार्यकाळानुसार हया रक्कमा संबंधीत कंत्राटदारास धनादेशाव्दारे देण्यात आल्या.

| अ.क्र | अधिकाऱ्यांचे नांव | कार्यकाळ | जिल्हा निधीत जमा न झालेली रक्कम |
|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) |
| १ | श्री.बी.जी.सोमवंशी | दि.१४/७/२००८ ते ०६/०८/२०१२ | |
| | उप मु.का.अ.(सा) | दि. ०१/०६/२०१३ ते १०/०६/२०१३ | |
| | | दि.११/०७/२०१३ ते ०१/०९/२०१३ | २०,०८,७४६/- |
| २ | श्री.पी.डब्ल्यु.दिवाण | दि. ०६/०८/२०१२ ते २७/०५/२०१३ | |
| | | दि.११/०६/२०१३ ते ०९/०७/२०१३ | |
| | | दि.०३/०५/२०१४ ते ०७/०८/२०१४ | ४०,५२,६१०/- |
| ३ | श्री.ए.पी.मोहोड, | दि. ०२/०९/२०१३ ते ०२/०५/२०१४ | ६,८४,४७५/- |
| | उप मु.का.अ. (सा.) प्रभारी | | |
| | | एकूण वसूलपात्र रक्कम | ६७,४५,८३१/- |

उपरोक्त उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य) यांचे कार्यकाळात मुद्रणालय व भरती प्रक्रियेवर करण्यात आलेला खर्च

१. श्री. बी.जी.सोमवंशी यांचे कार्यकाळात रु. ८६,९१,०६२/-

२. श्री.डी.डब्ल्यु.दिवाण यांचे कार्यकाळात रु. १,६७,१७,४३३/-

३. श्री.ए.पी.मोहोड यांचे कार्यकाळात रु. २३,७९,९७६/- सविस्तर तपशील सोबत जोडला आहे. ज्या पध्दतीने श्री. बी. जी. सोमवंशी उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य) यांनी कार्य पार पाडले त्याच पध्दतीने उपरोक्त दर्शविलेल्या अधिका-यांनी कामकाज पार पाडले.

उपरोक्त खात्यातून आजपावेता करोडो रुपयांचे व्यवहार नियमबाह्य करण्यात आल्याचे दिसून आले. ही रक्कम जिल्हा परिषदेच्या लेख्या बाहेर ठेवण्यात आली. महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, शासन परिपत्रक क्रमांक संकीर्ण १००९/ प्र.क्र.६६/कोषा प्र.५, दिनांक १५ जानेवारी, २०१० नुसार शासकीय पैसा शासकीय लेख्या बाहेर ठेवण्यात प्रतिबंध करण्यात आला आहे.

चौकशी समितीने सत्यता पडताळणी करीता अर्धसमास क्रमांक ११, दिनांक ११/०७/२०१५ नुसार चौकशी कालावधीत कार्यरत श्री.के.एम.अहमद, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य) यांना लेखी स्वरुपात विचारणा केली असता त्यांनी सदर खाते असल्याबाबत आम्हाला चौकशी सुरु झाल्यानंतर व अर्धसमास प्राप्त झाल्यावरच माहीत झाले असे लेखी उत्तर दिले आहे.

श्री.बी.जी.सोमवंशी, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य) हे जिल्हा परिषदेच्या अतिशय महत्वाच्या पदावर काम करणारे जबाबदार अधिकारी होते त्यांना सर्व नियमांची जाणीव असतांना अशा जेष्ठ अधिका-याकडून जिल्हा परिषदेची फसवणूक करण्याचे कृत्य घडणे ही अत्यंत प्रशासनाच्या दृष्टिने घातक व अशोभनीय बाब आहे.

दुसरे खाते उघडल्यानंतर त्याचे लेखांकन पध्दतीनुसार पहिल्या खात्याप्रमाणे सर्व अभिलेख ठेवावयास पाहीजे होते परंतु या खात्याचे कोणतेच अभिलेख न ठेवता केलेला व्यवहार हा संशयास्पद असल्याचे समितीचे मत आहे. श्री.बी.जी.सोमवंशी, तत्कालीन उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य) व श्री. संजय गो.गीरी (निलंबित) क.सहा.तथा व्यवस्थापक, जि.प. मुद्रणालय जबाबदार ठरतात असे समितीचे मत आहे.

जर अशा पध्दतीचा चुकीचा व्यवहार श्री.बी.जी.सोमवंशी, तत्कालीन उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य) यांनी केला नसता तर पुढील प्रभार घेणा-या अधिका-यांनी चुकीच्या पध्दतीने काम केले नसते, कारण जेव्हा कोणताही राजपत्रीत दर्जाचा अधिकारी प्रभार स्विकारतो तेव्हा प्रभार हा संपूर्ण दिला जात नसून फक्त कार्यभार हस्तांतरण प्रमाणपत्रावर (CTC) वर स्वाक्षरी करुन प्रभार स्विकारला जातो. त्यामुळे मागे काय झाले याची एकदम प्रभार घेणा-या अधिका-यास जाणीव होत नाही. त्यामुळेच असे प्रकार घडतात.

अलाहाबाद बँक शाखा, राठी नगर, अमरावती खाते क्रमांक ५००८०३४९८१७ रु.२,०२,२१०/-एवढी रक्कम बँक खात्यात शिल्लक आहे. या खात्यातील शिल्लक रक्कम जिल्हा निधीत जमा करुन हे खाते त्वरीत बंद करण्यात यावे.

उपरोक्त मुद्दा क्रमांक १ ते ७ पर्यंत एकूण मुद्देनिहाय जिल्हा परिषदांना घेणे असलेल्या रक्कमांचा तपशील खालीलप्रमाणे आहे.—

| | |
|---|---|
| मुद्दा क्र .१ | रु. ५८७४/- |
| मुद्दा क्र. २ | रु. ५२,५०,५५६/- |
| मुद्दा क्र. ३ | रु. २२,९२४/- |
| मुद्दा क्र. ७ ब | रु. ६७,४५,८३१/- |
| एकूण रक्कम | रु. १,२०,२५,१८५/- |

(पहा परिशिष्ट अ पान क्र. २० ते ३९)

पान क्रमांक ०१ ते १२ पर्यंत एकूण मुद्दा क्रमांक १ ते ७ च्या संपुर्ण अहवाल परिशिष्ट अ मधील महत्वाच्या कागदपत्रांसह पुढील कार्यवाही करीता सादर करण्यात येत आहे.

## विभागीय सचिवांची साक्ष

पंचायती राज समितीने अमरावती जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्यावर अधिक माहिती घेण्यासाठी समितीने दिनांक ४ ऑक्टोबर, २०१७ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की, शासनाकडून जिल्हा परिषदेला प्राप्त झालेली रक्कम स्वत:च्या नावावर ठेवायची नसते असे असतानाही सर्वश्री सोमवंशी, बी.डब्ल्यू दिवाण व एस.पी.मोहोड या अधिका-यांनी एकूण रुपये ६७,४५,८३१/- इतकी रक्कम स्वत:च्या नावावर ठेवल्याचे निदर्शनास आले आहे. या प्रकरणी संबंधितांकडून रक्कम रु. १,२५,२५,१२०/- तातडीने वसूल करणे गरजेचे असून या प्रकरणी सखोल चौकशी करुन संबंधितांविरुध्द तातडीने कार्यवाही करण्याचे व याबाबतचा अहवाल सादर करण्याचे निर्देश समितीने दिले आहेत, त्यानुसार चौकशी केली काय, असल्यास त्यात काय निष्पन्न झाले व त्यानुसार दोषींवर कोणती कारवाई केली आहे, शासनाकडून प्राप्त झालेला निधी जिल्हा परिषदेच्या खात्यामध्ये जमा होतो. कोणत्याही कामास प्रशासकीय मंजुरी देण्याचे अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी यांना असतात. काम पूर्ण झाल्यानंतर खाते प्रमुख कामाचे देयक सादर करतात व त्यास मुख्य कार्यकारी अधिकारी यांची मंजुरी मिळाल्यानंतर ते देयक मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांच्याकडे जाते. त्यांची मंजुरी मिळाल्यानंतर देयकाची रक्कम संबंधित खाते प्रमुखांकडे वर्ग केली जाते असे असताना खाते प्रमुखांनी ते पैसे स्वत:च्या खात्यामध्ये कसे ठेवले. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अमरावती यांनी समितीस विदित केले की, हे ट्रेझरीचे पैसे नाहीत. जिल्हापरिषद मुद्रणालयाचे पैसे आहेत. चौकशीत असे आढळून आले की, हे पैसे उप मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या खात्यावर जमा होते. या प्रकरणामध्ये सर्वश्री सोमवंशी, मोहोड आणि दिवाण हे प्राथमिकदृष्टया जबाबदार असल्याचे दिसून आले. त्यापैकी श्री. सोमवंशी यांचे निधन झालेले आहे.

समितीने पुढे अशी विचारणा केली की, शासनाकडून जिल्हा परिषदेला प्राप्त झालेली रक्कम स्वतःच्या नावावर ठेवायची नसते असे असतानाही श्री.सोमवंशी, श्री. बी.डब्ल्यु दिवाण व श्री. एस.पी.मोहोड या अधिका-यांनी एकूण रु. ६७,४५,८३१/- इतकी रक्कम स्वतःच्या नावावर ठेवल्याचे निदर्शनास आले आहे. या प्रकरणी संबंधितांकडून रक्कम रु. १,२५,२५,१२०/- तातडीने वसूल करणे गरजेचे असून या प्रकरणी सखोल चौकशी करुन संबंधितांविरुध्द तातडीने कारवाई करण्याचे व याबाबतचा अहवाल सादर करण्याचे निर्देश समितीने दिले होते. त्यानुसार चौकशी केली आहे काय, असल्यास त्यात काय निष्पन्न झाले व त्यानुसार दोषींवर कोणती कारवाई केली आहे, यावर मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अमरावती यांनी समितीस विदित केले की, श्री.सोमवंशी व श्री. एस.पी.मोहोड यांच्यावर एफ.आय.आर दाखल करण्यात आलेला आहे. त्याप्रमाणे त्यांचे विभागीय चौकशीचे प्रकरण देखील सादर करण्यात आलेले आहे.

समितीने पुढे अशी विचारणा केली की, जिल्हा परिषदेच्या खात्यावर पैसे न ठेवता वैयक्तिक खात्यावर पैसे ठेवता येतात का, त्यांना खाते उघडण्यास कोणी मंजुरी दिली होती, अमरावती जिल्हा परिषदेचे उत्पन्न हे इतर जिल्हा परिषदांच्या तुलनेत सर्वाधिक आहे. सदर अधिका-यांना खाते उघडण्यासाठी कोणी परवानगी दिली होती, यावर सचिव, ग्रामविकास विभाग यांनी समितीस विदित केले की, त्यावेळी इनचार्ज म्हणून उपमुख्य कार्यकारी अधिकारी असतील. यावर समितीने पुढे विचारणा केली की, जिल्हा परिषदेने त्यांना स्वतःचे खाते उघडण्याची परवानगी दिली होती का, यावर मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अमरावती यांनी समितीस विदित केले की, नाही अशी परवानगी दिली नव्हती. या प्रकरणी जे कोणी दोषी असतील त्यांच्यावर कारवाई करणे अपेक्षित आहे. मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे काम हेच आहे की, आपल्या कनिष्ठ अधिका-यांचे पर्यवेक्षण करणे. यावर सचिव, ग्रामविकास विभाग यांनी समितीस विदित केले की, याबाबत समितीस एक उदाहरण सांगु इच्छितो की, आपण पोलीस ठाण्यांची निर्मिती गुन्हे घडू नये यासाठी करतो, परंतु गुन्हे घडले म्हणून संबंधित क्षेत्रातील पोलीस अधिकारी किंवा कर्मचारी यांना दोषी धरत नाही. त्याप्रमाणेच हे प्रकरण आहे.

समितीने असे मत व्यक्त केले की, हा विषय अतिशय गंभीर आहे. जिल्हा परिषदेच्या सर्वसाधारण सभेपुढे देखील हा विषय आलेला नसणार. जिल्हा परिषदेच्या अर्थसंकल्पावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांची स्वाक्षरी असते व त्यामध्ये जिल्हा परिषदेच्या उत्पन्नाच्या साधनांचा उल्लेख केलेला असतो. यावर समितीने अशी विचारणा केली की, समितीला तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी यांची नावे सांगावीत. हा विषय अत्यंत गंभीर व कारवाईस पात्र असा आहे. याबाबत सर्व सूचना दिल्यानंतर, सर्व गोष्टी माहिती झाल्यानंतर अजूनपर्यंत आयुक्तांचा अहवाल अप्राप्त कसा राहतो तसेच इतर काही बाबी देखील प्रलंबित कशा राहिल्या, समितीने तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे नाव विचारले. याप्रकरणी एवढी मोठी अनियमितता असूनही अहवाल अप्राप्त आहे. तसेच दिली जात असलेली कारणे संयुक्तिक नाहीत. ही कारवाई तात्काळ करणे आवश्यक आहे. सचिवांकडून झालेल्या कारवाई व अहवालाबद्दल समितीस माहिती देतील असे अपेक्षित होते. यावर सचिव, ग्रामविकास विभाग यांनी समितीस विदित केले की, यामध्ये एफ.आय.आर. दाखल केला आहे व विभागीय चौकशी देखील सुरु होणे आवश्यक होते. पुढील १५ दिवसांमध्ये विभागीय चौकशी सुरु करण्यात येईल. यासाठी कमीत कमी सहा महिन्यांचा कालावधी लागेल. कोणत्याही विभागीय चौकशीला साधारणतः तेवढा वेळ लागतो. यावर समितीने असे निदेश दिले की, याबाबत तात्काळ कार्यवाही करुन दोषींवर कारवाई करावी.

## अभिप्राय व शिफारशी

पंचायती राज समितीने दिनांक ५ ते ७ नोव्हेंबर, २०१५ या कालावधीत अमरावती जिल्हा परिषदेस भेट दिली. भेटीच्या वेळी सन २०१२-१३ या वर्षाच्या वार्षिक प्रशासन अहवालावरील चर्चेदरम्यान समितीला आढळून आले की, जिल्हा परिषदेच्या छापखान्याच्या प्रभारी उप मुख्य अधिकाऱ्यांनी छापखान्याची रक्कम स्वतःच्या नावावर बँकेत खाते उघडून ठेवली. शासनाकडून जिल्हा परिषदेला प्राप्त झालेली रक्कम स्वतःच्या नावावर ठेवायची नसते असे असतानाही सर्वश्री सोमवंशी, बी.डब्ल्यु. दिवाण व एस.पी.मोहोड या अधिका-यांनी एकूण रुपये ६७,४५,८३१/- इतकी रक्कम स्वतःच्या नावावर ठेवल्याचे निदर्शनास आले आहे. या प्रकरणी संबंधितांकडून रक्कम रुपये १,२५,२५,१२०/- तातडीने वसूल करणे गरजेचे असून या प्रकरणी सखोल चौकशी करुन संबंधितांविरुध्द तातडीने कार्यवाही करण्याचे व याबाबतचा अहवाल सादर करण्याचे निर्देश समितीने दिले.

समितीच्या निदेशानुसार प्रस्तुत प्रकरणात चौकशी करण्यात येवून त्याबाबतचा अहवाल प्राप्त झाला आहे. सदर प्रकरणातील श्री.बी.डब्ल्यु. दिवाण हे मयत झाले असून श्री.ए.पी.मोहोड, तत्का.उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य) जिल्हा परिषद, अमरावती या अधिका-यांविरुध्दचा विभागीय चौकशीचा प्रस्ताव विभागीय आयुक्त, अमरावती यांचेकडून शासनास अद्याप प्राप्त झाला नाही, तसेच श्री. सोमवंशी हे दिनांक ३०.४.२०१४ रोजी नियत वयोमानानुसार शासन सेवेतून सेवा निवृत्त झाले असल्याने महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम १९७९ मधील नियम २७ (२) (बी) (दोन) मधील तरतुदीनुसार त्यांचेविरुध्द सन २००८ ते २०१२ मधील दोषारोपबाबत शिस्तभंगाची कार्यवाही करता येत नसल्याने त्यांचे विरुध्दचे सन २०१३ मधील दोषारोप विचारात घेवून विभागीय चौकशीचा सुधारित प्रस्ताव सादर करणेबाबत विभागीय आयुक्त, अमरावती यांना शासनाने कळवून देखील आयुक्त कार्यालयाकडून असा प्रस्ताव शासनास अद्याप प्राप्त झाला नसल्याबाबत समिती आश्चर्य व्यक्त करते.

प्रस्तुत प्रकरणी अमरावती पोलीसांकडे श्री.सोमवंशी व श्री.मोहोड यांच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. परंतु सदरहू प्रकरणी न्यायालयात सद्य:स्थिती काय आहे याबाबत काही माहिती समितीस प्राप्त होऊ शकली नाही. जिल्हा परिषदेचा कोट्यवधी रुपयांच्या निधीचा उघड उघड अपहार झालेला असूनही ५-५ वर्ष अपचारी कर्मचाऱ्यांवर कोणतीही कारवाई होत नाही. अपचारी कर्मचारी नियमित सेवा बजावून नियत वयोमानानुसार निवृत्त होतो किंवा सुखनैव सेवानिवृत्ती चे लाभ भोगून मरण पावतो परंतु विभागीय आयुक्त व मंत्रालयीन स्तरावरुन तातडीने कोणतीही कारवाई होत नाही. **परिणामी गैरव्यवहारांचे प्रमाण राज्यात वाढीला लागले आहे. अशा गैरव्यवहारांना वेळीच रोखणे आवश्यक आहे त्याकरीता इतर अधिकाऱ्यांमध्ये सुप्रशासना विषयी जरब निर्माण करण्याकरीता श्री. सोमवंशी व श्री. मोहोड यांसारख्या अधिकाऱ्यांची प्रस्तावित विभागीय चौकशी विभागीय सचिवांनी आश्वासित केल्याप्रमाणे कमीत कमी ६ महिन्यांच्या कालावधीत पूर्ण करुन दोषींवर कारवाई करावी व केलेल्या कारवाईची माहिती समितीस तीन महिन्यांत पाठवावी अशी समितीची शिफारस आहे.**

-----------------

# परिशिष्ट " अ "

## शासनाचे आदेश व परिपत्रके

(परिशिष्ट १.१)

पंडीत दीनदयाळ उपाध्याय घरकुल जागा
खरेदी अर्थसहाय योजना सुरु करण्याबाबत

महाराष्ट्र शासन
ग्राम विकास विभाग
शासन निर्णय क्रमांकः इंआयो-२०१५/प्र.क्र.२००/योजना-१०
बांधकाम भवन, २५ मर्झबान रोड,
फोर्ट, मुंबई- ४०० ००१
तारीख: ३० डिसेंबर, २०१५

प्रस्तावना §

इंदिरा आवास योजना १९८९ पासून डिसेंबर, १९९५ अखेरपर्यंत जवाहर रोजगार योजनेची उपयोजना म्हणून राबविली जात होती. त्यानंतर दि.१.१.१९९६ पासून ही योजना स्वतंत्रपणे केंद्र पुरस्कृत योजना म्हणून राबविण्यात येत आहे. ग्राम विकास विभागाच्या अधिपत्याखालील जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेमार्फत या योजनेची प्रभावी अंमलबजावणी करण्यात येत आहे.

इंदिरा आवास योजनेचा एक भाग म्हणून ग्रामीण भागातील दारिद्रय रेषेखालील बेघरांपैकी ज्यांना स्वत:ची जागा नाही अशा कुटूंबाकरिता जागा उपलब्ध करून देण्यासंदर्भातील योजनेस केंद्र शासनाने सन २०१०-११ पासून मान्यता दिली आहे. ही योजना केंद्र पुरस्कृत असून त्यामध्ये केंद्र व राज्य हिस्सा ५०:५० % असा आहे. सन २०१३-१४ या वर्षापासून या योजनेतंर्गत घरकुलाच्या जागेसाठी प्रत्येक लाभार्थ्यास जागा खरेदी करण्यासाठी रू.२०,०००/- (केंद्र रू.१०,०००/- व राज्य रू.१०,०००/-) अनुज्ञेय आहे. लाभार्थ्यास जागा खरेदीसाठी रू.२०,०००/- अथवा प्रत्यक्ष खर्चाची रक्कम यापैकी जी कमी असेल एवढे आर्थिक सहाय्य देण्यात येते. तथापि, सद्यस्थितीत राज्यातील ग्रामीण भागातील जागेचे दर विचारात घेता रू.२०,०००/- मध्ये घरकुलासाठी जागा खरेदी करण्यास अपेक्षित प्रतिसाद मिळालेला नाही. त्यामुळे प्रत्यक्षात या योजनेचा लाभ घेणाऱ्या लाभार्थ्यांची संख्या नगण्य आहे. जागे अभावी इंदिरा आवास योजनेचा लाभ मिळण्यापासून वंचित असलेल्या लाभार्थ्यांची संख्या दोन लाखाच्या वर आहे.

त्यामुळे केंद्र पुरस्कृत इंदिरा आवास योजनेच्या निधीचा राज्य शासनास पूर्ण क्षमतेने उपयोग करून घेता येत नाही.

त्याचप्रमाणे सामाजिक न्याय विभागाची रमाई आवास योजना, आदिवासी विकास विभागाची शबरी आवास योजना ह्या राज्य पुरस्कृत योजनेमध्ये देखील मोठया प्रमाणात पात्र लाभार्थी केवळ जागा अभावी घरकुल योजनेचा लाभ देता येणे शक्य होत नाही.

ग्रामीण घरकुल योजनेतील लाभार्थ्यांकडे घरकुलासाठी जागा नाही असे लाभार्थी सार्वजनिक क्षेत्र किंवा नातेवाईक, मित्रमंडळ यांच्या घरात आसरा घेतात परंतु जागेची मालकी त्यांच्या नावावर नसते. या बाबी विचारात घेऊन घरकुल बांधकामासाठी स्वत:ची जागा नसलेल्या दारिद्रय रेषेखालील कुटूंबांना जागा खरेदीसाठी अतिरिक्त अर्थसहाय उपलब्ध व्हावे यासाठी घरकूल जागा खरेदी अर्थसहाय्य योजना सुरु करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय§

केंद्र पुरस्कृत इंदिरा आवास योजना व राज्य पुरस्कृत अन्य योजनेतील दारिद्रय रेषेखालील घरकुल पात्र लाभार्थी केवळ जागे अभावी घरकुलाच्या लाभ मिळण्यापासून वंचित आहेत, ही बाब विचारात घेता सन २०१५-१६ पासून दारिद्रय रेषेखालील भूमिहीन बेघर कुटूंबांना घरकुल बांधकामास जागा खरेदी करण्यासाठी "पंडीत दीनदयाळ उपाध्याय घरकूल जागा खरेदी अर्थसहाय्य योजना" या नावाने योजनेस मान्यता देण्यात येत आहे. ही योजना इंदिरा आवास योजना, रमाई आवास योजना व शबरी आवास योजना या योजनेतील दारिद्रय रेषेखालील घरकुल पात्र परंतु घरकुल बांधकामासाठी जागा उपलब्ध नसलेल्या लाभधारकांना लागू राहील.

केंद्र पुरस्कृत इंदिरा आवास योजनेतील दारिद्रय रेषेखालील भूमिहीन कुटुंबांना जागा खरेदी करण्यासाठी केंद्र शासनामार्फत रू.१०,०००/- व या योजनेअंतर्गत रू.४०,०००/- असे एकूण रू.५०,०००/- पर्यंत अर्थसहाय्य उपलब्ध करून देण्यात येईल.

रमाई आवास योजना व शबरी आवास योजना या राज्य पुरस्कृत घरकुल योजनेतील दारिद्रय रेषेखालील घरकुल पात्र भूमिहीन कुटुंबांना जागा खरेदी करण्यासाठी या योजनेअंतर्गत रू.५०,०००/- पर्यंत अर्थसहाय्य उपलब्ध करून देण्यात येईल.

"पंडीत दीनदयाळ उपाध्याय घरकूल जागा खरेदी अर्थसहाय्य योजना"ही दारिद्रय रेषेवरील (APL) लाभधारकांसाठी लागू राहणार नाही.

<u>जागेची उपलब्धता</u>

(अ) इंदिरा आवास योजनेअंतर्गत २० चौ.मी. घरकुलाचे बांधकाम करण्याच्या सूचना आहेत. या व्यतिरिक्त शौचालय व घरकुलाच्या सभोतालची जागा गृहीत धरल्यास साधारणपणे ५०० चौ.फूट जागेमध्ये घरकुलाचे बांधकाम करणे शक्य आहे. त्यानुसार घरकुल बांधकामासाठी ५०० चौ.फूटापर्यंत जागा प्रति लाभार्थी खरेदी करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

(ब) मोठया ग्रामपंचायती तसेच शहरा शेजारील ग्रामपंचायतीमध्ये जागेचे जास्त दर व जागेची कमी उपलब्धता विचारात घेता, ५०० चौ.फूटापर्यंत जागेत स्थानिक प्राधिकरणाच्या बांधकामाच्या नियमावलीनुसार दोन किंवा तीन लाभार्थ्यांच्या संमतीने दोन मजली (G+१) किंवा तीन मजली (G+२) इमारत बांधण्यासाठी प्रति लाभार्थी रू.५०,०००/- पर्यंत अर्थसहाय्य जागा खरेदीसाठी अदा करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

वरील (अ) व (ब) मध्ये प्रत्यक्ष जागेचे क्षेत्रफळ हे प्रति लाभार्थी ५०० चौ.फूटापर्यंत असल्यामुळे जागेची किंमत व रू.५०,०००/- यापेक्षा जे कमी असेल तेवढे अर्थसहाय लाभार्थ्यांस देण्यात येईल. जागेची किंमत रू.५०,०००/- पेक्षा जास्त असल्यास व त्यावरील रक्कम लाभार्थी स्वत: देण्यास तयार असल्यास त्यास या योजनेचा लाभ देण्यात येईल.

इंदिरा आवास योजनेच्या धर्तीवर या योजनेअंतर्गत दारिद्रय रेषेखालील भूमिहीन बेघर लाभार्थ्यांना जागा खरेदी करण्यासाठी अनुदान देण्याकरिता सर्व साधारण प्रवर्गाकरिता ग्राम विकास विभागाच्या नियतव्ययातून, अनुसूचित जाती प्रवर्गाकरिता सामाजिक न्याय विभागाच्या विशेष घटक

योजनेतून व अनुसूचित जमाती प्रवर्गाकरिता आदिवासी विकास विभागाच्या जन जाती क्षेत्र उपयोजना व जन जाती क्षेत्राबाहेरील उपयोजनेअंतर्गत निधी उपलब्ध करून देण्यात येईल. राज्यातील सर्व ग्रामीण घरकुल योजना या विभागाच्या अधिपत्याखालील जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणामार्फत राबविण्यात येत असल्याने अशा सर्व योजनांचे नियंत्रणाचे काम ग्राम विकास विभाग नोडल विभाग म्हणून काम करेल.

घरकुल बांधकामासाठी स्वतःची जागा नसलेल्या इंदिरा आवास योजना, रमाई आवास योजना व शबरी आवास योजनेतील दारिद्रय रेषेखालील भूमिहीन बेघर कुटूंबांना जागा उपलब्ध करून देण्यासाठी खालीलप्रमाणे समिती गठीत करण्यात येत आहे-

| | |
|---|---|
| गट विकास अधिकारी | अध्यक्ष |
| नायब तहसिलदार | सदस्य |
| उप अभियंता | सदस्य |
| तालुका निरीक्षक, भूमि अभिलेख | निमंत्रक |
| उप निबंधक (नोंदणी) | निमंत्रक |
| City Survey officer | निमंत्रक |
| सहायक प्रकल्प अधिकारी (एकात्मिक आदिवासी प्रकल्प कार्यालय) | निमंत्रक |
| विस्तार अधिकारी (समाज कल्याण) | निमंत्रक |
| विस्तार अधिकारी (पंचायत) | सदस्य सचिव |

**सदर समितीची कार्यकक्षा खालीलप्रमाणे असेल-**

| | |
|---|---|
| अ | जागा हस्तांतरण योग्य असल्याबाबत खात्री करणे. |
| ब | जागेचे दर प्रचलित कार्यपध्दतीचा अवलंब करून निश्चित करणे. |
| क | लाभार्थ्यांच्या नावे खरेदी प्रक्रिया पार पाडण्यासाठी समन्वय साधणे. |
| ड | लाभार्थ्यास रू.५०,०००/- च्या मर्यादेत म्हणजेच जागेची प्रत्यक्ष किंमत व रू.५०,०००/- यापेक्षा जे कमी असेल त्याप्रमाणे मोबदला उपलब्ध करून देणे. यामध्ये स्टॅम्प डयूटी व जागा हस्तांतरणासाठी नियमाप्रमाणे येणारा खर्च समाविष्ट असेल. |
| इ | खरेदी केलेल्या जागेची ग्रामपंचायत दप्तरी व सक्षम प्राधिकरणाकडे नोंद घेणे. |

जागेची निवड- जागेची निवड करतांना पुढील बाबी विचारात घेण्यात याव्यात-

| | |
|---|---|
| १ | ग्रामपंचायत अंतर्गत गावठाण हद्दीत येणारी जागा व गावठाण हद्दीबाहेरील अकृषक निवासी प्रयोजनासाठी सक्षम नियोजन प्राधिकरणाने मंजूरी दिलेल्या जागा |
| २ | जागा निवडतांना समितीने आवश्यक त्या सर्व सोयी-सुविधा उदा. पाणी पुरवठा, रस्ता, सार्वजनिक सुविधा उपलब्ध असल्याबाबत खात्री करावी. |
| ३ | निवडलेल्या जागेस लाभार्थ्यांची सहमती असावी. |

जागा खरेदी प्रक्रिया

| | |
|---|---|
| १ | लाभार्थ्याने जागेची निवड केल्यानंतर जागा हस्तांतरण योग्य व जागेची किंमत याची शहानिशा समिती करेल. |
| २ | लाभार्थी जागा मालका बरोबर विक्री करार (Agreement to sale) करेल. |
| ३ | वरील बाबींची पूर्तता झाल्यावर जागेचा देय निधी लाभार्थ्यांच्या बँक/पोस्ट खात्यामध्ये जमा करण्यास समिती मान्यता देईल. |
| ४ | जागेसाठी देय निधी लाभार्थ्यांच्या बँक/पोस्ट खात्यामध्ये जमा करण्यापूर्वी लाभार्थ्यांकडून प्रतिज्ञापत्र प्राप्त करून घेण्यात येईल |
| ५ | समिती जागेची प्रत्यक्ष खरेदी करतांना समन्वय करेल. |
| ६ | लाभार्थी जागेची किंमत जागा मालकास अदा करेल व प्रत्यक्ष खरेदी प्रक्रिया (Sale deed) पार पाडेल. |
| ७ | खरेदीनंतर लाभार्थ्यांच्या नावे सदर जागेची नोंद ग्रामपंचायत, City Survey व इतर सक्षम प्राधिकणाकडे समितीमार्फत केली जाईल. जागेची नोंद प्राधान्याने लाभधारकाच्या पत्नीच्या नावे किंवा सयुक्त नावाने घेण्यात येईल. |
| ८ | जागा खरेदीची प्रक्रिया पूर्ण केल्यानंतर ग्रामसभेपुढे अवलोकनार्थ ठेवण्यात येईल. |

जागा लाभार्थ्यांच्या नावावर हस्तांतरीत झाल्यानंतर व सक्षम प्राधिकरणाची बांधकामास मान्यता घेतल्यानंतर लाभार्थ्यास घरकुल बांधकामाचे अनुदान योजनेच्या निकषाप्रमाणे एक महिन्यात मंजूर करण्यात यावे.

निधीचे व्यवस्थापन

"पंडीत दीनदयाळ उपाध्याय घरकूल जागा खरेदी अर्थसहाय्य योजना" ही योजना सर्व घरकुल योजनेतील दारिद्रय रेषेखालील पात्र लाभार्थ्यांसाठी असली तरी संबंधित प्रशासकीय विभागाकडून त्या-त्या वित्तीय वर्षात उपलब्ध होणाऱ्या निधीच्या मर्यादेत लाभार्थ्यांची संख्या निश्चित करण्यात येईल.

या योजनेअंतर्गत राज्य शासनाकडील निधी संबंधित विभागाकडून "राज्य व्यवस्थापन कक्ष-इंदिरा आवास योजना" यांचे अधिनस्त स्वतंत्र बँक खात्यात जमा केला जाईल. जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रस्ताव विचारात घेऊन या बँक खात्यातून निधी जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेकडे स्वतंत्र बँक खात्यात वर्ग करण्यात येईल. जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, सदरचा निधी लाभार्थ्यांना अदा करण्यासाठी गट विकास अधिकारी यांचेकडे जागा खरेदीसाठी आवश्यकतेप्रमाणे सुपूर्द करतील. जागा खरेदी योजनेअंतर्गत केंद्र शासनाकडून केंद्र हिस्साची रू.१०,०००/- ची प्रतिपुर्ती (Reimbursement) प्राप्त करुन घेण्यासाठी "राज्य व्यवस्थापन कक्ष-इंदिरा आवास योजना" यांचेकडून केंद्र शासनास प्रस्ताव सादर करण्यात येईल.

राज्यातील ग्रामीण गृहनिर्माण योजनांचे राज्यस्तरावरील समन्वयन करण्यासाठी ग्राम विकास विभाग समन्वय विभाग म्हणून काम करेल.

"पंडीत दीनदयाळ उपाध्याय घरकुल जागा खरेदी अर्थसहाय्य योजना" कार्यान्वयन (Operational Guidelines) सबंधिच्या मार्गदर्शन सूचना सविस्तरपणे निर्गमित करण्यात येतील.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१५१२२३११३३०८३८२० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

(वि.गिरीराज)
प्रधान सचिव, ग्राम विकास

प्रत,

१) मा.राज्यपाल यांचे सचिव
२) मा.मुख्यमंत्री यांचे सचिव

३) मा.मंत्री (ग्राम विकास) यांचे स्वीय सहायक
४) मा.राज्यमंत्री (ग्राम विकास) यांचे स्वीय सहायक
५) मा.मुख्य सचिव यांचे सह सचिव
६) अपर मुख्य सचिव/ प्रधान सचिव /सचिव, नियोजन/वित्त/सामाजिक न्याय/ आदिवासी विकास/ गृहनिर्माण विभाग/पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग
७) महालेखापाल, (लेखा परिक्षा) व (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-१, मुंबई (पाच प्रतींसह)
८) महालेखापाल, (लेखा परिक्षा) व (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-२, नागपूर (पाच प्रतींसह)
९) सर्व विभागीय आयुक्त
१०) आयुक्त, महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना, नागपूर
११) सर्व जिल्हाधिकारी
१२) सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद तथा अध्यक्ष, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा
१३) सर्व उप आयुक्त (विकास), विभागीय आयुक्त कार्यालय
१४) संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-इंदिरा आवास योजना, सिडको भवन (दक्षिण कक्ष), सी.बी.डी.बेलापूर, नवी मुंबई.
१५) सर्व प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा
१६) जिल्हा कोषागार अधिकारी, ठाणे
१७) उप कोषागार अधिकारी, बेलापूर, नवी मुंबई.
१८) वित्त विभाग (व्यय-१५) व ( अर्थ-१७) मंत्रालय मुंबई-३२.
१९) नियोजन विभाग (१४८१/१४४४), मंत्रालय, मुंबई-३२
२०) अप्पर संचालक, प्रकल्प आखणी व एकात्मीक ग्रामीण विकास कार्यक्रम कक्ष,
२१) कार्यासन अधिकारी, वित्त-७, वित्त-१, योजना-१, योजना-२, योजना-५ व योजना-७, ग्राम विकास व जलसंधारण विभाग.
२२) निवड नस्ती.

परिशिष्ट १.२

पंडीत दीनदयाळ उपाध्याय घरकुल जागा
खरेदी अर्थसहाय योजना सुरू करण्याबाबत

महाराष्ट्र शासन
ग्राम विकास विभाग
शासन निर्णय क्रमांकः प्रआयो-२०१७/प्र.क्र.६०/योजना-१०
बांधकाम भवन, २५ मर्झबान रोड,
फोर्ट, मुंबई- ४०० ००१
तारीख: १४ जुलै, २०१७.

वाचा :- (१) शासन निर्णय, ग्राम विकास व जलसंधारण विभाग क्र.इंआयो-२०१५/प्र.क्र.२००/योजना-१०, दिनांक ३० डिसेंबर, २०१५.
(२) शासन निर्णय, ग्राम विकास व जलसंधारण विभाग क्र.पीएमएवाय-जी-२०१६/प्र.क्र.३३३/योजना-१० दिनांक १४ ऑक्टोबर, २०१६.

प्रस्तावना-

केंद्र शासनाने इंदिरा आवास योजनेचे स्वरूप बदलून प्रधान मंत्री आवास योजना (ग्रामीण) सुरू करण्याचा निर्णय घेतला. त्या अनुषंगाने सदरची योजना राज्यात राबविण्याचा निर्णय संदर्भाधीन क्र.२ येथील शासन निर्णयान्वये घेण्यात आला आहे. इंदिरा आवास योजना ऐवजी प्रधान मंत्री आवास योजना (ग्रामीण) असा नावात झालेला बदल, बदलेले लाभार्थी निवडीचे निकष, जागा उपलब्ध करून देण्याच्या योजनेत झालेले बदल तसेच राज्य शासनाच्या विविध विभागांच्या घरकुल योजनांचे बदलेले निकष यासर्व बाबी विचारात घेऊन "पंडीत दीनदयाळ उपाध्याय घरकूल जागा खरेदी अर्थसहाय्य योजना" च्या संदर्भाधीन क्रमांक १ येथील शासन निर्णय अधिक्रमित करून सुधारीत शासन निर्णय निर्गमित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय-

केंद्र पुरस्कृत प्रधान मंत्री आवास योजना-ग्रामीण व राज्य पुरस्कृत अन्य ग्रामीण घरकुल योजनेतील घरकुल पात्र लाभार्थी केवळ जागे अभावी घरकुलाच्या लाभ मिळण्यापासून वंचित आहेत, ही बाब विचारात घेऊन "पंडीत दीनदयाळ उपाध्याय घरकूल जागा खरेदी अर्थसहाय्य योजना" सुरू करण्यात आली आहे. ही योजना केंद्र पुरस्कृत प्रधान मंत्री आवास योजना (ग्रामीण) व राज्य पुरस्कृत

ग्रामीण घरकुल योजनेतील घरकुल पात्र परंतु घरकुल बांधकामासाठी जागा उपलब्ध नसलेल्या लाभधारकांना लागू राहील.

केंद्र पुरस्कृत प्रधान मंत्री आवास योजना (ग्रामीण) व राज्य पुरस्कृत ग्रामीण घरकुल योजनेतील घरकुल पात्र परंतु घरकुल बांधकामासाठी जागा उपलब्ध नसलेल्या कुटुंबांना जागा खरेदी करण्यासाठी रू.५०,०००/- पर्यंत अर्थसहाय्य उपलब्ध करून देण्यात येईल.

<u>जागेची उपलब्धता</u>

(अ) प्रधान मंत्री आवास योजना (ग्रामीण) अंतर्गत २५ चौ.मी. घरकुलाचे बांधकाम करण्याच्या सूचना आहेत. या व्यतिरिक्त इतर मुलभुत सुविधा यासाठी घरकुलाच्या सभोतालची जागा गृहीत धरल्यास साधारणपणे ५०० चौ.फूट जागेमध्ये घरकुलाचे बांधकाम करणे शक्य आहे. त्यानुसार घरकुल बांधकामासाठी ५०० चौ.फूटापर्यंत जागा प्रति लाभार्थी खरेदी करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

(ब) मोठया ग्रामपंचायती तसेच शहरा शेजारील ग्रामपंचायतीमध्ये जागेचे जास्त दर व जागेची कमी उपलब्धता विचारात घेता, ५०० चौ.फूटापर्यंत जागेत स्थानिक प्राधिकरणाच्या बांधकामाच्या नियमावलीनुसार दोन किंवा तीन लाभार्थ्यांच्या संमतीने दोन मजली (G+1) किंवा तीन मजली (G+२) इमारत बांधण्यासाठी प्रति लाभार्थी रू.५०,०००/- पर्यंत अर्थसहाय्य जागा खरेदीसाठी अदा करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

वरील (अ) व (ब) मध्ये जर प्रत्यक्ष जागेचे क्षेत्रफळ हे प्रति लाभार्थी ५०० चौ.फूटापर्यंत असल्यास प्रत्यक्ष जागेची किंमत किंवा रू.५०,०००/- यापैकी जे कमी असेल तेवढे अर्थसहाय लाभार्थ्यांस देण्यात येईल. जागेची किंमत रू.५०,०००/- पेक्षा जास्त असल्यास व त्यावरील रक्कम लाभार्थी स्वत: देण्यास तयार असल्यास त्यास या योजनेचा लाभ देण्यात येईल.

प्रधान मंत्री आवास योजना (ग्रामीण) अंतर्गत घरकुल पात्र परंतु घरकुल बांधकामासाठी जागा उपलब्ध नसलेल्या लाभार्थ्यांना जागा खरेदी करण्यासाठी अनुदान देण्याकरिता सर्व साधारण

प्रवर्गाकरिता ग्राम विकास विभागाच्या नियतव्ययातून, अनुसूचित जाती प्रवर्गाकरिता सामाजिक न्याय विभागाच्या विशेष घटक योजनेतून व अनुसूचित जमाती प्रवर्गाकरिता आदिवासी विकास विभागाच्या जन जाती क्षेत्र उपयोजना व जन जाती क्षेत्राबाहेरील उपयोजनेअंतर्गत निधी उपलब्ध करून देण्यात येईल. तसेच अन्य राज्य पुरस्कृत ग्रामीण घरकुल योजनेतील घरकुल पात्र परंतु घरकुल बांधकामासाठी जागा उपलब्ध नसलेल्या लाभार्थ्यांना संबंधित विभागाकडून निधी उपलब्ध करून देण्यात येईल. राज्यातील सर्व ग्रामीण घरकुल योजना या विभागाच्या अधिपत्याखालील जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणामार्फत राबविण्यात येत असल्याने अशा सर्व योजनांचे नियंत्रणाचे काम ग्राम विकास विभाग हा राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण या शिखर यंत्रणेमार्फत काम करेल.

घरकुल बांधकामासाठी स्वत:ची जागा नसलेल्या केंद्र पुरस्कृत प्रधान मंत्री आवास योजना (ग्रामीण) व अन्य राज्य पुरस्कृत ग्रामीण घरकुल योजनेतील घरकुल पात्र परंतु घरकुल बांधकामासाठी जागा उपलब्ध नसलेल्या लाभार्थ्यांना जागा उपलब्ध करून देण्यासाठी खालीलप्रमाणे समिती गठीत करण्यात येत आहे-

| | |
|---|---|
| गट विकास अधिकारी | अध्यक्ष |
| नायब तहसिलदार | सदस्य |
| उप अभियंता | सदस्य |
| तालुका निरीक्षक, भूमि अभिलेख | निमंत्रक |
| उप निबंधक (नोंदणी) | निमंत्रक |
| City Survey officer | निमंत्रक |
| सहायक प्रकल्प अधिकारी (एकात्मिक आदिवासी प्रकल्प कार्यालय) | निमंत्रक |
| विस्तार अधिकारी (समाज कल्याण) | निमंत्रक |
| विस्तार अधिकारी (पंचायत) | सदस्य सचिव |

**सदर समितीची कार्यकक्षा खालीलप्रमाणे असेल-**

| | |
|---|---|
| अ | जागा हस्तांतरण योग्य असल्याबाबत खात्री करणे. |
| ब | जागेचे दर प्रचलित कार्यपध्दतीचा अवलंब करून निश्चित करणे. |
| क | लाभार्थ्यांच्या नावे खरेदी प्रक्रिया पार पाडण्यासाठी समन्वय साधणे. |

| | |
|---|---|
| ड | लाभार्थ्यास रू.५०,०००/- च्या मर्यादेत म्हणजेच जागेची प्रत्यक्ष किंमत व रू.५०,०००/- यापेक्षा जे कमी असेल त्याप्रमाणे मोबदला उपलब्ध करून देणे. यामध्ये स्टॅम्प ड्यूटी व जागा हस्तांतरणासाठी नियमाप्रमाणे येणारा खर्च समाविष्ट असेल. |
| इ | खरेदी केलेल्या जागेची ग्रामपंचायत दप्तरी व सक्षम प्राधिकरणाकडे नोंद घेणे. |

जागेची उपलब्धता-

| | |
|---|---|
| १ | जिल्हाधिकारी वा शासनाकडून उपलब्ध झालेल्या शासकीय / संपादित जागा |
| २ | ग्रामपंचायत अंतर्गत गावठाण हद्दीत येणारी जागा व गावठाण हद्दीबाहेरील निवासी प्रयोजनासाठी सक्षम नियोजन प्राधिकरणाने मंजूरी दिलेल्या जागा |

जागेची निवड करतांना पुढील बाबी विचारात घेण्यात याव्यात-

| | |
|---|---|
| १ | जागा निवडतांना समितीने आवश्यक त्या सर्व सोयी-सुविधा उदा. पाणी पुरवठा, रस्ता, सार्वजनिक सुविधा उपलब्ध असल्याबाबत खात्री करावी. |
| २ | निवडलेल्या जागेस लाभार्थ्यांची सहमती असावी. |

जागा खरेदी प्रक्रिया

| | |
|---|---|
| १ | लाभार्थ्यांनी जागेची निवड केल्यानंतर जागा हस्तांतरण योग्य व जागेची किंमत याची शहानिशा समिती करेल. |
| २ | लाभार्थी जागा मालका बरोबर विक्री करार (Agreement to sale) करेल. |
| ३ | जागेसाठी देय निधी लाभार्थ्यांच्या बॅंक/पोस्ट खात्यामध्ये जमा करण्यापूर्वी लाभार्थ्यांकडून प्रतिज्ञापत्र प्राप्त करून घेण्यात येईल. |
| ४ | वरील बाबींची पूर्तता झाल्यावर जागेचा देय निधी लाभार्थ्यांच्या बॅंक/पोस्ट खात्यामध्ये जमा करण्यात येईल. |
| ५ | समिती जागेची प्रत्यक्ष खरेदी करतांना समन्वय करेल. |
| ६ | लाभार्थी जागेची किंमत जागा मालकास अदा करेल व प्रत्यक्ष खरेदी प्रक्रिया (Sale deed) पार पाडेल. |
| ७ | खरेदीनंतर लाभार्थ्यांच्या नावे सदर जागेची नोंद ग्रामपंचायत, City Survey व इतर सक्षम प्राधिकणाकडे समितीमार्फत केली जाईल. जागेची नोंद प्राधान्याने लाभधारकाच्या पत्नीच्या नावे किंवा संयुक्त नावाने घेण्यात येईल. |
| ८ | जागा खरेदीची प्रक्रिया पूर्ण केल्यानंतर ग्रामसभेपुढे अवलोकनार्थ ठेवण्यात येईल. |

जागा लाभार्थ्यांच्या नावावर हस्तांतरीत झाल्यानंतर व सक्षम प्राधिकरणाची बांधकामास मान्यता घेतल्यानंतर लाभार्थ्यास घरकुल बांधकामाचे अनुदान योजनेच्या निकषाप्रमाणे मंजूर करण्यात यावे.

निधीचे व्यवस्थापन

"पंडीत दीनदयाळ उपाध्याय घरकूल जागा खरेदी अर्थसहाय्य योजना" ही योजना सर्व घरकुल योजनेतील घरकुल पात्र परंतु घरकुल बांधकामासाठी जागा उपलब्ध नसलेल्या लाभार्थ्यासाठी असली तरी संबंधित प्रशासकीय विभागाकडून त्या-त्या वित्तीय वर्षात उपलब्ध होणाऱ्या निधीच्या मर्यादेत लाभार्थ्यांची संख्या निश्चित करण्यात येईल.

या योजनेअंतर्गत राज्य शासनाकडील निधी संबंधित विभागाकडून "राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण" यांचे अधिनस्त स्वतंत्र बँक खात्यात जमा केला जाईल.

निधीचे वितरण

(अ) लाभार्थ्यांने गावठाण हद्दीतील जागा अथवा गावठाण हद्दीबाहेरील निवासी प्रयोजनासाठीची सक्षम प्राधिकरणाने मंजूर केलेली जागा खरेदी करण्यास सहमती दर्शविल्यास व समितीने याबाबतची शहानिशा केल्यानंतर जागा खरेदीसाठी निधी थेट लाभार्थ्यांच्या बँक/पोस्ट खात्यात जमा करण्यात येईल. राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण यांचेकडून सदर योजनेसाठी PFMS (Public Financial Management System) प्रणाली कार्यान्वित झाल्यानंतर या योजनेचा निधी PFMS प्रणालीव्दारे लाभार्थ्यांच्या बँक/पोस्ट खात्यात थेट जमा करण्याची कार्यवाही केली जाईल.

(ब) जिल्हाधिकारी यांचेकडून गाव पुनर्वसन अंतर्गत तसेच महाराष्ट्र जमीन महसूल (सरकारी जमिनीची विल्हेवाट लावणे) नियम, १९७१ अंतर्गत नियम २७ अन्वये शासकीय जमीन निवासी वापराकरिता प्रधानमंत्री आवास योजना (ग्रामीण) आणि राज्य पुरस्कृत ग्रामीण घरकुल योजनांकरिता उपलब्ध करून दिली गेल्यास सदर शासकीय जमिनीचा / संपादित जमीनीचा

मोबदला/कब्जा हक्क रक्कम निकषाप्रमाणे संबंधित जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा हे जिल्हाधिकारी कार्यालयाकडे जमा करतील.

उपरोक्त (अ) आणि (ब) मध्ये जागेची किंमत प्रति लाभार्थी रू.५०,०००/- पेक्षा जास्त असल्यास त्यावरील रक्कम लाभार्थी / लाभार्थ्यांनी भरणे बंधनकारक राहील.

राज्यातील ग्रामीण गृहनिर्माण योजनांचे राज्यस्तरावरील समन्वयन करण्यासाठी ग्राम विकास विभाग समन्वय विभाग म्हणून काम करेल.

सदरचा शासन निर्णय अनौपचारिक संदर्भ, सामाजिक न्याय विभाग क्र.०५/बांधकामे, दि.१६.६.२०१७, आदिवासी विकास विभाग क्र.१३/का.१७, दि.३.३.२०१७, नियोजन विभाग क्र.७८/१४४४, दि.२१.३.२०१७ व वित्त विभाग क्र.२४१/२०१७/ व्यय-१५, दि.५.४.२०१७ अन्वये दिलेल्या मान्यतेनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१७०७१४१५५५५६४४२० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

(असीम गुप्ता)
सचिव, ग्राम विकास विभाग

प्रत,

१) मा.राज्यपाल यांचे सचिव
२) मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
३) सर्व मंत्री व राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
४) मा.विरोधी पक्ष नेता, विधान सभा/ विधान परिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई
५) सर्व विधानसभा व विधान परिषद सदस्य

६) मा.मुख्य सचिव, यांचे वरीष्ठ स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई
७) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र राज्य-१, मुंबई.
८) महालेखापाल (लेखापरीक्षण) महाराष्ट्र राज्य, मुंबई-१.
९) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र राज्य-२, नागपूर.
१०) महालेखापाल (लेखापरिक्षण), महाराष्ट्र राज्य-२, नागपूर.
११) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
१२) निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई
१३) अप्पर मुख्य सचिव/ प्रधान सचिव/सचिव, मंत्रालयीन प्रशासकीय विभाग (सर्व)
१४) सर्व विभागीय आयुक्त
१५) सर्व जिल्हाधिकारी
१६) सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद
१७) मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य जीवनज्योती अभियान, सी.बी.डी.बेलापूर, नवी मुंबई
१८) संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण, सी.बी.डी.,बेलापूर, नवी मुंबई
१९) संचालक, समाज कल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे.
२०) आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक
२१) ग्राम विकास व जलसंधारण विभागातील सर्व सह/उप सचिव/अवर सचिव/कक्ष अधिकारी, मंत्रालय, मुंबई
२२) उप सचिव, सामाजिक न्याय, आदिवासी विकास, अल्पसंख्यांक विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
२३) उप सचिव, नियोजन (का.१४११ व १४१४) व वित्त विभाग (का.व्यय-१५ व अर्थ-१७) मंत्रालय, मुंबई
२४) सर्व प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा
२५) सर्व गट विकास अधिकारी, पंचायत समिती
२६) अतिरिक्त संचालक, एकात्मिक ग्रामीण विकास कार्यक्रम कक्ष, बांधकाम भवन, फोर्ट, मुंबई.
२७) निवड नस्ती (कार्यासन योजना-१०)

(परिशिष्ट ३.१

राज्यातील अनुसूचित क्षेत्रातील (Scheduled Area) गट-क व गट-ड मधील रिक्त पदे भरण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
ग्राम विकास विभाग
शासन परिपत्रक क्र. नियुक्ती २०१५/प्र.क्र २११/आस्था-८,
२५- मर्झबान पथ, बांधकाम भवन, फोर्ट,
मंबई-४०० ००१,
दिनांक :- ८ ऑक्टोबर , २०१५.

वाचा -

१) मा. राज्यपाल , महाराष्ट्र राज्य यांची क्र.आरबी / टीसी /ई -१३०१३(४) / नोटिफिकेशन-१ /४७४ / २०१४ दिनांक ९ जून, २०१४ ची अधिसूचना.

२) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र-बीसीसी-२०१४/ प्र.क्र.२१३A /१४/१६-ब, ५ मार्च २०१५

३) शासन निर्णय, वित्त विभाग, क्र-संकीर्ण-२०१५/प्र.क्र ४१/अर्थ-१ दि २.जून २०१५

४) ग्रा.वि व जं .वि , शासन परिपत्रक, क्र.एपिटि -२०१४/प्रक्र-१५३/आस्था-८ दि ५ ऑगस्ट, २०१४.

५) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र.एसआरव्ही २०१५/प्र.क्र २९०/का-१२ दिनांक १६ जुलै, २०१५.

परिपत्रक :

मा. राज्यपाल यांच्या दि. ९ जून २०१४ रोजीच्या अधिसुचनेनुसार अनुसूचित क्षेत्रात निश्चित करण्यात आलेल्या १२ संवर्गातील पदे स्थानिक उमेदवारांमधून भरण्याबाबत सामान्य प्रशासन विभागाने, दि.५ मार्च २०१५ रोजी शासन निर्णय निर्गमित केला आहे . सदरहू शासन निर्णयातील अ.क्र १३ व १४ च्या अनुषंगाने दि.२६ जून २०१५ अन्वये शुध्दीपत्रक निर्गमित करण्यात आले असून त्यामधील अ.क्र.-१३ नुसार पुढीलप्रमाणे तरतूद करण्यात आली आहे.:-

१३(१) सदरचे १२ संवर्गातील अनुसूचित क्षेत्रातील स्थानिक अनुसूचित जमातीची सर्व पदे भरेपर्यंत त्या-त्या संवर्गासाठी (अनुसूचित क्षेत्राबाहेर व अनुसूचित क्षेत्रासाठी) एकच बिंदूनामावली असेल.

१३ (२) सदर बिंदू नामावलीनुसार कार्यरत कर्मचाऱ्यांमध्ये दर वर्षी बदली,सेवा निवृत्ती व इतर कारणांमुळे रिक्त होणाऱ्या पदांपैकी अनुसूचित क्षेत्रात रिक्त होणारी पदे परंतु जास्तीत जास्त जिल्हयातील एकूण रिक्त पदांच्या २० % पदे ही अनुसूचित क्षेत्रातील स्थानिक अनुसूचित जमातीच्या कर्मचाऱ्यांमधून भरण्यात यावीत व उर्वरित पदांना दि.५.३.२०१५ च्या शासन निर्णयातील परिच्छेद ९ प्रमाणे आरक्षण लावून त्यानुसार सदर पदे अनुसूचित क्षेत्राबाहेर भरण्यात यावीत.

२. जर एखादया संवर्गात अजा-२,अज-२,इमाव-२ व खुला-४ याप्रमाणे एकूण १० पदे रिक्त असतील तर, शासन निर्णय दि.२६ जून २०१५ मधील १३ (२) मधील तरतूदीनुसार अनुसूचित क्षेत्रातील २ पदे स्थानिक अनुसूचित जमातीमधून भरणे आवश्यक राहील व उर्वरित ८ रिक्त पदांना, शासन निर्णय दि.५.३.२०१५ मधील परिच्छेद ९ प्रमाणे नियमित आरक्षण लावून (अजा-१,अज-१,विजाभज-१,इमाव-१ व खुला-४ ) त्यानुसार सदर पदे अनुसूचित क्षेत्राबाहेर भरण्यात यावीत.

३. वित्त विभागाच्या दि.२ जून २०१५ रोजीच्या शासन निर्णयातील तरतूदीनुसार रिक्त पदांपैकी ५०% किंवा एकूण संवर्गाच्या ४ % यापैकी जे कमी असेल इतकीच पदे भरणे आवश्यक राहिल, सबब,

सामाजिक संतुलन राखण्याच्या दृष्टीने शासन निर्णय दि.२६ जून २०१५ मधील १३ (२) मधील तरतूदीनुसार अनुसूचित क्षेत्रातील २ पदांपैकी १ पद स्थानिक अनुसूचित जमातीमधून भरणे आवश्यक राहिल व उर्वरित ४ रिक्त पदांना, शासन निर्णय दि ५.३.२०१५ मधील परिच्छेद ९ प्रमाणे नियमित आरक्षण (अजा-१,अज-१व खुला-२) लावून त्यानुसार सदर पदे अनुसूचित क्षेत्राबाहेर भरणे आवश्यक राहिल.तथापि, यानुसार अनूसूचित क्षेत्राबाहेरील पदभरती करीत असतांना नियमित आरक्षणानुसार प्रवर्गनिहाय आरक्षण अतिरिक्त होणार नाही याबाबत जिल्हा परिषदांनी प्रकरणपरत्वे दक्षता घेणे आवश्यक राहिल.

४. उपरोक्त कार्यवाही करतांना जिल्हा परिषदांनी सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय, दिनांक १६ जुलै, २०१५ मधील तरतूदी देखील विचारा घेणे आवश्यक राहिल.

३. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेतांक २०१५१००८१४३११०५८२० असा आहे सदर परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

( अ.ए. कुलकर्णी )
उप सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,

१) सर्व विभागीय आयुक्त,
२) सर्व जिल्हाधिकारी,
३) सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी
४) सर्व सह / उप सचिव, ग्राम विकास व जलसंधारण विभाग,मंत्रालय,मुंबई
५) निवड नस्ती, कार्यासन आस्था.-८

(परिशिष्ट ३.२

वेतनावरील खर्च नियंत्रित करणे.

महाराष्ट्र शासन
वित्त विभाग
शासन निर्णय क्रमांकः संकीर्ण-२०१५/प्र.क्र.४१/अर्थ-१
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
तारीख: ०२ जून, २०१५

## शासन निर्णय

मा. राज्यपाल महोदयांनी दि. १२.११.२०१४ रोजी राज्य विधानमंडळाच्या अधिवेशनातील अभिभाषणात राज्याची आर्थिक स्थिती, राज्याची स्वीकृत दायित्वे, भविष्यातील वाटचाल आणि खर्च अधिक पारदर्शक व कार्यक्षमतेने करण्यासाठी आवश्यक उपाययोजना विषद करणारी श्वेत पत्रिका शासनाकडून काढण्यात येईल, असे स्पष्ट केले होते. त्यास अनुसरुन मार्च २०१५ च्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात महाराष्ट्र राज्याच्या वित्तीय स्थितीबाबत श्वेत पत्रिका सादर करण्यात आली. या श्वेत पत्रिकेमध्ये (पृ.१० वर ) "दीर्घकालीन वित्तीय स्थैर्यासाठी वेतनवाढीवरील खर्चाचा सरासरी दर हा महसूली वाढीच्या सरासरी दरापेक्षा अधिक असता कामा नये, हे तत्व सर्वमान्य आहे." असे नमूद करण्यात आले आहे.

२. सन २०१५-१६ चे अर्थसंकल्पीय अंदाज सादर करतांना महसूल वाढीचा दर ९.६४ % इतका अपेक्षित धरण्यात आला आहे. हा महसूल वाढीव दर लक्षात घेता, दिर्घकालीन वित्तीय स्थैर्यासाठी वेतनवाढीचा सरासरी दर हा महसूल वाढीच्या सरासरी दरापेक्षा अधिक असता कामा नये, हे सर्वमान्य तत्व पाळणे आवश्यक आहे. तसेच दि. १.१.२०१६ पासून सातव्या वेतन आयोगाच्या अपेक्षित शिफारशीमुळे वेतनावरील खर्चात मोठी वाढ संभवते. या सर्व बाबींचा विचार करुन नवीन पदनिर्मिती तसेच पदभरती यावर नियंत्रण आणावे किंवा कसे, ही बाब शासनाच्या विचाराधीन होती.

३. वरील पार्श्वभूमीवर शासन आता पुढील प्रमाणे निदेश देत आहे :-

अ) नवीन पदनिर्मिती हे आदेश निघाल्यापासून पूर्णपणे बंद राहील. मात्र, हे बंधन सिडको, MMRDA, PMRDA, NIT, NMRCL, MMRCL, PMRCL, यासारख्या आर्थिक सक्षम स्वायत्त संस्थांना तसेच केंद्र शासन पुरस्कृत (ज्या आस्थापनांचे पगार केंद्र शासनाच्या अनुदानातून होतात) संस्थांना लागू राहणार नाहीत.

ब) खालील "क" मध्ये नमूद केलेल्या संवर्गाव्यतिरिक्त इतर संवर्गातील सरळ सेवेच्या कोटयातील रिक्त असणाऱ्या पदांपैकी ५०% किंवा एकूण संवर्गाच्या ४% यापैकी जे कमी असेल इतकीच पदे भरण्यात यावीत.

क) शिक्षक, पोलीस कॉन्स्टेबल, ग्राम सेवक, तलाठी, आरोग्य परिचारीका, पशुधन परीवेक्षक, मत्स्य व्यवसाय विभागाचे तालुका स्तरावरील अधिकारी, वन रक्षक, कृषी सहायक, पाटबंधारे विभागाचे कनिष्ठ अभियंता या संवर्गात एकूण रिक्त पदांपैकी ७५% पर्यंत पदे भरण्यास मुभा राहील.

ड) उर्वरीत पदे भरण्यासाठी अपर मुख्य सचिव (सेवा), सामान्य प्रशासन विभाग, यांच्या अध्यक्षतेखाली समिती राहील. या समितीपुढे प्रस्ताव सादर करतांना विभागाने खात्यात सध्या वेतनावर होणारा खर्च व त्यात होणारी संभाव्य वाढ यांचा आढावा घेऊनच प्रस्ताव सादर करणे आवश्यक आहे.

४. प्रशासकीय विभागाला प्रशासनावर कोणताही विपरीत परिणाम न होता, विभागामध्ये एकूण उपलब्ध कर्मचाऱ्यांचे समायोजन करण्याचे संपूर्ण अधिकार राहतील. विभागाच्या ज्या संवर्गाच्या बाबतीत कामांची आवश्यकता कमी झाली आहे, अशा संवर्गातील पदांची विभागातील तीच वेतनश्रेणी असलेल्या दुसऱ्या संवर्गात आवश्यकतेनुसार पदे स्थानांतरण करता येतील. तथापि त्या विभागांतर्गत एकूण पद संख्येच्या मर्यादेतच असे समायोजन राहील. जर पदे स्थानांतरण करावयाच्या संवर्गांची वेतनश्रेणी वेगळी असेल तर अशा स्थानांतरणास उपरोक्त समितीची मान्यता आवश्यक राहील.

वरीलप्रमाणे कार्यवाही अंती काही अधिकारी / कर्मचाऱ्यांचे समायोजन विभागाकडील पदांवर करता येत नसल्यास हा अतिरिक्त ठरणारा अधिकारी / कर्मचारी वृंद शासन निर्णय, वित्त विभाग, क्र. असंक-१००१/प्र.क्र.२२/ २००१/वित्तीय सुधारणा, दि. १० सप्टेंबर, २००१ नुसार निर्गमित केलेल्या सूचनेनुसार वित्त विभागात कार्यरत असलेल्या अतिरिक्त संवर्ग कक्षाकडे पदनिहाय व संवर्गनिहाय वर्ग करावा.

५. प्रशासकीय विभागाने वरील बाबींमुळे कामावर परिणाम होणार नाही, याकरीता ई-गव्हर्नन्स चा वापर करावा.

६. अनावश्यक खर्च कमी करणे, कमी मनुष्यबळाचा वापर करुन गुणवत्तेचे प्रशासन करणे, याचबरोबर कामाच्या गुणवत्तेवर परिणाम न करता खर्च १०-१५ % कमी करणाऱ्या अधिकाऱ्यांच्या गोपनीय अहवालामध्ये त्याप्रमाणे नोंदी घेण्यात याव्यात.

७. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१५०६०२१५३५००३९०५ असा आहे. हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Swadheen S Kshatriya

Digitally signed by Swadheen S Kshatriya
DN: c=IN, o=All India Service, ou=Chief Secretary, postalCode=400032, st=Maharashtra, cn=Swadheen S Kshatriya
Date: 2015.06.02 16:32:15 +05'30'

(स्वा. शि. क्षत्रिय)
मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) राज्यपालांचे सचिव.
२) मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव.
३) सर्व विधानमंडळ सदस्य, विधानभवन, मुंबई.
४) सर्व मंत्री आणि राज्यमंत्री यांचे स्वीय सहायक.
५) मंत्रालयीन सर्व विभाग.
६) मंत्रालयाच्या सर्व विभागांखाली विभाग प्रमुख व प्रादेशिक विभाग प्रमुख.
७) प्रबंधक, उच्च न्यायालय (मूळ शाखा), मुंबई.
८) प्रबंधक, उच्च न्यायालय (अपील शाखा), मुंबई.
९) सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई.
१०) सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.

११) प्रबंधक, लोक आयुक्त व उप लोक आयुक्त यांचे कार्यालय, मुंबई.
१२) आयुक्त, राज्य माहिती आयोग, (सर्व).
१३) सचिव, राज्य निवडणूक आयोग, मुंबई.
१४) प्रबंधक, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई / नागपूर / औरंगाबाद.
१५) राज्य महिला आयोग, वरळी, मुंबई.
१६) सर्व विभागीय आयुक्त.
१७) सर्व जिल्हाधिकारी.
१८) सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषदा.
१९) महासंचालक, यशदा, राजभवन आवार, बाणेर रोड, पुणे.
२०) महालेखापाल-१ (लेखापरीक्षा), महाराष्ट्र, मुंबई.
२१) महालेखापाल-१ (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र , मुंबई
२२) महालेखापाल-२ (लेखापरीक्षा), महाराष्ट्र, नागपूर.
२३) महालेखापाल-२ (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र , नागपूर
२४) सिनियर रिसर्च ऑफिसर, पे रिसर्च युनिट, भारत सरकार, वित्त मंत्रालय (व्यय विभाग), खोली क्र. २६१, नार्थ ब्लॉक, नवी दिल्ली.
२५) संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई.
२६) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
२७) निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
२८) जिल्हा लेखा परीक्षा अधिकारी, स्थानिक निधी हिशेब.
२९) सर्व जिल्हा कोषागार अधिकारी.
३०) सर्व लेखाधिकारी, वेतन पडताळणी पथक, मुंबई / नागपूर / पुणे / औरंगाबाद.
३१) मुख्य अधिकारी, सर्व नगरपालिका.
३२) कार्यकारी अधिकारी, कॅन्टोनमेंट बोर्ड, खडकी / देहू रोड / देवळाली / अहमदनगर.
३३) कुलसचिव, महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहूरी, जिल्हा अहमदनगर.
३४) कुलसचिव, मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी.
३५) कुलसचिव, कोकण कृषि विद्यापीठ, दापोली, जिल्हा रत्नागिरी.
३६) कुलसचिव, पंजाबराव कृषि विद्यापीठ,अकोला.
३७) कुलसचिव, मुंबई विद्यापीठ, मुंबई.
३८) कुलसचिव, पुणे विद्यापीठ, पुणे.
३९) कुलसचिव, नागपूर विद्यापीठ, नागपूर.
४०) कुलसचिव, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद.
४१) कुलसचिव, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड.
४२) कुलसचिव, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.
४३) कुलसचिव, अमरावती विद्यापीठ, अमरावती.
४४) कुलसचिव, श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठ, मुंबई.
४५) कुलसचिव, उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगांव.
४६) कुलसचिव, महाराष्ट्र पशू व मत्स्यविज्ञान विद्यापीठ, नागपूर.

४७) कुलसचिव, डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रज्ञान विद्यापीठ, लोणेरे, रायगड
४८) मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी हिशेब, मुंबई.
४९) उप मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी हिशेब, मुंबई.
५०) उप मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी हिशेब,मुंबई/पुणे/नागपूर/औरंगाबाद/नाशिक/ अमरावती.
५१) बहुजन समाज पार्टी, डी-१ इन्सा हटमेंट, आझाद मैदान, मुंबई-१.
५२) भारतीय जनता पार्टी, महाराष्ट्र प्रदेश, सी.डी.ओ., बॅरेक क्रमांक १, योगक्षेम समोर, वसंतराव भागवत चौक, नरिमन पॉईट, मुंबई-२०.
५३) भारतीय कम्युनिस्ट पार्टी, महाराष्ट्र कमिटी, ३१४, राजभवन, एस.व्ही. पटेल रोड, मुंबई-४.
५४) भारतीय कम्युनिस्ट पार्टी (मार्क्सवादी), महाराष्ट्र कमिटी, जनशक्ती हॉल, ग्लोब मिल पॅलेस, वरळी, मुंबई-१३.
५५) इंडियन नॅशनल कॉंग्रेस, महाराष्ट्र प्रदेश कॉंग्रेस (आय) समिती, टिळक भवन, काकासाहेब गाडगीळ मार्ग, दादर, मुंबई-२५.
५६) नॅशनलिस्ट कॉंग्रेस पार्टी, राष्ट्रवादी भवन, फ्री प्रेस जर्नल मार्ग, नरिमन पॉईंट, मुंबई-२१.
५७) शिवसेना, शिवसेना भवन, गडकरी चौक, दादर, मुंबई - २८.
५८) वित्त विभागातील सर्व कार्यासने.
५९) निवड नस्ती, वित्त विभाग (अर्थ-१)

(परिशिष्ट ६.३)

राज्यातील सहा तालुक्यातील जिल्हा परिषद शाळेतील बायोमेट्रिक हजेरी प्रणालीस प्रशासकीय व तांत्रिक मान्यतेबाबत

महाराष्ट्र शासन
शासन परिपत्रक क्रमांक : संगणक २०१०/प्र.क्र.४/संगणक कक्ष
ग्रामविकास व जलसंधारण विभाग,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक :१५ मार्च, २०११

<u>शासन परिपत्रक :</u>

राज्यातील जिल्हा परिषदेच्या शाळांमधील विद्यार्थ्यांची उपस्थिती वाढविणे व ज्या शाळेत शिक्षक अनुपस्थितीत असतील तेथे तातडीने बदली शिक्षक उपलब्ध करुन देणे या हेतूने ग्रामविकास विभागामार्फत जिल्हा परिषदेच्या शाळेमध्ये बायोमेट्रिक हजेरी प्रणाली राबविण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे.त्यानुसार प्रथमत: ही प्रणाली प्रायोगिक तत्वावर राज्यातील सहा तालुक्यातील ( श्रीवर्धन (जि.रायगड), वाळवा (जि.सांगली), धारणी (जि.अमरावती), मुदखेड (जि.नांदेड), देवळी (जि.वर्धा) व संगमनेर (जि.अहमदनगर) ) जिल्हा परिषदेच्या सर्व शाळांमध्ये राबविण्यात येत आहे.

२. सदर कार्यक्रमात एकरुपता राहण्यासाठी ग्रामविकास विभागामार्फत निविदा मागविण्यात आलेल्या होत्या. त्यामधून ठरविलेले निकष पूर्ण करणाऱ्या खालील चार कंपन्यांची विहित प्रक्रियेनंतर निवड करण्यात आलेली आहे

(१) ॲसव्हेन सिस्टिम्स ॲण्ड सॉफ्टवेअर, पुणे,
(२) अरिथमॅटिक सिस्टिम्स ॲण्ड सॉफ्टवेअर, पुणे,
(३) झेनिथ कंट्रोल्स ॲण्ड लिमिटेड, बंगलोर,
(४) रिया इन्फोटेक, पुणे

३. सदर प्रणालीसाठी निवडलेले तालुके व संबधित कंपन्या यांचे विवरणपत्र खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | निवडलेले तालुके | निवडलेल्या संबधित कंपन्या |
|---|---|---|
| १ | वाळवा (जि.सांगली), | ॲसव्हेन सिस्टिम्स ॲण्ड सॉफ्टवेअर, पुणे, |
| २ | मुदखेड (जि.नांदेड), | ॲसव्हेन सिस्टिम्स ॲण्ड सॉफ्टवेअर, पुणे, |
| ३ | धारणी (जि.अमरावती), | झेनिथ कंट्रोल्स ॲण्ड लिमिटेड, बंगलोर, |
| ४ | देवळी (जि.वर्धा) | झेनिथ कंट्रोल्स ॲण्ड लिमिटेड, बंगलोर, |
| ५ | संगमनेर (जि.अहमदनगर) ) | अरिथमॅटिक सिस्टिम्स ॲण्ड सॉफ्टवेअर, पुणे, |
| ६ | श्रीवर्धन (जि.रायगड), | रिया इन्फोटेक, पुणे |

४. विभागाने EOI मधून निवडलेल्या ४ कंपन्यांकडून L1 कंपनीने नमूद केलेल्या दराप्रमाणे ७२ तासाच्या बॅटरी बॅकअप व सेंगम/सेक्युजेन सेन्सरसह रु.३५१००/-(रु.३३,२००/मशिन दर अधिक रु.१९००/- software cost) प्रमाणे यंत्र खरेदी करण्यास माहिती व तंत्रज्ञान विभाग व विभागाने गठित केलेल्या प्रकल्प अंमलबजावणी समितीची मान्यता मिळालेली आहे.

//

या प्रणालीसाठी परिच्छेद २ मध्ये नमूद कंपन्यांशी करार करण्यात आलेला असून EOI नुसार Bid Security form सोबत चारही कंपन्यांनी रु १,५०,०००/- ची बँक गॅरंटी शासनास सादर केलेली आहे.

६. या संदर्भात संबंधित सहा जिल्हा परिषदांनी संबंधित कंपनीला खालील बाबींचा विचार करुन वर्क ऑर्डर देण्यात यावी.

१. प्रत्येकी रु.३५१००/-(मशीन दर रु.३३२००/- व सॉफ्टवेअर दर रु.१९००/-) या दराने मशीनचे दर ठरविण्यात आले आहेत. मशीनचे देयक संबंधित कंपनीस व सॉफ्टवेअरचे देयक मे. ॲसव्हेन सिस्टिम्स ॲण्ड सॉफ्टवेअर, पुणे या कंपनीला अदा करावयाचे आहेत.

२. प्रत्येकी रु.१५/- या दराने विद्यार्थी व शिक्षक यांच्या बोटांचे ठसे घेणे यासाठी हे मूल्य निश्चित केले आहे.

३. प्रत्येक शाळेसाठी रु.१५००/- या दराने प्रशिक्षण शुल्क निश्चित करण्यात आले आहे.

४. प्रत्येक वर्षासाठी रु.६००/- (प्रत्येक मशीनसाठी) या दराने GPRS/SMS, सिमकार्ड शुल्क निश्चित करण्यात आले.

७. वरील प्रमाणे एकूण मूल्य निश्चित करुन संबंधित कंपनीला वर्क ऑर्डर देण्यात यावी व ही प्रणाली १५ दिवसांत कार्यान्वित करण्याबाबत कळविण्यात यावे. संबंधित कंपनीला वर्क ऑर्डर दिल्यानंतर त्यांचेकडून ५% Performance Security Deposit बँक गॅरंटीच्या स्वरुपात घेण्यात यावी.

८. संबंधित कंपनीला देयक अदा करताना खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

१. एकूण खर्चाच्या ५०% इतके देयक सदर कंपनीला पर्चेस ऑर्डर देताना करण्यात यावे.

२. एकूण खर्चाच्या २५% इतके देयक सर्व मशीन शाळांमध्ये बसवून त्याचे समाधानकारक Installation झाल्यानंतर ते अदा करण्यात यावे.

३. एकूण खर्चाच्या १५% देयक कामाचे २४ दिवसातील हजेरी प्रणालीचा डाटा यशस्वीरित्या संबंधित गट विकास अधिकारी/मुख्य कार्यकारी अधिकारी यांना ट्रान्सफर होत असल्याची खात्री झाल्यानंतर अदा करण्यात यावी.

४. उर्वरित १०% देयक दुसऱ्या टप्प्यात केलेल्या देयकानंतरच्या कामाच्या ४८ दिवसांचे समाधानकारक काम पाहिल्यानंतर देण्यात यावे.

९. या प्रणालीसाठी शासन स्तरावर प्रशासकीय व तांत्रिक छाननी केलेली असल्याने संबंधित जिल्हा परिषदांनी पुन्हा प्रशासकीय व तांत्रिक मान्यता घेण्याची आवश्यकता नाही. तसेच ग्रामविकास विभाग, संबंधित कंपनी व manufacture कंपनी यांमध्ये त्रिपक्षीय करार करण्यात आलेला आहे. त्यामुळे जिल्हा परिषदांनी संबंधित कंपनीला वर्क ऑर्डर देताना पुन्हा करार करावयाची आवश्यकता नाही.

१०. यासाठी आवश्यक निधी १३व्या वित्त आयोगातून जिल्हा परिषद, पंचायत समिती व ग्राम पंचायत यांना प्राप्त निधीमधून वितरित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(दि.ग.गोरे)

उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

मा.राज्यपालांचे सचिव,

मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,

# परिशिष्ट " ब "

## समितीच्या बैठकीचे संक्षिप्त कार्यवृत्त

**गुरुवार, दिनांक ५ नोव्हेंबर, २०१५**

**स्थळ : जिल्हा परिषद सभागृह, अमरावती**

**उपस्थिती**

१. श्री.संभाजी निलंगेकर-पाटील, वि.स.स.तथा समिती प्रमुख.

२. श्री.प्रकाश भारसाकळे, वि.स.स.

३. श्री.विकास कुंभारे, वि.स.स.

४. श्री.भिमराव तापकीर, वि.स.स.

५. श्री.समीर कुणावार, वि.स.स.

६. श्री.राजेंद्र नजरधने, वि.स.स.

७. श्री.भरतशेठ गोगावले, वि.स.स.

८. श्री.हेमंत पाटील, वि.स.स.

९. श्री.राजाभाऊ वाजे, वि.स.स.

१०. श्री. अमित झनक, वि.स.स.

११. श्री.पांडुरंग फुंडकर, वि.प.स.

१२. श्री.रामहरी रुपनवर, वि.प.स.

**स्थानिक आमदार :**

प्रा.विरेंद्र जगताप, वि.स.स.

डॉ.सुनिल देशमुख, वि.स.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

श्री.विलास आठवले, उप सचिव

श्री. प्रदीप मयेकर, अवर सचिव (समिती)

**स्थानिक निधी लेखापरीक्षा संचालनालय :**

श्री.के.एम.विधाते, संचालक

**ग्राम विकास विभाग, मंत्रालय :**

श्री.नं.म.शिंदे, सह सचिव

**विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद :**

श्री.सुनिल निकम, सहायक आयुक्त (चौकशी)

**जिल्हा परिषद, अमरावती :**

श्री. सुनिल पाटील, मुख्य कार्यकारी अधिकारी
श्री. संजय इंगळे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी
डॉ. उन्मेश देशमुख, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (रोहयो) तथा प्र.सं.,जि.ग्रा.वि.य.
श्री. जालीदंड एन. आभाळे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत)
श्री. कैलास एन. घोडके, उप जिल्हा कार्यक्रम समन्वयक (महिला व बालकल्याण)
श्री. चंद्रशेखर डी. खंडारो, मुख्य लेखा व वित्त अधिकारी
श्री. पुरुषोत्तम जी. भागवत, कार्यकारी अभियंता (बांधकाम)
श्रीमती श्वेता स. बॅनर्जी, कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा
श्री. प. पु. पोटफोडे, कार्यकारी अभियंता, लघुसिंचन
श्री. नितीन भालेराव, जिल्हा आरोग्य अधिकारी, आरोग्य विभाग
डॉ. पुरुषोत्तम सोळंके, जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, पशुसंवर्धन विभाग
श्री. भाऊराव आर. चव्हाण, जिल्हा समाज कल्याण अधिकारी
श्री. उदय डी. कातोडे, कृषी विकास अधिकारी
डॉ. श्रीराम पानझाडे, शिक्षणाधिकारी (प्राथमिक)
श्री. सी. आर. राठोड, शिक्षणाधिकारी (माध्यमिक)
श्री. पी. पी. अभ्यंकर, शिक्षणाधिकारी (निरंतर)
श्री. एस. पी. बोडके, लेखा अधिकारी, वित्त विभाग
श्री. आर. एम. खैरनार, वरिष्ठ लेखा अधिकारी, वित्त विभाग
श्री. प्रमोद कापडे, गटविकास अधिकारी, अमरावती
श्री. भास्कर रेंगडे, गटविकास अधिकारी, अंजणगाव
श्री. दिलीप मानकर, गटविकास अधिकारी, मोर्शी
श्री. सुरज गोटाड, गटविकास अधिकारी, नांदगांव ख.
श्री. कपिलनाथ कलोडे, गटविकास अधिकारी, धामणगाव रेल्वे
श्री. बी. एस. अककाडे, गटविकास अधिकारी, चांदूर बाजार
श्री. जि. एस. धायगुडे, गटविकास अधिकारी, तिवसा
श्री. बी. एस. रायबोले, गटविकास अधिकारी, अचलपूर
श्री. ए. यु. गुडधे, गटविकास अधिकारी, दर्यापूर
श्री. एस. पी. थोरात, गटविकास अधिकारी, भातकुली
श्री. एस. के. तलवारे, गटविकास अधिकारी, चांदूर रेल्वे
श्री. प्रकाश तट्टे, गटविकास अधिकारी, वरुड
श्री. एन. टी. देसले, गटविकास अधिकारी, चिखलदरा
श्री. रामचंद्र जोशी, गटविकास अधिकारी, धारणी

---

**संक्षिप्त कार्यवृत्त :**

समितीने अमरावती जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी व इतर सर्व संबंधित अधिकारी यांची सन २००८-२००९ व २०११-१२ च्या लेखा परिक्षा पुनर्विलोकन अहवालातील अमरावती जिल्हा परिषदेशी संबंधित असलेल्या परिच्छेदावर साक्ष घेतली.

**शुक्रवार, दिनांक ६ नोव्हेंबर, २०१५**

**स्थळ : जिल्हा परिषद सभागृह, अमरावती**

**उपस्थिती**

१. श्री.संभाजी निलंगेकर-पाटील, वि.स.स.तथा समिती प्रमुख.

२. श्री.प्रकाश भारसाकळे, वि.स.स.

३. श्री.विकास कुंभारे, वि.स.स.

४. श्री.भिमराव तापकीर, वि.स.स.

५. श्री.आर.टी.देशमुख, वि.स.स.

६. श्री.समीर कुणावार, वि.स.स.

७. श्री.राजेंद्र नजरधने, वि.स.स.

८. श्री.भरतशेठ गोगावले, वि.स.स.

९. श्री.हेमंत पाटील, वि.स.स.

१०. श्री.राजाभाऊ वाजे, वि.स.स.

११. श्री.अमित झनक, वि.स.स.

१२. श्री.पांडुरंग फुंडकर, वि.प.स.

१३. श्री.रामहरी रुपनवर, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

श्री. विलास आठवले, उप सचिव

श्री. प्रदीप मयेकर, अवर सचिव (समिती)

**जिल्हा परिषद, अमरावती :**

श्री. सुनिल पाटील, मुख्य कार्यकारी अधिकारी

श्री. संजय इंगळे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी

डॉ. उन्मेश देशमुख, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (रोहयो) तथा प्र.सं.,जि.ग्रा.वि.य.

श्री. जालीदंड एन. आभाळे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत)

श्री. कैलास एन. घोडके, उप जिल्हा कार्यक्रम समन्वयक (महिला व बालकल्याण)

श्री. चंद्रशेखर डी. खंडारो, मुख्य लेखा व वित्त अधिकारी

श्री. पुरुषोत्तम जी. भागवत, कार्यकारी अभियंता (बांधकाम)

श्रीमती श्वेता स. बॅनर्जी, कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा

श्री. प. पु. पोटफोडे, कार्यकारी अभियंता, लघुसिंचन

श्री. नितीन भालेराव, जिल्हा आरोग्य अधिकारी, आरोग्य विभाग

डॉ. पुरुषोत्तम सोळंके, जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, पशुसंवर्धन विभाग

श्री. भाऊराव आर. चव्हाण, जिल्हा समाज कल्याण अधिकारी

श्री. उदय डी. कातोडे, कृषी विकास अधिकारी

डॉ. श्रीराम पानझाडे, शिक्षणाधिकारी (प्राथमिक)

श्री. सी. आर. राठोड, शिक्षणाधिकारी (माध्यमिक)

श्री. पी. पी. अभ्यंकर, शिक्षणाधिकारी (निरंतर)

श्री. एस. पी. बोडके, लेखा अधिकारी, वित्त विभाग

श्री. आर. एम. खैरनार, वरिष्ठ लेखा अधिकारी, वित्त विभाग

श्री. प्रमोद कापडे, गटविकास अधिकारी, अमरावती

श्री. भास्कर रेंगडे, गटविकास अधिकारी, अंजणगाव

श्री. दिलीप मानकर, गटविकास अधिकारी, मोर्शी

श्री. सुरज गोटाड, गटविकास अधिकारी, नांदगांव ख.

श्री. कपिलनाथ कलोडे, गटविकास अधिकारी, धामणगाव रेल्वे

श्री. बी. एस. अककाडे, गटविकास अधिकारी, चांदूर बाजार

श्री. जि. एस. धायगुडे, गटविकास अधिकारी, तिवसा

श्री. बी. एस. रायबोले, गटविकास अधिकारी, अचलपूर

श्री. ए. यु. गुडधे, गटविकास अधिकारी, दर्यापूर

श्री. एस. पी. थोरात, गटविकास अधिकारी, भातकुली

श्री. एस. के. तलवारे, गटविकास अधिकारी, चांदूर रेल्वे

श्री. प्रकाश तट्टे, गटविकास अधिकारी, वरुड

श्री. एन. टी. देसले, गटविकास अधिकारी, चिखलदरा

श्री. रामचंद्र जोशी, गटविकास अधिकारी, धारणी

---

**संक्षिप्त कार्यवृत्त :**

समितीने अमरावती जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी व इतर सर्व संबंधित अधिकारी तसेच गटविकास अधिकारी यांची सन २०१२-२०१३ च्या वार्षिक प्रशासन अहवालावरील प्रश्नावली क्रमांक २ संदर्भात अमरावती जिल्ह्यातील पंचायत समितीनिहाय संबंधित असलेल्या परिच्छेदावर साक्ष घेतली.

**शनिवार, दिनांक ७ नोव्हेंबर, २०१५**

**स्थळ : जिल्हा परिषद सभागृह, अमरावती**

**उपस्थिती**

१. श्री. संभाजी निलंगेकर-पाटील, वि.स.स.तथा समिती प्रमुख.

२. श्री. प्रकाश भारसाकळे, वि.स.स.

३. श्री. विकास कुंभारे, वि.स.स

४. श्री. भिमराव तापकीर, वि.स.स.

५. श्री. आर. टी. देशमुख, वि.स.स.

६. श्री. उन्मेश पाटील, वि.स.स.

७. श्री. समीर कुणावार, वि.स.स.

८. श्री. राजेंद्र नजरधने, वि.स.स.

९. श्री. भरतशेठ गोगावले, वि.स.स.

१०. श्री. हेमंत पाटील, वि.स.स.

११. श्री. राजाभाऊ वाजे, वि.स.स.

१२. श्री. अमित झनक, वि.स.स.

१३. श्री. पांडुरंग फुंडकर, वि.प.स.

१४. श्री. रामहरी रुपनवर, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

श्री. विलास आठवले, उप सचिव

श्री. प्र. स. मयेकर, अवर सचिव (समिती)

**स्थानिक निधी लेखापरीक्षा संचालनालय :**

श्री. के. एम. विधाते, संचालक

**ग्राम विकास विभाग, मंत्रालय :**

श्री. नं. म. शिंदे, सह सचिव

**विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद :**

श्री. सुनिल निकम, सहायक आयुक्त (चौकशी)

**जिल्हा परिषद, अमरावती :**

श्री. सुनिल पाटील, मुख्य कार्यकारी अधिकारी
श्री. संजय इंगळे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी
डॉ. उन्मेश देशमुख, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (रोहयो) तथा प्र.सं.,जि.ग्रा.वि.य.
श्री. जालीदंड एन. आभाळे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत)
श्री. कैलास एन. घोडके, उप जिल्हा कार्यक्रम समन्वयक (महिला व बालकल्याण)
श्री. चंद्रशेखर डी. खंडारो, मुख्य लेखा व वित्त अधिकारी
श्री. पुरुषोत्तम जी. भागवत, कार्यकारी अभियंता (बांधकाम)
श्रीमती श्वेता स. बॅनर्जी, कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा
श्री. प. पु. पोटफोडे, कार्यकारी अभियंता, लघुसिंचन
श्री. नितीन भालेराव, जिल्हा आरोग्य अधिकारी, आरोग्य विभाग
डॉ. पुरुषोत्तम सोळंके, जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, पशुसंवर्धन विभाग
श्री. भाऊराव आर. चव्हाण, जिल्हा समाज कल्याण अधिकारी
श्री. उदय डी. कातोडे, कृषी विकास अधिकारी
डॉ. श्रीराम पानझाडे, शिक्षणाधिकारी (प्राथमिक)
श्री. सी. आर. राठोड, शिक्षणाधिकारी (माध्यमिक)
श्री. पी. पी. अभ्यंकर, शिक्षणाधिकारी (निरंतर)
श्री. एस. पी. बोडके, लेखा अधिकारी, वित्त विभाग
श्री. आर. एम. खैरनार, वरिष्ठ लेखा अधिकारी, वित्त विभाग
श्री. प्रमोद कापडे, गटविकास अधिकारी, अमरावती
श्री. भास्कर रेंगडे, गटविकास अधिकारी, अंजणगाव
श्री. दिलीप मानकर, गटविकास अधिकारी, मोर्शी
श्री. सुरज गोटाड, गटविकास अधिकारी, नांदगांव ख.
श्री. कपिलनाथ कलोडे, गटविकास अधिकारी, धामणगाव रेल्वे
श्री. बी. एस. अककाडे, गटविकास अधिकारी, चांदूर बाजार
श्री. जि. एस. धायगुडे, गटविकास अधिकारी, तिवसा
श्री. बी. एस. रायबोले, गटविकास अधिकारी, अचलपूर
श्री. ए. यु. गुडधे, गटविकास अधिकारी, दर्यापूर
श्री. एस. पी. थोरात, गटविकास अधिकारी, भातकुली
श्री. एस. के. तलवारे, गटविकास अधिकारी, चांदूर रेल्वे
श्री. प्रकाश तट्टे, गटविकास अधिकारी, वरुड
श्री. एन. टी .देसले, गटविकास अधिकारी, चिखलदरा
श्री. रामचंद्र जोशी, गटविकास अधिकारी, धारणी

---

**संक्षिप्त कार्यवृत्त :**

समितीने अमरावती जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी व इतर सर्व संबंधित अधिकारी यांची सन २००८-२००९ व सन २०११-२०१२ च्या लेखा परिक्षा पुनर्विलोकन अहवालातील व सन २०१२-२०१३ च्या वार्षिक प्रशासन अहवालातील अमरावती जिल्हा परिषदेशी संबंधित असलेल्या परिच्छेदावर साक्ष घेतली.

**मंगळवार, दिनांक ३ ऑक्टोबर, २०१७**

**स्थळ : विधान भवन, मुंबई**

**उपस्थिती**

(१) श्री.सुधीर पारवे, वि.स.स.तथा समिती प्रमुख.

(२) श्री.बाबुराव पाचर्णे, वि.स.स.

(३) श्री.चरण वाघमारे, वि.स.स.

(४) श्री.रणधीर सावरकर, वि.स.स.

(५) डॉ. सुरेश खाडे, वि.स.स.

(६) श्री.सुधाकर कोहळे, वि.स.स.

(७) श्री.राहुल बोंद्रे, वि.स.स.

(८) प्रा.विरेंद्र जगताप, वि.स.स.

(९) श्री.राहुल मोटे, वि.स.स.

(१०) श्री.दिपक चव्हाण, वि.स.स.

(११) श्री.विक्रम काळे, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

(१) श्री. विलास आठवले, उप सचिव

(२) श्री. बा.तु.माने, अवर सचिव (समिती)

(३) श्री. सचिन बाभळगांवकर, कक्ष अधिकारी

(४) श्री. ह. वि. तामोरे, कक्ष अधिकारी

**स्थानिक निधी लेखापरीक्षा संचालनालय :**

श्री. प्रताप मोहिते, संचालक

**विभागीय सचिव :**

श्री. श्यामलाल गोयल, अतिरिक्त मुख्य सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग,

डॉ. प्रदीप व्यास, प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग,

श्री. असिमकुमार गुप्ता, सचिव, ग्रामविकास विभाग,

श्रीमती विनिता वेद सिंगल, सचिव, महिला व बालविकास विभाग,

श्री. चंद्रशेखर जोशी, सचिव (रस्ते), सार्वजनिक बांधकाम विभाग,

डॉ. सुवर्णा खरात, सह सचिव, शालेय शिक्षण व क्रिडा विभाग,

श्री. र. अ. नागरगोजे, उप सचिव, ग्रामविकास विभाग,

श्री. ना. भा. रिंगणे, उप सचिव, ग्रामविकास विभाग,

श्री. संजय बनकर, उप सचिव, ग्रामविकास विभाग,

श्री. संतोष कुमार, सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण

**अमरावती जिल्हा परिषद :**

श्री. के. एम. अहमद, मुख्य कार्यकारी अधिकारी, अमरावती

श्री. संजय येवले, कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा, अमरावती

श्री. आर. डी. तुरणकर, शिक्षणाधिकारी (प्राथमिक), अमरावती

श्री. प्र. उ. तलवारे, कार्यकारी अभियंता, लघुसिंचन, अमरावती

---

**संक्षिप्त कार्यवृत्त :**

सन २००८-२००९ व २०११-२०१२ च्या लेखा परिक्षा पुनर्विलोकन अहवाल व सन २०१२-१३ च्या वार्षिक प्रशासन अहवाल यासंदर्भात अमरावती जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या माहितीच्या संदर्भात अधिक माहिती मिळविण्यासाठी अतिरिक्त मुख्य सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, सचिव, ग्रामविकास विभाग, सचिव, महिला व बालविकास विभाग, सचिव (रस्ते), सार्वजनिक बांधकाम विभाग, सह सचिव, शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, उप सचिव, ग्रामविकास विभाग, सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अमरावती यांची साक्ष घेतली.

**बुधवार, दिनांक ४ ऑक्टोबर, २०१७**

**स्थळ : विधान भवन, मुंबई**

**उपस्थिती**

(१) श्री. सुधीर पारवे, वि.स.स.तथा समिती प्रमुख.

(२) श्री. बाबुराव पाचर्णे, वि.स.स.

(३) श्री. चरण वाघमारे, वि.स.स.

(४) डॉ. सुरेश खाडे, वि.स.स.

(५) श्री. सुधाकर कोहळे, वि.स.स.

(६) श्री. तुकाराम काते, वि.स.स.

(७) श्री. राहुल बोंद्रे, वि.स.स.

(८) प्रा. विरेंद्र जगताप, वि.स.स.

(९) श्री. विक्रम काळे, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

(१) श्री. विलास आठवले, उप सचिव

(२) श्री. बा.तु.माने, अवर सचिव (समिती)

(३) श्री. सचिन बाभळगांवकर, कक्ष अधिकारी

(४) श्री. ह. वि. तामोरे, कक्ष अधिकारी

**स्थानिक निधी लेखापरीक्षा संचालनालय :**

श्री. प्रताप मोहिते, संचालक

**विभागीय सचिव :**

श्री. असिमकुमार गुप्ता, सचिव, ग्रामविकास विभाग,

श्री. प्रकाश वळवी, उप सचिव, ग्रामविकास विभाग,

श्री. गिरिश भालेराव, उप सचिव, ग्रामविकास विभाग,

श्री. ना. भा.रिंगणे, उप सचिव, ग्रामविकास विभाग,

श्री. विजय चांदेकर, अवर सचिव, ग्रामविकास विभाग,

**अमरावती जिल्हा परिषद :**

श्री. के. एम. अहमद, मुख्य कार्यकारी अधिकारी, अमरावती

श्री. जे. एन. आभाळे, उप मुख्य कार्यकारी अधिकारी, ग्रामपंचायत विभाग, अमरावती

श्री. संजय येवले, कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा, अमरावती

श्री. आर. डी. तुरणकर, शिक्षणाधिकारी (प्राथमिक), अमरावती

श्री. प्र. उ. तलवारे, कार्यकारी अभियंता, लघुसिंचन, अमरावती

श्री. द. द. फिस्के, उप मुख्य लेखा व वित्त अधिकारी, अमरावती

---

**संक्षिप्त कार्यवृत्त :**

सन २००८-२००९ व २०११-२०१२ च्या लेखा परिक्षा पुनर्विलोकन अहवाल व सन २०१२-१३ च्या वार्षिक प्रशासन अहवाल यासंदर्भात अमरावती जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या माहितीच्या संदर्भात अधिक माहिती मिळविण्यासाठी सचिव, ग्रामविकास विभाग, उप सचिव, ग्रामविकास विभाग, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अमरावती यांची उर्वरित साक्ष घेतली.

**मंगळवार, दिनांक १९ डिसेंबर, २०१७**

**स्थळ : विधान भवन, नागपूर**

**उपस्थिती**

(१) श्री. सुधीर पारवे, वि.स.स. तथा समिती प्रमुख

(२) श्री. बाबुराव पाचर्णे, वि.स.स.

(३) श्री. चरण वाघमारे, वि.स.स.

(४) श्री. रणधीर सावरकर, वि.स.स.

(५) श्री. आर. टी .देशमुख, वि.स.स.

(६) डॉ. देवराव होळी, वि.स.स.

(७) डॉ. सुरेश खाडे, वि.स.स.

(८) श्री. किशोर पाटील, वि.स.स.

(९) श्री. तुकाराम काते, वि.स.स.

(१०) प्रा. विरेंद्र जगताप, वि.स.स.

(११) श्री. तानाजी सावंत, वि.प.स.

(१२) श्री. विक्रम काळे, वि.प.स.

(१३) श्री. अमरनाथ राजूरकर, वि.प.स.

**विशेष निमंत्रित :**

(१४) श्री. बाळाराम पाटील, वि.प.स.

(१५) श्री. श्रीकांत देशपांडे, वि.प.स.

(१६) श्री. दत्तात्रय सावंत, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

(१) श्री. विलास आठवले, उप सचिव

(२) श्री. प्रकाशचंद्र खोंदले, अवर सचिव

(३) श्री. सचिन बाभळगांवकर, कक्ष अधिकारी

(४) श्री. ह. वि. तामोरे, कक्ष अधिकारी

---

**संक्षिप्त कार्यवृत्त :**

समितीने बैठकीत आठव्या व नवव्या अहवालाच्या प्रारुपावर विचार करुन ते किरकोळ सुधारणांसह संमत केले.

शामुना--एचबी-२१२८-मविसना-१२-२०१७-४१० प्रती-पीए४*